शनिवार
३० नोव्हेंबर १९७४

# माणूस

एक
रुपया

# ऑपरेशन लक्ष्मीरोड : ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर

‘ऑपरेशन लक्ष्मीरोड ’चे स्वागत अपेक्षेपेक्षा खूपच अधिक झाले. हे खरे, की या स्वागतात चिकित्सेपेक्षा कौतुकाचाच भाग अधिक होता. बहुतेकांनी कौतुक व्यक्त केले ते एका वैशिष्टयाबद्दल. सहसा निदर्शने, मोर्चे वगैरेत भाग न घेणारा, रस्त्यावर न उतरणारा मध्यमवर्ग या चळवळीत पुढे होता, याबद्दल. वास्तविक हे काही या चळवळीचे प्रमुख वैशिष्टच नाही. ज्या ग्राहक संघाच्या वतीने ही चळवळ चालविण्यात आली तो नुकताच दोन-तीन महिन्यापूर्वी स्थापन झालेला होता. ग्राहकसंघसभासदांची संख्या मर्यादित होती. मुख्यत: पुण्यातील गरीब मध्यमवर्गातले सर्व सभासद होते. त्यामुळे चळवळीत ओघानेच हा वर्ग अधिक संख्येने सहभागी झाला. थोडा अधिक काळ जाऊ दिला असता तर कामगारवर्ग, झोपडपट्टीतल नागरिक यांचाही समावेश चळवळीत होणे अशक्य नव्हते. कारण चळवळीची मागणी मध्यमवर्गीय नव्हती; चळवळीचे उद्दिष्ट व्यापक होते. सर्वांनाच आवाहन करणारे होते—पटणारे होते. चळवळीमागची भूमिका व्यक्त करणारे पत्रक सुरुवातीला वाटण्यात आले होते. त्यात म्हटले आहे—

‘कापड गिरण्यांना यंदा प्रचंड नफा झालेला आहे.

या नफ्यातील फार थोडा वाटा बोनसरूपाने कामगारांना मिळाला.

खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांना, कापूस उत्पादकांना काहीच मिळाले नाही.

पृष्ठ २ वर



## ऑपरेशन लक्ष्मीरोड : पृष्ठ १ वरून

आणि कापड खरेदी करणाऱ्या ग्राहकांना ?

यांना कुणी विचारीतच नाही.

वास्तविक भरमसाठ भाव देऊन या विखुरलेल्या, असघटित ग्राहकवर्गानेच गिरणीमालकांच्या तिजोऱ्यात प्रचंड नफे ओतलेले आहेत.

गेल्या वर्षभरात सर्व तऱ्हेच्या कापडांचे भाव किती वाढावेत याला काही ताळतंत्रच राहिलेले नाही. पचवीस-तीस रुपये मोजल्याशिवाय साधा शर्ट-पायजमा होत नाही, की चाळीस-पन्नास रुपयांखाली एकादी बऱ्यापैकी साडी मिळत नाही. धोतरजोडी तर चैनीची वस्तू ठरावी इतकी महागली आहे.

सर्वसामान्य परिस्थितीतल्या माणसाला कापडबाजाराकडे फिरकण्याची सोय राहिलेली नाही, इतके सर्व तऱ्हेच्या कापडांचे भाव भडकलेले आहेत.

ग्राहक-उत्पादक लुटले जात आहेत. गिरणीमालक, अधलेमधले दलाल दुकानदार यांची मात्र चंगळ चालू आहे.

कापड ही एक जीवनावश्यक वस्तू आहे व जाडाभरडा का असेना, अंगभर कपडा प्रत्येकाला रास्त व परवडणाऱ्या भावात मिळाला पाहिजे अशी मागणी निर्धारपूर्वक करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे.

या मागणीसाठी ' ऑपरेशन लक्ष्मीरोड ' हा कार्यक्रम योजण्यात आलेला आहे.

कार्यक्रम अगदी साधा पण परिणामकारक आहे. दिनांक ३१ ऑक्टोबर (७४) सायकाळ ते ३ नोव्हेंबर सायकाळ या तीन दिवसात कुणीही, कसलेही कापड विकत घेण्यासाठी लक्ष्मीरोडवर किंवा अन्य ठिकाणच्या कापड दुकानात पाऊलसुद्धा टाकावयाचे नाही. तीन दिवस कापड बाजारावर लोकानी स्वयस्फूर्त बहिष्कार टाकावयाचा आहे. प्रमुख दुकानांवर शांततापूर्ण निदर्शनेही (Picketing) करावयाची आहेत.

कोट्यवधी जनता ज्या देशात उघड्यानागड्या स्थितीत रहात आहे त्या देशात हा तीन दिवसाचा बहिष्कार म्हणजे फार मोठा त्याग आहे असे नाही. पण चालू उत्पादन व वितरण व्यवस्थेसबधी आपला निषेध परिणामकारकरीत्या नोंदविण्याचा दुसरा सरळ मार्ग सध्यातरी कुणाच्या दृष्टिपथात नाही. म्हणून हा कार्यक्रम सर्वांनी उचलून धरला पाहिजे.

तीन दिवस सपूर्ण विहार बद ठेवून जयप्रकाशांनी भ्रष्टाचार–महागाई–बेकारी विरुद्ध सर्वत्र चालू असलेल्या आदोलनातील एक नवा उच्चांक स्थापन केलेला आहे निदान तीन दिवस लक्ष्मीरोड बद ठेवून पुणेकर स्त्री-पुरुष नागरिकानी भ्रष्टाचार–महागाई–बेकारी विरोधी लढ्यातील आपला अल्पसा वाटा का उचलू नये ?'......

मध्यमवर्गानेच उचलून धरावी अशी काही ही भूमिका नाही. परिवर्तनासाठी देशभर सुरू असलेल्या आदोलनाशी या भूमिकेचे काहीएक नाते आहे. एका टोकाला उत्पादकाचा विचार आहे. दुसरे टोक ग्राहकाच्या हातात दिले आहे. आपल्या अर्थव्यवस्थेवरील दलालमध्यस्थ वर्गाची पकड सैल करणे हे व्यापक उद्दिष्ट म्हणून सांगितलेले आहे. कारण भाववाढ–महागाई व आर्थिक अरिष्ट याचे हे आपल्याकडील एक प्रमुख कारण आहे. अनुत्पादक घटकांचे वर्चस्व आपण कमी करीत नाही तोवर भाववाढ–महागाई आपल्याला रोखता येणार नाही या मागील विचाराचे सूत्र आहे. कापडाचे भाव उतरवणे, पंचवीस-तीस टक्क्यानी खाली आणणे हे ' ऑपरेशन लक्ष्मीरोड 'चे अगदी ढोबळ, तात्कालिक व वरवरचे उद्दिष्ट होते. मुख्य हेतू होता आपल्या दलाली अर्थव्यवस्थेच्या एकाद्या मोक्याच्या ठिकाणावर लहानसा प्रहार करण्याचा. हा प्रहार करण्यात आज शहरातील मध्यमवर्ग पुढ आला एवढेच. पण उद्या इतरांनाही आपापल्या जागेवरून असे लहानमोठे प्रहार करावे लागणार आहेत. त्याशिवाय परिवर्तनाची आशा बाळगणे व्यर्थ आहे. म्हणूनच मध्यमवर्गीयत्व हे काही या ऑपरेशनचे प्रमुख वैशिष्ट्य ठरू नये. आशय महत्त्वाचा. कोण माणसे, कुठला वर्ग पुढ येतो हा भाग गौण समजायला हवा.

स्त्रिया अधिक सख्येने या आदोलनात उतरल्या हेही वैशिष्ट्य म्हणून कुणी सागतात. पण स्त्री-पुरुष हा फरकही याबाबतीत तसा विशेष महत्त्वाचा नाही. अलीकडे अनेक क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर आहेत. अगदी आदिवासी भागातील आंदोलनातही स्त्रिया उत्साहाने भाग घेताना दिसतात.

ग्राहक चळवळीने जो प्रतिकाराचा फणा काढला, बहिष्काराचे जे शस्त्र उपसले ते वास्तविक या 'ऑपरेशन'चे मुख्य वैशिष्ट्य आहे. तशी ग्राहक चळवळ महाराष्ट्रात काय किंवा भारतात इतरत्र काय नवीन नाही. ग्राहकांसाठी सहकारी भांडारे आजवर बरीच चालवली गेली आहेत. पण हा फक्त वस्तूंच्या वाटपाचा प्रयत्न होता. पुण्यात प्रथमच हे घडले, की ग्राहक चळवळीने ही आपली जुनी मर्यादा ओलांडली आणि आक्रमक धोरण स्वीकारले. मिळतील त्या भावात, मिळतील तितक्या वस्तूचे समान वितरण करण्यावर समाधान न मानता पुण्यातील ग्राहक सघटित होऊन प्रथमच म्हणू लागले, की जीवनावश्यक वस्तूचे भाव सर्वसामान्य माणसाला परवडतील असे असले पाहिजेत. चालू भावातली वाढ गैर आहे, नफेखोरीमुळे ती अवास्तव व बेफाट वाढलेली आहे, ही नफेखोरी कमी झाली पाहिजे. यासाठी उत्पादन व वितरण तत्रात व यत्रणेत जे दोष असतील ते काढून टाकले पाहिजत, हे होत नसेल तर आम्ही यासाठी चळवळ करून, बहिष्कारापासून सत्याग्रहापर्यंत प्रतिकाराचे सर्व मार्ग हाताळू. ऑपरेशन लक्ष्मीरोडचे नाविन्य या ग्राहक चढाईत आहे, ग्राहकशक्तीच्या या लढाऊ आविष्कारात आहे. ग्राहक चळवळ येथे प्रथमच वयात आली असेही म्हणता येईल. दहा-वीस टक्क्यानी कापडाचे भाव उतरले हे या चळवळीचे अगदी मामुली यश आहे. ग्राहकाचा आत्मविश्वास जागा झाला, त्यांना आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय आला, हे यश अधिक मोलाचे, महत्त्वाचे. निघाल्यापासून अवघ्या दोन अडीच महिन्यात तिने यशाचा हा टप्पा गाठावा, ही विजयी झेप घ्यावी हे निःसशय चळवळीच्या सघटकाना भूषणावह आहे.

सघटक मुख्यतः युवक होते. एकीकडे या युवकवर्गाने ग्राहक

चळवळीला जसे चढाईचे आक्रमक स्वरूप दिले तसेच दुसरीकडे तिच्या रचनात्मक स्वरूपाचेही भान ठेवले. नूतन मराठी विद्यालयाच्या आंगणात या युवकांनी चालवलेली पर्यायी जनता कापड पेठ हा युवकाचे वय व अनुभव लक्षात घेता खरोखरच एक भव्य व धाडशी प्रयोग होता. मागे डॉक्टराच्या संपाच्या वेळी रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून पुण्यात दोन-चार ठिकाणी रस्त्यावरच रुग्णसेवेची केंद्रे काही तरुण डॉक्टरमंडळीनी चालवलेली होती. त्याच धर्तीचा पण अधिक मोठ्या प्रमाणावरचा हा नू. म. वि. मधील पर्यायी कापड-पेठेचा प्रयोग म्हणता येईल. आठवडाभर ही पेठ भरभरून वहात होती. लाख-दीड लाख ग्राहक तरी या कालावधीत पेठेला भेट देऊन गेले असावेत. आठवडाभराच्या विक्रीचा आकडा दहाबारा लाखाच्या घरात गेला होता. या आकडेवारीपेक्षाही या प्रयोगामागील योजकता, व्यवहारकौशल्य, जबाबदारीची जाणीव व धडाडी याचे मोल विशेष आहे. सातआठ दिवस अशी पर्यायी कापड पेठ युवक संघटित करू शकतात, पैचीही अफरातफर न होता लाखो रुपयाच्या उलाढाली पार पडू शकतात ही एकूण युवक चळवळीलाच भूषण आणणारी घटना आहे. ठाणे जिल्ह्यातील मनोरजवळ आदिवासींच्या आर्थिक-सामाजिक पुनरूत्थानाचे कार्य करणारे 'भमिपुत्र प्रतिष्ठान 'चे आबा करमरकर याचा युवक चळवळीवरील एक नेहमीचा आक्षप आहे. युवक संघर्षाला उत्सुक असतात, पण रचनात्मक काम म्हटले की बिचकतात, त्यातला तपशील, आकडेवारी, आ थक गुंता त, किचकट व्यवहार त्यांना मानवत नाही. या जंजाळापासून लांब राहण्याची युवक संघटनाची व त्यांच्या नेत्यांची प्रवृत्ती असते. पुण्यातील युवकानी वेळप्रसंगी आपण हे व्यावहारिक उलाढालीचे आव्हानही यशस्वीरीत्या पेलू शकतो हे या पर्यायी कापड पेठेच्या प्रयोगाने निश्चितच सिद्ध करून दाखविले आहे. यापूर्वीही तेल, तूप इत्यादी जीवनावश्यक वस्तूच्या वाटपाचे लाखो रुपयांचे व्यवहार या युवकानी उरकले होते; त्यामुळे ही कापड पेठ चालविणे हा त्यांच्या हातचा मळ ठरावा हे साहजिकच आहे. पण योग्य त्या बिंदूवर थांबणे, व्यवहाराच्या फापटपसाऱ्यात गरजेपेक्षा अधिक न अडकणे, व्यापक उद्दिष्टांवरची नजर ढळू न देणे याही गोष्टीना चळवळीत फार महत्त्व असते. केवळ लाखो रुपये मोलाचे विधायक कार्य आजवर अनेकांनी अनेक ठिकाणी केलेले आहे. अनेक करीतही आहेत. केवळ संघर्षात्मक चळवळीही पेटतात आणि विझतात. या दोन्ही बाजूवर व्यवस्थित पकड जमवणे अवघड असते. पुण्यातील युवकानी व त्याच्या मागे उभ्या राहिलेल्या असंख्य स्त्री–पुरुष नागरिकांनी ही पकड ऑपरेशन लक्ष्मीरोडद्वारा उत्तम तऱ्हेने जमवून दाखवली यात काही शंका नाही. रचनात्मक संघर्षाचा हा एक वस्तुपाठच होता.

ग्राहकांनी बहिष्काराचे शस्त्र पुन्हा पुनः उपसले, कापड भाव गडगडू लागले तर एक नवेच संकट या ग्राहकचळवळीसमोर उभे रहाण्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्यात मुंबईच्या वृत्तपत्रात एक वार्ता झळकली आहे. वार्तेत म्हटले आहे–

'कमला मिलची तिसरी पाळी बंद झाली. श्रीराम मिलची तिसरी पाळी ६ डिसें पासून बंद करण्यात येईल अशी नोटीस लावण्यात आली आहे. ब्रॅडबरी मिल बंद पडण्याच्या मार्गावर आहे. व आजच अर्धी-अधिक गिरणी बंद झालेली आहे.

'फिनिक्स, हिंदुस्थान मिल, क्राऊन मिल, इंदू ग्रुप इत्यादी गिरण्यात खातीच्या खाती बंद करून सर्व बदली कामगारांना महागाईच्या काळात रस्त्यावर फेकण्यात आले आहे'...

या बेकारी विरुद्ध कापडगिरणीकामगाराच्या संघटना जो काही लढा देतील तो हवाच आहे. परंतु ग्राहक चळवळीलाही हे एक आव्हानच आहे. कापडांचे भाव तर उतरले पाहिजेत पण कामगारही बेकार होता कामा नये, अशी या चळवळीची यापुढील मांडणी हवी. नाहीतर ग्राहक चळवळ कामगार विरोधी आहे असा खोडसाळ प्रचार करण्याची एक आयतीच संधी विरोधकांना मिळेल व सुरुवातीपासूनच चळवळ धोक्यात येईल, तिची वाढ खुटेल. 'ऑपरेशन लक्ष्मीरोड 'मध्येही हा एक अंतर्विरोध होता झगमगाट कमी करा, भाव खाली आणा असे ग्राहकांनी म्हटल्यावर मालकानी आपल्या दुकानातील नोकरवर्गाकडे वक्र दृष्टीने पाहायला सुरुवात केली. असे अंतर्विरोध प्रत्येक चळवळीत असतात, सुरुवातीला नसले तरी पुढे उत्पन्न होतात. चळवळीची उद्दिष्टे स्पष्ट असली तर हे अंतर्विरोध कमी करण्याचे मार्गही निघत राहातात. म्हणूनच पुण्यात सुरू झालेल्या ग्राहक चळवळीला आपली उद्दिष्टे व ती गाठण्याचे मार्ग यासंबधी काही निश्चित भूमिका यापुढे घ्यावी लागणार आहे. मिळालेले यश कमी नाही. खूप उत्साहवर्धक आहे. पण पुढची वाटचाल अधिक कठीण आहे, गुंतागुंतीची आहे. केवळ उत्साह व संघटनाकौशल्य या वाटचालीत पुरेसे ठरणार नाही. विषम अर्थव्यवस्थेच्या मर्मावर आघात करण्याची क्षमता चळवळीत यावी हे जर ग्राहक चळवळीचे अखेरचे उद्दिष्ट असेल तर उत्पादकाशी लवकरात लवकर नाते जोडण्याचा प्रयत्न व्हायला हवा, मग तो उत्पादक खेड्यातील कापूस पिकवणारा शेतकरी असो की शहरातील कामगार असो. कामगार शेतकऱ्याला बरोबर घेऊनच चळवळीची पुढची वाटचाल व्हायला हवी. मालक जर गिरण्या बंद करीत असतील, कामगारांना रस्त्यावर फेकीत असतील तर ग्राहक चळवळीने कामगारांच्या पाठिशी उभे राहून शक्य तो दडपणे आणली पाहिजेत, त्याच्या नफेखोरी-विरुद्ध आवाज उठवला पाहिजे, व कामगारांना बेकारीच्या खाईत ढकलणारे, गिरण्यामधील नफेखोरीवर आधारलेले उत्पादनतंत्र व अंतर्गत यंत्रणा बदलायला लावली पाहिजे. हे होत नसेल तर कामगारांना गिरण्यांचा ताबा घ्यायला प्रवृत्त केले पाहिजे व या कामगारसंचलित गिरण्यांना बाजारपेठ मिळवून देण्याचे आश्वासन ग्राहक चळवळीने दिले पाहिजे. खादीचे पुनरुज्जीवन आजच्या काळात जसेच्या तसे शक्य नाही, अवश्यही नाही. परंतु त्यामागचा विचार ध्यानात घेऊन संपूर्ण कापड धंद्याचीच पुनर्घटना करण्याची मागणी कालानुरूप ठरेल, त्याप्रीत्यर्थ होणारी चळवळ नवीन व क्रांतिकारकही मानली जाईल. असा सगळा दूरदृष्टीचा विचार करून ग्राहक चळवळीचा पुढचा टप्पा निश्चित केला जावा. तो केवळ भाववाढ-महागाईविरोधी चळवळ न ठेवता अर्थव्यवस्थेला इष्ट ते वळण देणारी चळवळ म्हणून उभारली जावी. अशी उभारणी वास्तविक कामगारसंघटनाकडून अपेक्षित आहे. पण आज या संघटना आपले क्रांतिकारकत्व हरवून बसल्या आहेत. ग्राहक चळवळीने हे निशाण आता आपल्या खांद्यावर घ्यावे– काळ फार अनुकूल आहे. □

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ३० नोव्हेंबर | अंक : सत्ताविसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किमत : एक रुपया |


## प्रा. दामोदर धर्मानंद कोसंबी यांचे कार्य

सपादक ' माणूस '

◻ ' माणूस 'चा दिवाळी अक वाचायला घेतला होता. रवींद्र पिंगे याचा ' सावरकराचा मुलगा ' लेख प्रथम वाचला. खुद्द लेखाबद्दल बरेच काही लिहिता येईल पण ते नतर केव्हातरी. मी मुख्यत: लेखाच्या शेवटी लेखकाने प्रख्यात पिता-पुत्राच्या जोडयाचे उल्लेख केलेत त्यातील ' कोसबी 'सबधी केलेल्या विधानाबद्दल बोलतो आहे. धर्मानंद कोसबीच्या मुलाबद्दल– ' प्रा. दामोदर धर्मानद कोसंबीबद्दल श्री. पिंगे ह्यांनी केलेले विधान– (मुलगा अचाट गणिती झाला. पण बापाच अफलातून देवपण त्याच्यात दिसेना. हा बाधा आहे) फार उथळपणे केले आहे असे मला वाटते. विशेष म्हणजे बापाबद्दलही ' ते जन्मजात फकीर होते ' असे ते लिहितात. पण ते जाऊ दे. तर ह्या मुलाने गणिती झाल्यावर काय केले हे सर्वसामान्य वाचकाला माहिती नसले तरी इतिहास, समाजशास्त्र, प्राच्यविद्या सशोधन, उत्खननशास्त्र, नाणकशास्त्र, सख्याशास्त्र ह्या विषयात सशोधन– अभ्यास करणाऱ्या अव्वल दर्जाच्या विद्वानाना प्रा. कोसबी यांनी केलेल्या कामाची कल्पना निश्चितच आहे. भारताच्या प्राचीन इतिहासाची व काही प्रमाणात मध्ययुगीन इतिहासाची आधुनिक, वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून साकल्याने मीमासा करण्याची पद्धत पहिल्या प्रथम प्रा. कोसबीनी घालून दिली.

भारताचा इतिहास म्हणजे तरी काय ? केवळ काही राजे-राण्यांच्या कारवायांची अथवा सेनानीच्या युद्धनैपुण्याची हकीकत म्हणजे इतिहास असे म्हणता येईल का ? किंवा अमूर्त धार्मिक कल्पनावर पाल्हाळिक भाष्य करून, आमचे पूर्वज सूक्ष्म विचार करीत असत असा पोकळ गौरव करीत बसणे याला तरी इतिहास म्हणता येईल का ? या दोनही प्रश्नाना प्रा. कोसबीनी नकारार्थी उत्तर दिले.

भारतीय समाजाने–विशेषत: आर्यांच्या आगमनानतर–उत्पादनाच्या साधनात कालक्रमाने बदल कसे घडवून आणले, त्यानुसार सामाजिक सबध कसे प्रस्थापित झाले, आर्य व अनार्य यांच्या जीवन-पद्धतीत व सस्कृतीत सतत देव-घेव कशी होत गेली, त्यातून निर्माण झालेल्या जातिसंस्थेसारख्या संस्थेमुळे ग्रीक अथवा रोमन पद्धतीची गुलामगिरी या देशात कशी रुजली नाही, बुद्ध धर्माचा उदय जसा या देशात झाला, तसाच त्याचा ऱ्हासही या देशात कसा व का झाला, गोत्र पद्धतीचा उगम व वैशिष्ट्ये कोणती, प्राचीन सस्कृत अथवा पाली साहित्याचे वाचन, इतर सशोधन पद्धतीचे (उत्खनन, नाणकशास्त्र, समाजशास्त्र इ.) किमान आवश्यक तेवढे ज्ञान अवगत करून केले तरच त्यात समाजस्थितीचे प्रतिबिब उमटलेले कसे दिसते, या व अशा समस्याचे साधार विवेचन करून भारतीय इतिहासाच्या मांडणीला शास्त्रीय बैठक प्रा. कोसबीनी प्राप्त करून दिली. या त्यांच्या बहुमोल कामगिरीसबधी पुष्कळच लिहिण्यासारखे आहे. किंबहुना हे त्यांचे सर्व लिखाण इग्रजीतून असल्यामुळे त्याच्या सशोधन-कार्याचा परिचय मराठीतून करून देण्याचे बाबतीत ' माणूस 'ने पुढाकार घेणे उचित ठरेल.

अनुवशशास्त्राचा अभ्यास करणारांना ' कोसंबी थिअरम् 'चा उपयोग होतो हे त्या शास्त्रातील जागतिक तज्ज्ञांना परिचित आहे. सख्याशास्त्राच्या साहाय्याने नाणकशास्त्राचा अभ्यास केल्यास त्यातून निघणारे निष्कर्ष हे अधिक काटेकोर व विश्वासार्ह ठरतात, हे प्राध्यापक कोसबीनी शेकडो प्राचीन नाण्याची वजने-मापे घेऊन, त्यांचा काल-निर्णय करून दाखवून दिले. प्रा. कोसबी अचाट गणिती होते हे श्री. रवीन्द्र पिंगे याना माहीत आहेसे दिसते. गणितातील सशोधनात्मक लिखाणाकरिता त्यानी एकदा रामानुजन् व नतर भाबा पारितोषिक मिळविले होते. तसेच १९४९ साली अमेरिकेतील व्याख्यान-दौऱ्यावर असताना त्यानी गणितातील कूट समस्यावर प्रा. आईन्सटाईन व व्हेबलेन याच्याशी चर्चा केली होती हे माहीत झाल्यास, त्याच्या सशोधनाची नाही तरी सशोधनाच्या दर्जाची कल्पना यावी असे वाटते.

असा हा अष्टपैलू, सव्यसाची, प्रतिभावान शास्त्रज्ञ परदेशात राहिला असता तर त्याचे गुणवर्णन आपण भारतीयानी कदाचित् मुक्तकठाने केले असते. परतु बालवयात अमेरिकेला गेल्यानतर कष्टाच्या नोकऱ्या करून त्यानी विद्यार्थीदशा घालविली व सर्व परीक्षात सदैव अग्रक्रम व मानाची पदके मिळविली. पदवी मिळविल्यानतर चागल्या पगारावर नोकरी करण्याची सधी असूनही या प्रलोभनाचा मोह, हेतुत: टाळून, स्वातत्र्याचे आदोलन चालू असलेल्या भारतात ते परत आले व शिक्षणकार्यास व विद्याव्यासगास स्वत:ला वाहून घेतले. भारतातील शास्त्रीय सशोधन हे पाश्चात्याच्या उथळ अधानुकरणावर अधिष्ठित असू नये यावर त्यानी वेळोवेळी भर दिला. केवळ बदिस्त खोलीतील विद्वान् न रहाता खांद्यावर खादी टाकून खादीचा प्रचार व विक्री त्यानी काही काळ केली. दुष्काळग्रस्ताना स्व-खर्चाने स्वत: जाऊन अन्न दिले. अणुशक्तीच्या भीषण परिणामाची दखल घेऊन, जागतिक शांतता प्रस्थापनेच्या मोहिमेतील प्रचारकार्याचा वाटा त्यानी उचलला. प्रचलित आर्थिक व राजकीय प्रश्नावर अधून मधून वैचारिक स्फुट लिखाणही त्यानी केलेले आहे.

' बापसे बेटा सवाई 'च्या जोडीत जो वस्तुत: बसू शकेल अशा या थोर शास्त्रज्ञाचा येथील सुशिक्षितानाही परिचय नसावा ही खेदाची गोष्ट नव्हे काय ? ज्या पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये ' प्रा. कोसबीनी सुमारे १४ वर्षे शिकविले, ज्या कॉलेजात त्यांच्या वडिलांनी व बुद्धिमान सुकन्येनेही शिकविले त्या कॉलेजला १९६६ साली प्रा. कोसबीच्या निधनानतर सुटीही देण्यात आली नाही की विद्यार्थ्यांना त्यांच्या कामगिरीची रूपरेषाही सांगण्यात आली नाही हे लक्षात घेतले म्हणजे फार वाईट वाटते.

पुरुषोत्तम पानसे, पुणे

# सोलकढी

## □ दांडदांडगा क्रिकेटियर

भारतीय क्रिकेटसंघाचा कर्णधार म्हणून लागोपाठच्या तीन कसोटीमालिकेत विजय मिळविल्यानंतर आणि एकीत पराजय मिळविल्यानंतर श्री. अजित लक्ष्मण वाडेकर (३३) भले निवृत्त झाले. भारतात कोणत्याही निवृत्तीनंतर एखादे पर्व तरी संपत असते किंवा एखादे युग तरी अस्ताला जात असते. अजित वाडेकरच्या निवृत्तीनेसुद्धा भारतीय क्रिकेटमधले एक पर्व संपले आहे, एक युग अस्ताला गेले आहे ! असो. निवृत्त होताना अजित वाडेकरने, जबाबदारीने आणि दूरदृष्टीने, आपला योग्य, उचित आणि स्वाभाविक वारस म्हणून सुनील गावस्कर किंवा गुंडाप्पा विश्वनाथ यांची शिफारस केली होती. कारण त्याने आमच्या वसंत कानेटकरांचे 'जेव्हा रायगडला जाग येते' हे नाटक पाहिले होते, इतकेच नव्हे तर त्यापासून बरा बोध घेतला होता.

पण आपुल्या निवडसमितीला त्याचे काय होय. कोणी काही सांगितले म्हणून तिने ऐकावे काय ? अजित वाडेकर हरत असताना तिला मन्सूरअलीखान पतौडीच्या फंदी फलंदाजीची आणि नबाबी नेतृत्वाची सारखी याद येत होती. म्हणून तिने पतौडीची भारतीय संघाचा कर्णधार म्हणून नव्याने निवड केली. बरे, काय योगायोग पाहा, पतौडीसुद्धा परदेश-दौरे करायला नेमका आत्ताच मोकळा होऊ शकला होता; तसे त्याने क्रिकेट नियामक मंडळाला कळवून टाकले होते. शिवाय घरगुती व्यापातूनदेखील त्याची नेमकी आत्ताच, म्हणजे अजित वाडेकर घरगुती व्यापामुळे निवृत्त होतानाच, सुटका होऊ शकत होती.—आणि पतौडी म्हणजे केवढा दांडदांडगा क्रिकेटियर. बोलूनचालून खानदानी, कलंदर रक्त. ऑक्सफर्ड विद्यापीठाचा माजी कर्णधार. जागतिक क्रिकेट संघाचे नेतृत्व केलेला बेगम शर्मिला टागोरचा बादशहा. (हे वर्णन वाचणाऱ्या पु. भा. भावे यांना जो मनस्ताप होईल त्याबद्दल 'अनंतराव' येथेच दिलगिरी व्यक्त करीत आहेत.) ए. एफ्. एस्. ऊर्फ बॉबी तल्यारखानचा अलिकडच्या काळातला सर्वांत लाडका क्रिकेटपटू. अहाहा. अहाहा. एकाक्ष असूनही सहस्राक्ष; आक्रमक असूनही सावध; फटकेबाज असूनही, प्रसंगी, पाच धावांसाठी एकशेपाच मिनिटे लावणारा चिक्कटबाज; विजयाचा धोका न पत्करता पराजयाशी झुंजणारा; नेता असूनही अनुयायी; असा मन्सूरअलीखान पतौडी पुन्हा एकदा कर्णधार झाला आहे. तो विजयी झाला तर ठीकच आहे; पराजयी झाला तर त्याच्या घरचा व्याप वाढवून त्याला निवृत्त करणे फारसे अवघड जाणार नाही.

मला मात्र सध्या अजित वाडेकरच्या त्या डावखोऱ्या फलंदाजीची आणि त्या डावखोऱ्या नेतृत्वाची राहून राहून सारखी याद येते आहे ! ¤

## □ नामजोशी कसे आणि कुठे गेले

महाराष्ट्र हे सतत विकास पावणारे आणि उत्कर्षाप्रत जाणारे एक सावध-शहाणे राज्य आहे हे पटायला 'लोकराज्य'सारखी सरकारी मुखपत्रेच पाहायला हवीत असे थोडेच आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या कोणालाही त्याचा जिताजागता प्रत्यय सहज येतो. याचे श्रेय अर्थात इथल्या योजनाभावी व उपक्रमशील सरकारला द्यायला पाहिजे. (मी ते देतो.) महाराष्ट्र सरकारने नुकतेच काय केले ते पाहिलेत ना. अखिल महाराष्ट्रात आनंदवनभुवन निर्माण केल्यानंतर सरकारचे लक्ष स्वतःकडे गेले. तेव्हा सरकारला काय बरे वाटले ? सरकारला दिसले की, एवढ्या मोठ्या महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ केवढे छोटेसे आहे; त्यात वाढ करायलाच हवी; लोककल्याणकार्यात काही कमी पडायला नको.

आणि महाराष्ट्र सरकारने मंत्रिमंडळात घसघशीत घाऊक वाढ केली. कोऱ्याकरकरीत काहींना मंत्रिपदे मिळाली. बऱ्याच जुन्यांना बढती मिळाली. मुख्यमंत्री वसंतराव नाईकांना मुख्यमंत्रिपद मिळाले. सगळे कसे छानछुनछनम झाले. वेडीवाकडी एकच गोष्ट झाली : आमच्या पुण्यश्लोक, शून्यपाप, ज्ञानसूर्य अनंत नामजोशींना अर्धचंद्र मिळाला. अरेरे, असे व्हायला नको होते.

अहो, अनंत नामजोशी म्हणजे केवढा टॉलेजंग माणूस. परमेश्वरालाच काय पण पंतप्रधानांनासुद्धा न भिणारा मंत्री महाराष्ट्राच्या शिक्षणव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारा प्रति मधुकरराव चौधरी. कविवर्य तांबे-जन्मशताब्दीच्या निमित्ताने अनेक 'तांबे' तयार करू पाहणारा प्रतिभाशाली, कल्पक कारखानदार. दुभत्या गुरासाठी नवे पौष्टिक खाद्य सिद्ध करणारा गोब्राह्मणप्रतिपालक संशोधक. याने आयुष्यात सगळे केले; फक्त पाप केले नाही. असा हुर्मुजी मोतीदाणा महाराष्ट्र मंत्रिमंडळातून गळाला कसा, या प्रश्नाचे उत्तर महाराष्ट्रातली रिकामटेकडी व उद्योगटेकडी मंडळी शोधून राहिली आहेत.

कोणी म्हणताव, हे सगळे त्या रजनीभायचे कारस्थान आहे. कोणी म्हणतात, नामजोशींचे जन्मब्राह्मण्य त्यांच्या मुळावर आले. कोणी म्हणतात, 'महाराष्ट्र टाईम्स'च्या आगपाखडी अग्रलेखांनी शिक्षणमंत्र्याचे मेण केले. कोणी म्हणतात, शिवराज्याभिषेक त्रिशतसांवत्सरिक उत्सवात, मंत्रिमहाशयांनी गो. नी. दांडेकरांपुढे जे लाचार व हांजीहांजीखोर वर्तन केले ते प्रतिष्ठेला साजेसे नव्हते, म्हणून त्यांना काढले. कोणी म्हणतात, अनंतराव डावखोरे होते ही गोष्ट त्यांच्या विरुद्ध गेली. कोणी म्हणतात, पाईप ओढणाऱ्या वसंतराव नाईकांना तपकीर ओढणारे अनंतराव नामजोशी चालणे शक्यच नव्हते. कोणी असे म्हणतात. कोणी तसे म्हणतात. (म्हणा वाटेल ते. म्हणणाऱ्याचे तोंड म्हणणाऱ्याला थोडेच मिटवता येते ?)


माझे म्हणणे नेहमीप्रमाणे आगळेवेगळेनिराळे आहे. मला आपले वाटते की, अनंतराव नामजोशींइतक्या पुण्यश्लोक, शून्यपाप सज्जनाला मंत्रिमंडळात ठेवणे एकूणच अडचणीचे होते. याचा अर्थ महाराष्ट्र मंत्रिमंडळातली बाकीची दरोबस्त असामी अपुण्यश्लोक, अशून्य पाप आहे, असे मला दूरान्वयाने देखील सुचवायचे नाही. तीही सगळी पुण्यश्लोक, शून्यपापच आहेत. पण नामजोशींचे पुण्यश्लोकत्व आणि शून्यपापत्व काही अलौकिकच होते. म्हणजे असे की 'मी पुण्यश्लोक आहे'... 'मी शून्यपाप आहे' असे स्वतः नामजोशीच जोशिल्या आवाजात आक्रोशत असत. त्यामुळे लोकांना त्यांच्याबद्दल उगाचच संशय येऊ लागला होता. पुढे हा संशय नामजोशींकडून त्यांच्या सहकाऱ्यांकडे वळला नसता कशावरून ? संशय तो. तो काय, वाटेल तेथे वळू आणि वळवळू शकतो. आणि हे, नाही म्हटले तरी, एकूणच अडचणीचे होते. म्हणून संधी सापडल्याबरोबर महाराष्ट्राच्या या शिक्षणशार्दूलाला, काँग्रेसच्या या इमानी व एकनिष्ठ शिपायाला रजा देण्यात आली. नामजोशी असे गेले.

नामजोशी कसे गेले हे सांगितले मी तुम्हाला. खरे म्हणजे नामजोशी कसे गेले यापेक्षा ते कुठे गेले, हे सांगायला मला अधिक आवडले असते, पण ते असो.

—अनंतराव

विमेदारांच्या हितासाठी:

# तुमच्या पत्त्यात बदल झाला तर आयुर्विमा महामंडळाला ताबडतोब खबर द्या



## त्यामुळे तुमची विमा रक्कम लौकर परत मिळण्यास मदत होईल.

आयुर्विमा महामंडळाकडे नोंद असलेल्या पत्त्यावर 'विमेदार आढळत नाही' या एकमेव कारणामुळे अनेक दाव्यांची परतफेड अजिबात करता येत नाही किंवा ती उशिरा होते. आपला बदललेला पत्ता आयुर्विमा महामंडळाला कळवणं, हे विमेदार या नात्यानं तुमच्याच हिताचं आहे.

विम्याची रक्कम लौकर मिळण्यासाठी तुम्हाला आणखीही काळजी घेता येईल. पॉलिसीवर वारस नेमा. वयाचा दाखला सादर करून तुमचे वय मान्य करून घ्या. विमा हप्ता वेळच्यावेळी आणि योग्य कचेरीत भरा.

तुमची पॉलिसी चालू आणि व्यवस्थित आहे, याची खात्री करून घेण्यासाठी ज्याच्याकडे तुम्ही पॉलिसी घेतलीत त्या विमाएजंटाचे साहाय्य घ्या किंवा आयुर्विमा महामंडळाच्या नजिकच्या कचेरीशी संपर्क साधा.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

RADE/US/LIC/AS-2

# रशिया-चीन संबंध

वा. दा. रानडे

गेल्या सात नोव्हेंबरला रशियन क्रांतिदिनास पेकिंगने पाठविलेल्या शुभेच्छा सदेशाने या दोन बडया कम्युनिस्ट राष्ट्रातील सघर्ष सपून सलोख्याचे व सहकार्याचे सबध प्रस्थापित होण्याचे दृष्टीने पावले पडणार काय असे अदाज केले जात आहेत. दोन्ही देशांचे सबंध सुधारण्याची खरोखर कितपत शक्यता आहे आणि केवळ जागतिक कम्युनिस्ट चळवळीवरच नव्हे तर जागतिक राजकारणावर त्याचे काय परिणाम होतील हे प्रश्नं महत्त्वाचे आहेत.

चीनने पाठविलेला सपूर्ण सदेश रशियन वृत्तपत्रातून आणि रेडिओवरून प्रसिद्ध करण्यात आला नाही. रशियाशी अनाक्रमण कराराची सूचना या सदेशात केलेली होती पण रशियन वृत्तपत्रे व रेडिओवरील सदेशात नेमकी ही सूचनाच गाळून टाकण्यात आली. अनाक्रमण करार चीनला हवा आहे पण रशियाला नको आहे असा याचा अर्थ लावायचा काय? अनाक्रमण करार रशियाला नको आहे असे नाही, कारण अशा कराराची सूचना काही वर्षांपूर्वी रशियानेच चीनकडे केली होती. चीनने त्यावेळी ती फेटाळून लावली. यावेळी चीनच्या सूचनेवर रशियाने मौन स्वीकारले याचे कारण चीनच्या अटीवर असा अनाक्रमण करार रशियास नको आहे. रशिया आणि चीनमध्ये १९६९ मध्ये सीमा चकमकी झाल्यापासून अशा प्रकारचा समझोत्याची तयारी दर्शविणारा सदेश चीनने या वर्षी प्रथमच पाठविला. या सदेशात काही बाबतीत आपल्या भूमिकेचा आग्रह चीनने कायम ठेवला आहे तर काही बाबतीत तो सोडण्याची तयारी दर्शविली आहे. सीमेलगतच्या भागात दोन्ही बाजूनी आपल्या फौजांची जमवाजमव केली आहे. या फौजा दोन्ही बाजूंनी काढून घ्याव्यात ही चीनची मागणी कायम आहे. पण गेली पाच वर्षे रशियाने ही मागणी सतत फेटाळली आहे. रशिया-चीन सीमेबाबत पूर्वीच्या झारांनी आपल्या सामर्थ्याच्या बळावर त्यावेळच्या दुबळचा चीनवर लादलेले सीमा करार समानतेच्या पायावर केलेले नसल्याने अन्याय आहेत, ते रद्द समजून त्या जागी नवे करार करावेत असा आग्रह रशिया-चीन सीमावादात चिनी नेते नेहमी धरीत आलेले आहेत पण यावेळच्या सदेशात या अटीबद्दल आग्रह नव्हता.

रशिया-चीन सीमा वादात चीनला खरोखरच तडजोड हवी आहे की ही एक डावपेचात्मक हालचाल आहे? चिनी नेत्यांना तडजोड हवी आहे असे गेल्या काही महिन्यातील हालचालीवरून सूचित होत आहे. रशियाचा हल्ला होण्याचा सभव गृहीत धरून त्याला तोंड देण्याच्या दृष्टीने योजना आखणे ही चीनच्या आतापर्यंतच्या धोरणाचे मुख्य सूत्र होते. चीनी नत्याचे अमेरिकेशी सबध सुधारले ते याच उद्देशान. पण आता रशियाची भीती चीनला वाटत नाही, उलट पश्चिम युरोपलाच रशियाचा अधिक धोका आहे असे चीनला भेट देणाऱ्या पाश्चात्य देशाच्या नेत्यावर ठसविण्याचा चिनी नेत्यांचा प्रयत्न आहे. चीनने आपले अण्वस्त्र सामर्थ्य वाढविले आहे हे खरे पण रशियाच्या मानाने हे सामर्थ्य कमी आहे हे उघड आहे. रशियाने चिनी सीमेलगतच्या भागावर सध्या अधिक लक्ष केंद्रीत केले आहे, हे दडपण कमी कसे करता येईल हा चिनी नेत्यांपुढे प्रश्न आहे. हे दडपण पश्चिम युरोपच्या सीमेकडे वळवता आले तर त्यांना पाहिजे आहे. यासाठीच पश्चिम युरोपला रशियाची अधिक भीती आहे असे चित्र पश्चिम युरोपच्या नेत्यापुढे चिनी उभे करीत आहेत. त्याला तोड देण्यासाठी पश्चिम युरोपने आपले लष्करी सामर्थ्य वाढवावे असे चीनला सूचित करावयाचे आहे. पश्चिम युरोपने लष्करी सामर्थ्य वाढविले की रशियाला आपल्या लष्करी सामर्थ्याचा ओघ त्या सीमेकडे वळवावा लागेल आणि आपल्या सीमेवरचे रशियाचे दडपण कमी होईल असा यामागे चिनी नेत्याचा आडाखा असल्याचे दिसते.

रशियाशी तडजोडीची आवश्यकता चिनी नेत्यांना आज वाटावी याचे दुसरे कारण माओ व चौ एन् लाय याच्यानतर चीनवर रशिया आपली पकड बसवील अशी भीती चीनला वाटते. माओ आणि चौ दोघेही आजारी आहेत. त्याच्या मृत्यूनतर चीन सध्याचेच धोरण पुढे चालू ठेवण्यात कितपत यशस्वी होईल की तो रशियाच्या प्रभावाखाली जाईल या साऱ्या प्रश्नाचा विचार चिनी नेत्यानी केलेला आहे. माओ आणि चौ याच्यानतर चीनमधील माओवादी सत्ता कोमळेल असे नाही, पण त्याच्या मृत्यूनतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा फायदा घेऊन चीनमध्ये आपल्या प्रभावाखालची राजवट आणण्याचा प्रयत्न रशिया करील अशी चिनी नेत्याना वाटणारी भीती स्वाभाविक आहे. नेतृत्त्वाची दुसरी फळी चिनी नेत्यानी तयार केली आहे. हे नेते माओचेच धोरण पुढे चालू ठेवतील. पण अनुभवी रशियन नेत्याशी हे नवे नेते कितपत यशस्वीपणे तोंड देऊ शकतील? नव्या चिनी नेत्यांच्या अननुभवीपणाचा फायदा रशियन नेत्यांना घेता येऊ नये यासाठी जास्तीत जास्त चांगली व्यवस्था आपल्या हयातीतच करून ठेवण्याचा चौ एन् लाय यांचा प्रयत्न आहे. माओ कट्टर रशियाविरोधी आहेत. ते जिवत असेपर्यंत रशियाशी असलेल्या चीनच्या सबंधात कोणताही महत्त्वाचा बदल होण्याची शक्यता नाही. पण माओंवर थोडा फार प्रभाव कोणाचा असेल तर तो चौ एन् लाय याचाच आहे. अमेरिकाविरोधाचे धोरण बदलून चीनने त्या देशाशी सहकार्याचे सबंध प्रस्थापित केले. या बदलासाठी माओना तयार करण्यात चौ एन् लाय याचा महत्त्वाचा वाटा होता. रशियाशी मर्यादित तडजोड करण्याबाबतही ते माओची खात्री पटविण्याची शक्यता आहे. आपल्या मृत्यूनतरच्या अस्थिर परिस्थितीत अननुभवी चिनी नेत्यांना मुरब्बी रशियन नेत्याशी सामना करण्याचा प्रसग येऊ देण्यापेक्षा आपल्या हयातीतच आपण रशियाशी मर्यादित तडजोड करणे कमी धोक्याचे आहे असे चौ एन् लाय यांना वाटते. रशियाला

पृष्ठ १२ वर

बिहारविषयी हा लेख काही नवीनच सांगून जातो

# जागा झालेला 'संथाळ' आणि जे. पी. आंदोलन

गीता साने, धनबाद

जयप्रकाशजींच्या चळवळीला बिहारमध्ये सध्या उधाण आलेले असले तरी, छोटा नागपूरचा डोंगराळ प्रदेश थडच आहे. ह्या प्रदेशातील साठ ते सत्तर टक्के वस्ती आदिवासींची असून त्यात हो उराँव, संथाळ, मुंडा हे मुख्य आहेत व संथाळांची संख्या त्यात सर्वात अधिक आहे. ह्या आदिवासींनी जे. पी. च्या चळवळीची दखल अजून घेतलेली नाही. धनबादचा छोटुकला, पण विविध उद्योगानी गजबजलेला जिल्हा त्याला अपवाद नाही.

धनबाद जिल्ह्याची ग्रामीण वस्ती मुख्यत्त्वे संथाळ व महतो (कुणबी) ह्यांची आहे. ह्या दोन्ही जाती शेती करणाऱ्या, गरीब व मागास आहेत. संथाळ लोक निरक्षर, कोर्टकचेऱ्यापासून दूर रहाणारे व भविष्याबद्दल बेफिकिर असल्यामुळे हे लोक जमीनदार-सावकाराच्या सर्वस्वी तावडीत गेलेले आहेत. कर्ज फेडण्यासाठी वारल्यामध्ये घरगडी असतात, तसेच येथेही आहेत त्यांना कामाइत म्हणतात.

असा हा गरीब व बेफिकिर वृत्तीचा संथाळ १९७३ च्या सुरुवातीला केव्हातरी जागून उठला, पण त्याच्या ह्या जागृतीची गधवार्ता धनबादच्या शहरी जनतेला नव्हती; पण वर्ष-अखेर भातकापणीच्या हंगामात आमचे लक्ष त्याने वेधून घेतले. आपल्या जमिनीबद्दलच्या मागण्यांनी, त्याने हा जिल्हा गाजवण्यास सुरुवात केली. आदिवासींच्या जमिनीच्या खरेदी-विक्रीबद्दल असलेल्या १८८८ च्या कायद्यात १९६९ मध्ये काही संशोधन होऊन, त्या पूर्वीच्या बारा वर्षात (१९५७-६९) आदिवासींची जमीन कोणी 'फसवून किंवा धाक दाखवून', विकत वा अन्य मार्गांनी, हस्तगत केली असल्यास, ती जमीन परत मागण्याचा अधिकार, त्यांना या संशोधनाप्रमाणे मिळाला आहे. संथाळ १९६९ पासून अनेक तुकड्यांवर आपला हक्क सांगत आहेत व ते तुकडे परत मिळण्यासाठी, कोर्टात त्यांचे अर्ज दाखल होत आले आहेत. ते अर्ज, सरकारी रिवाजाप्रमाणे, विविध दंडाधिकाऱ्यांच्या फाइल्समध्ये जाऊन गडप होत होते. ही कोंडी फोडण्यासाठी संथाळांनी एक नवा मार्ग काढला. ज्या शेतावर कागदोपत्री त्यांची मालकी असेल, त्या शेतामधली उभी पिके, हजार-पंधराशेच्या जमावाने जाऊन, ते कापून आणू लागले. त्यांना हा सल्ला देणारे एक वकील श्री बिनोदबिहारी महतो, हे त्यांचे पुढारी.

अशा तऱ्हेने संथाळ कापणी करू लागल्यावर, जमिनीची मालकी सांगणाऱ्यांना सरकारकडे मदतीसाठी धावणे क्रमप्राप्त होते. त्यानंतर शासनाने चळवळीवर मुस्कटदाबीचे हत्यार उपसले; लाठी, बंदुका, धरपकड इत्यादींचा वापर झाला. पण हजारोंचे जमाव चार-दोनदा लाठ्या चालवून किंवा गोळ्या घालून वठणीवर येत नाहीत. आयते भात पदरात पाडून घेण्याचा मोहही संथाळांना होता व तो चळवळीला पोषक होता.

बलप्रयोग मोठ्या प्रमाणात करण्याची कुवत बिहार सरकारला नव्हती. १९७१ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे बहुमत दणदणीत नव्हते व पक्षाच्या अंतर्गत यादवीने, सरकार दुबळे पडले होते व आहे. त्याला स्वतःच्या पुष्कळ समस्या होत्या व आहेत; त्यांच्यामध्ये संथाळांच्या चळवळीची नवी भर घालणे त्यांना परवडणारे नसावे कारण काही असो, १९७३ च्या डिसेंबरमध्ये सरकारी धोरण बदलले. धनबादच्या उपायुक्ताने श्री. महतोंना वाटाघाटीसाठी बोलावले. नंतर चळवळीच्या केंद्रामधून, त्याने श्री. महतोंसह पदयात्रा केली. मोठ्या संख्येने, पदयात्रेच्या मार्गावर वरील दोघांचे स्वागत संथाळ व महतो जमातींनी केले आणि आपल्या मागण्या उपायुक्तासमोर मांडल्या. उपायुक्तानी त्या जमावापुढे जागोजाग भाषणे केली. त्या भाषणाचा इत्यर्थ असा होता की 'मला तुमच्याबद्दल सहानुभूती आहे. जमीन परतीची तुमची मागणी कायदेशीर आहे. कोर्टाच्या कामात तुमच्या केसेस निकालात निघण्याला विलंब झाला हे खरे. पण आता मी, माझे दंडाधिकारी खेड्यामधून पाठवले आहेत. तुम्ही त्यांच्याकडे आपल्या शेताचा सर्व्हे-नंबर तेवढा द्या. कागद कसलाही चालेल, त्यांच्यावर स्टँप लागणार नाही. नियुक्त अधिकारी रेकॉर्ड पाहून, जमीन तुमची *असल्यास लागलीच तुम्हाला* ताबा देववील. तुम्ही कायदा स्वतःच्या हातात मात्र घेऊ नका.'

ह्या आश्वासनानुसार कारवाईला आरंभही झाला.

वरील घटना प्रत्यही वृत्तपत्रात झळकत होत्या; व शहरी जनता आश्चर्य करीत होती. जानेवारी १९७४ अखेर एक हस्तपत्रक वाटले गेले. '४-२-७४ रोजी, आपल्या झारखंड मुक्ती मोर्चाचा पहिला वर्धापन दिवस आहे. त्या दिवशी धनबादच्या गोल्फ ग्राउंडवर एक लाखाची सभा घेऊन आपण तो साजरा करणार आहोत.' खाली संथाळी भाषेत दोन ओळी होत्या व संथाळांना मोठ्या संख्येने सभेला येण्याचे आवाहन होते. हे पत्रक पाहून धनबादचे कुतूहल शिगेला पोचले.

सभेपूर्वी श्री. बिनोदबिहारींशी मी चर्चा केली. माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांनी मोकळ्या मनाने दिली. ते प्रथमच म्हणाले, 'आज एक लाख लोक जमणार आहेत.'

: इतकी माणसे कुठून आणणार आहात ?

: गिरिडीहून (२७ मैल) देखील लोक येत आहेत.

: त्यांच्या येण्या-जाण्याचा खर्च फार येईल नाही ?

: खर्च कसला ? सगळे लोक गटागटाने चालत येतील. खर्च फक्त हस्तपत्रक छापण्याचा व ते दहा-वीस केंद्रात पाठवण्याचा आला. तेथून ती लोकानीच खेडोपाडी पोचवली.

: तुमचे काम जोरात आहे तुमची सघटना कशी काय आहे ? तिची उद्दिष्टे, घटना काय ? सभासद कोण होऊ शकते ? त्यांची सख्या किती ? तुमच्या कार्यकारिणीवर कोण आहे ?

माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी देत ते म्हणाले, 'आतापावेतो आमच्या हक्कासाठी सरकारशी दोन हात करण्यात आम्ही गुंतलो आहोत. आता मात्र सघटनेच्या कार्याला मी लागणार आहे.'

: तुम्हाला पाठिंबा कोणाकोणाचा आहे ?

: कुठल्याही राजकीय पक्षात आम्ही सामील नाही. तथापी डाव्या पक्षातील लोकांची आम्हाला सहानुभूती आहे.

सभेत बोलणाऱ्या चार-पाच वक्त्यांची नावे त्यांनी घेतली. आदिवासीमध्ये त्यापैकी कोणाचेही काम नव्हते, हे मला माहीत होते. सथाळामधूनच श्री. शिबू सोरेन हा एक तरुण पुढे आलेला असून, तो बोलणार असल्याचे त्यांनी मला सांगितले.

शीखाप्रमाणेच सथाळ, कधी नि शस्त्र नसतो. तेव्हा एवढ्या मोठ्या सशस्त्र मेळाव्यात शातताभगाची शक्यता उघड होती. त्याबद्दल विचारले असताना ते म्हणाले की, 'डेप्युटी कमिशनर साहेबांनीही हाच प्रश्न मला बोलावून विचारला होता. 'पोलिसाची लाल पगडी व XXX ह्या 'दादा'चे लाठीबाज गुड सभेत नसतील तर सर्व काम शाततेने पार पाडण्याची हमी मी घेतो' असे मी त्यांना सांगितले आहे.

: आजच्या सभेचा कार्यक्रम काय आहे ?

. दोन-चार भाषणे होतील. आजच्या वर्धापन दिवशी जनतेचा पाठिंबा, आम्हाला किती आहे, ह्याची चुणुक आम्ही दाखवीत आहोत. सभा सपल्यावर दुरून आलेले लोक मैदानावरच झोपतील. सकाळी ६ ला ते तेथून मोर्चा घेऊन निघतील. घरी गेलेले लोक त्यांना जागोजाग येऊन मिळतील. दुपारपर्यंत सर्व धनबादच्या रस्त्यानी फिरून, उपायुक्ताच्या कचेरीत त्यांना मागण्या सादर करून लोक घरोघर जातील.'

यदा धनबादला, फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात कडाक्याची थडी पडत होती. तपमान रात्री ५ अश सेटिग्रेडपर्यंत उतरत होते व मोकळ्या मैदानात तर रात्री पडणारे दव गोठून ( frost ) सकाळी त्याची पांढरी स्वच्छ चादर सर्वदूर अथरली जात होती. ह्या उघड्या मैदानात, अपुऱ्या कपड्यांनी झोपणाऱ्यांच्या हिंमतीचा हेवा कोणालाही वाटला असता.

## प्रचंड सभा व मोर्चा

. दुपारी साडेतीनला मी विनोदबाबूबरोबर सभास्थानी पोचले. वाटेत, मैदानामधून बाहेर जाणाऱ्या सथाळाचे थवे लागू लागले. चौकशी करता ही मंडळी पाण्याच्या शोधात जात असल्याचे कळले व पाणी पिऊन येतोच असे उत्तर मिळत होते.

सभास्थान विशेष शृगारलेले नव्हते. मागे इदिरा गांधीच्या निवडणूक सभेसाठी बाधलेल्या रोस्ट्रॅमवर, छायेसाठी छोटे पाल, विजेचे दिवे व लाउड स्पीकर ह्याची व्यवस्था होती. रोस्ट्रॅमच्या खालच्या बाजूला, उजव्या हाताला तीस-चाळीस माणसे बसू शकतील असे दुसरे पाल व त्यात काही बाके, खुर्च्या ठेवलेल्या होत्या. संपूर्ण सभेचे दर्शन व्हावे म्हणून मी प्रथम रोस्ट्रॅम चढून वर गेले.

सारे मैदान माणसांनी फुललेले होते. नवीन माणसे गटागटाने येतच होती. ह्या जनसमर्दातून शेकडो निळी व लाल निशाणे वर डोके काढून चमकत होती. लोक येत तसतसे जागा पाहून खाली बसत. ह्या समुदायाचा अदाज ७० हजार ते सव्वा लाखापर्यंतचा लावण्यात आला. इदिराजींच्या सभेलाही इतका जनसमुदाय नव्हता. त्या सभेत, मजुराना आणणारे औद्योगिक कपन्याचे ट्रक्स व प्रतिष्ठिताच्या मोटारी इत्यादिकांची असलेली गजबज व पोलिसांच्या गणवेशांची खैरातही आज दिसत नव्हती. थोडे पोलीस व सरकारी रिपोर्टर्स होते पण साध्या वेशात. माझ्यासारखे दिकू (परकीय) बघेही फारच थोडे व ते मैदानाच्या सीमेवर होते.

मी खालच्या पालात येऊन बसले. त्याला लागून हे सथाळ व विनोदबाबूच्या वजनामुळे आलेले महतो शेतकरी बसलेले होते. सथाळाच्या हातात चद्राकार, धारदार पात्याची कुऱ्हाड–टगी– किंवा धनुष्यबाण; काहीच्या हातात दोन्ही शस्त्रे होती. धनुष्य बांबूचे, बाण केनचा व त्याचे शल्य मात्र लोखंडाचे होते. काहींच्या पाठीवर बाणाचे बांबूचे भाते होते. पुरुष बहुसख्य असले तरी स्त्रिया व मुलेही तुरळक होती. लोक गटागटाने बसलेले होते. प्रत्येक गटात एक डुगडुगी (पखवाज सारखे एक वाद्य) वाला व झारखंड-मुक्ती-मोर्चाचा निळा ध्वज होता. खाणीमधून आलेल्या थोड्या सथाळ-महतो मजुरांनी लाल झेंडे आणले होते. बहुतेक लोकाजवळ एक पोटली होती व तिच्यात सत्तू-मुरमुरे ह्याचा चबेना आणलेला होता. कपडे सर्वांच्या अगावर होते, पण अगदी मोजके; नेसू धोतर, अगात सदरा. पाघरायला चादर असेल तो माणूस सुखवस्तू. बांध्याला ठेंगणे, रगाला काळे, शरिराने काटक असे हजारो लोक दाटीवाटीने बसले होते.

सभा वेळेवर म्हणजे सवाचारला सुरू झाली. भाषणे बहुतेक हिंदीमधून झाली; ती अनेकांना समजत नव्हती; चालून आल्याने ते दमलेलेही असावेत. गप्प बसण्याची शिस्त सर्वांनीच पाळली. श्री. शिबू सोरेन व्यासपीठावर येऊन सथाळीत बोलू लागेपर्यंत हा जनसमुदाय असाच निश्चल राहिला. श्री. सोरेन फार थोडे बोलले. 'आम्ही ह्यापुढें सोसून घेणार नाही. मारणाराचा हात धरू– कलम करू. आम्ही कोर्टकचेऱ्याकडे धावणार नाही. आमच्या तक्रारी आमच्या दारात येऊन सोडवण हे सरकारचे काम आहे.

'अधिकाऱ्यांना 'चहा-पाणी देणे' आम्हाला परवडत नाही. आम्ही बी. डी. ओ कडे जाणार नाही. पाहिजे तर त्यानी येऊन आम्हाला मदत करावी.'

ते प्रथम सथाळीत बोलून मग ते वाक्य हिंदीत सांगत. त्यांच्या वाक्या-वाक्याला टाळ्या पडत होत्या. व त्या टाळ्यामध्ये डुगडुगीवर पडणारी थाप जास्तच गोड वाटत होती. ह्या भाषणाच्या वेळी एक अपग चिडून उठला व सरकारला त्याने शिव्या देण्यास सुरवात केली. पण त्याच्या गटातील लोकांनी त्याला समजावून सभेच्या बाहेर नेले. येवढी बारिकशी गडबड सोडता सभा अत्यत शांतपणे पार पडली.

५ तारखेला सकाळी ६ वाजता मैदानावरून दहा-पधरा हजार सथाळाचा शिस्तबद्ध मोर्चा निघाला. घरी गेलेले अनेक लोक त्यांना मार्गात येऊन मिळत होते. वहातुकीला त्यांचा कोठेही अडथळा आला नाही. त्यांच्याबरोबर त्याचे पुढारी तेवढे होते. रात्रीच्या राजकीय नेत्यांपैकी मात्र कोणी दिसले नाही. ह्या सशस्त्र मोर्चाबरोबर फक्त दोन पोलीस गाड्या वायरलेस ट्रान्समिटरसह होत्या. काही गडबड झाल्यास घटनास्थळी, काही मिनिटात पोचता येईल,

अशा मध्यवर्ती रेल्वे-मैदानात पोलिस दल व बिहार-मिलिटरी पोलिसदल आपल्या गाड्यांमधून सज्ज होते. धनबादला आतंक ह् ोता. धनबादचा व पाच मैलांवरचा झरियाचा बाजारही बंद होता. बऱ्याच शाळांनीही त्या दिवशी सुटी दिली होती. सगळ्या कुशंका खोट्या ठरून आपल्या मागण्या उपायुक्त महाशयांना सादर करून, आलेले लोक घरोघर गेले.

ह्या सभेनंतर संथाळांचा उत्साह खूप वाढला. दहा-वीस खेडी सभा घेत व तुम्ही आलेच पाहिजे असा विनोदबाबूंना निरोप पाठवीत. दिवसाकाठी अशा २–३ सभाही घेण्याचा त्यांना प्रसंग येई. अशा ह्या चक्रवाढीने वाढणाऱ्या चळवळीला उद्दिष्ट निश्चित नव्हते, पक्ष नव्हा, संघटना नव्हती. तिला फक्त कार्यक्रम होता व लोकांना तो कार्यक्रम हवासा होता. आदिवासींमध्ये आढळणारी सामाजिक एकी त्याच्यात होती. चळवळ फोफावत होती, कारण जाचणाऱ्या अन्यायाचे निराकरण आपल्याच हातांनी करण्याचा उपाय ती लोकांना शिकवीत होती.

धनबादला २५–३० हजारांच्या सभा नेहमी होतात, इंदिराजी-सारखा महत्त्वाचा नेता आल्यास तो आकडा दुप्पट किंवा त्याहूनही जास्त मोठा होतो. पण ही संख्या पैशाच्या पाठबळावर मिळवलेली असते. खाणीकडून पगारी सुटी देऊन मजूर मोठ्या प्रमाणात आणले व परत पोचवले जातात व त्याचा खर्च अमाप येणे अपरिहार्य असते. वरील अनुभवामुळे २५–३० मैलांच्या परिसरामधला एवढा मोठा ग्रामीण जनसमुदाय गोळा होऊन त्याचा खर्च, एक हस्तपत्रक, त्याचे वितरण, दोन-चार पुढाऱ्यांना आणण्याचा वाहनखर्च, उभारलेली दोन पाले, माइक व वीजेची रोशनाई एवढाच काही शेकड्यात असावा, ह्याचे नवल अनेकांना वाटले. संथाळांची चळवळ, ही लोकांची, लोकांनीच उभारलेली व त्यांच्यासाठीच असल्याचे, तो क्षुल्लक खर्च हे गमक होते.

## २

मार्च, एप्रिल, मे हे तीन महिने, मी धनबादहून निर्वासित झाले होते. धनबाद दूर राहिल्याने इथली खबर क्वचितच मिळे. संथाळ चळवळीत पत्रव्यवहार करण्याजोगे कोणी नव्हते, अजूनही नाही. मध्यंतरी एका शेतमालकाने संथाळावर गोळीबार केल्याचे व काही माणसे मेल्याचे वृत्त मार्चमध्ये वाचले तेवढेच. मी जूनमध्ये परत आले तो इथे सगळा कायापालट झाला होता. श्री. विनोद महतो व शिबू सोरेन ह्यांच्यावर Misa खाली वारंट्स् काढून विनोदबाबूंना पकडले होते; व शिबू सोरेन भूमिगत होऊन, आपल्या लोकांना धीर देत असल्याच्या वार्ता कानी येत होत्या. जमिनी परत मिळवण्याची चळवळ थंडावली होती; व विनोदबाबूंच्या गैरहजेरीत महतो शेतकरी संथाळापासून दूर सटकला होता; मूळ चळवळीत, त्याला विशेष कार्यक्रम नव्हता, हेही खरेच. भूमिगत माणसे–विशेषत: खेडूत–शहरात येणे कठीण असते, त्यामुळे श्री. सोरेनची गाठ पडण्याची शक्यता नव्हती. त्यांच्याऐवजी मुक्ती-मोर्चाच्या सहाय्यक सेक्रेटरीचे नाव सांगणाऱ्या दिगंबर मरंडी नावाच्या विद्यार्थ्याचा परिचय ऑगस्टमध्ये झाला. मरंडी यंदाच मॅट्रिक होऊन कॉलेजच्या प्रथम वर्षांत दाखल झाला आहे. त्याची 'आम्हाला झारखंड का पाहिजे' ही हस्तलिखीत चोपडी प्रथम मला मिळाली, नंतर त्यातील मजकुराबद्दल आमची चर्चा झाली.

संथाळांना झारखंड पाहिजे आहे, कारण 'बिहार राज्यात हिंदू उच्च वर्णीय अधिकारी सतत पिळवणूक करतात.' शासनाचा पाठिंबा सावकारांच मिळतो. 'दारूची दुकाने बंद करा' ह्या आमच्या मागणीचा विचारदेखील होत नाही.' झारखंड मिळवण्यासाठी जरूर तर 'डंडा' वापरण्याची तयारी आम्ही करू.' इ. ह्यापैकी शेवटच्या मुद्द्यावर चर्चा झाली; माझे म्हणणे अजून मरंडीला मान्य झालेले नाही. दलितांना शांततामय चळवळीचे महत्त्व पटवताना नित्याचे युक्तिवाद माझे मलाच अपुरे वाटतात. त्याबद्दल अधिक विचार व्हावयास पाहिजे, अधिक भरीव कारणे शोधायला पाहिजेत, असे मला आज तरी वाटते.

मरंडीमुळे इतर संथाळ मंडळींचा परिचय होऊ लागला. हे बहुतेक लोक सरकारी नोकरीत व म्हणून चळवळीपासून दूर रहाणारे आहेत. त्यांच्या बोलण्यातले बरेच संदर्भ मला कळत नाहीत–उदाहरणार्थ डाकिणी ((Witches) व भुते–खेते. त्यामुळे संथाळ इतिहासाचा अभ्यास आवश्यक वाटू लागला, पण पुस्तकांबद्दल कोणालाच माहिती नव्हती. मला भेटणाऱ्या तरुणांनाही आपला इतिहास जाणून घ्यावयाचा आहे. चाचपडत चालताना हळुहळू माहिती गोळा होते आहे, पुस्तके मिळत आहेत व 'संथाळ' हे कोडे हळुहळू, पण उलगडू लागले आहे.

ऑक्टोबरच्या सुरुवातीला श्री. शिबू सोरेन ह्यांच्या सहीचे एक हस्तपत्रक मरंडीने मला पाठवले. 'ता. १२ ऑक्टोबर रोजी 'पालता' येथे संथाळांचा मोठा मेळावा व्हावयाचा आहे. श्रीमान् उपायुक्तसाहेब इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसह, आमच्या अडचणी समजावून घेण्यासाठी तेथे कँप–कोर्ट करणार आहेत. त्याच रात्री त्यांच्यासाठी एक सांस्कृतिक (नृत्य, नाटक, गायन) कार्यक्रम ठेवलेला आहे. सर्व संथाळांनी मोठ्या संख्येने तेथे जमावे.' हस्तपत्रक हिंदीत होते, पण खाली दोन ओळी संथाळी भाषेत, देवनागरी लिपीत होत्या.

'शिबूजीवरचे वॉरंट परत घेण्यात आले का?' मी मरंडीला विचारले 'नाही. पण लौकरच परत घेण्यात येईल.'

'शिबूजी सभेला कसे हजर रहाणार? त्यांना पकडले तर?'

'डी. सी. साहेब चांगला मनुष्य आहे. त्यांची सहानुभूती आमच्याकडे आहे. त्यांनी जूनपासून आम्हाला खेड्यांमधून रेशन व साखर दिली आहे. त्यांनी शिबूजींना चर्चा करण्याच्या उद्देशाने ८–९ तारखेलाच बोलावले आहे.'

वरील बोलण्यावरून संथाळांचा विश्वास ह्या नवीन उपायुक्ताने संपादन केला होता हे स्पष्ट झाले. पण वॉरंट असलेला माणूस, जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करायला जाणार कसा, हा माझा प्रश्न राहिलाच.

१४ तारखेला स्थानिक व पाटण्याची वृत्तपत्रे आणि मरंडी सगळ्यांमिळून मला १२ तारखेच्या सभेची माहिती मिळाली. सभेला ४०–५० हजार लोक जमले असावेत. श्री. सोरेन हे सभेपूर्वी उपायुक्तांना भेटले नाहीत. सभेत संथाळांच्या बाजूने ते एकटेच बोलले व आपला सोळा मागण्यांचा चार्ट त्यांनी पुढे ठेवला. त्यानंतर धनबादच्या एम. एल. ए. पैकी एक श्री. ए. के. रॉय बोलले. हे अत्यंत प्रामाणिक, कळकळीचे, मजूर चळवळ स्वतंत्रपणे चालवणारे तरुण कार्यकर्ते. त्यांच्या ट्रेड युनियन्समध्ये आदिवासी मजूर मुख्यत्वे आहेत. ते पूर्वी C. P. M. बरोबर होते. आता त्यांनी तोही पक्ष सोडला आहे. त्यांनी ह्या सभेत, 'धनबादला, ३ ते ५

ऑक्टोबरचा ‘ बंद ’ संपूर्णतः यशस्वी होऊन जनतेचा जयप्रकाशजींना पाठिंबा आहे हे स्पष्ट झाले ’ असे सांगून जेपींच्या आदेशानुसार विधानसभेच्या आपल्या सदस्यतेचा राजिनामा जाहीर केला.

उपआयुक्तानी संथाळांबद्दल त्यांना वाटणारी सहानुभूती, त्यांच्या विकासाची शासनाकडून आजवर झालेली उपेक्षा व भविष्यात त्यांना सर्व मदत देण्याचे आश्वासन दिले व ते मागण्याबद्दल म्हणाले, ‘ तुमच्या सोळा मागण्यांपैकी दोन माझ्या अधिकाराबाहेर आहेत. बाकीच्या पूर्ण कशा करता येतील ह्याचा विचार करून मी लौकरच कारवाई करतो. ’ पहिलीच मागणी बिनोदबाबूच्या सुटकेबद्दल होती; त्याबद्दल ‘ वरती लिहीन. मला एकादा महिना अवकाश द्या ’ असे ते म्हणाले.

श्री. शिबू सोरेन ह्यांची भेट १६ ऑक्टोबरला झाली. त्यांच्या चळवळीबद्दल मी त्यांना सर्व प्रश्न विचारले. हे गृहस्थ तरुण, साधारणतः शिक्षित असावेत. त्यांचे शिक्षण थोडे म्हणजे सात–आठ इयत्तांइतके आहे व त्यामुळे त्यांना अनेकदा लगडे वाटत असावे. ते हिंदी स्वच्छ व चांगले बोलतात.

त्यांच्या चळवळीला आजही संघटना नाही. अशी कामे मार्गदर्शनावाचून करण्याइतका आत्मविश्वास त्याना नाही. प्रचलित राजकीय पक्षांबद्दल विश्वास नाही, नेत्यांबद्दल आदर नाही. त्यामुळे बिनोदबाबूच्या सुटकेची ते वाट पहात आहेत.

संघटना नाही, म्हणजे घटना नाही, सभासद नाहीत, संचालक समिती नाही, सगळी एकखांबी द्वारका आहे. ह्या एकाकी व्यक्तीने, गतवर्षी सुरू झालेले विधायक कार्य चालू ठेवले आहे, त्यात काही भर घातली आहे. त्या कार्यक्रमापैकी अत्यंत महत्त्वाच्या दोन–तीन कार्यांचा तपशील त्यांनी मला सांगितला.

## विधायक बाजू

१. सामुहिक शेती : ते म्हणाले, ‘ ही सहकारी शेती नव्हे. ’ शेते एकत्र कसली जात नाहीत. मग सामुहिक शेती म्हणजे काय ?

ह्या कामाचे दोन भाग आहेत, त्यातला पहिला पावसाळ्याच्या आरंभी व दुसरा कापणीनंतर पडतो. ह्यापैकी दुसऱ्या भागाचे काम गतवर्षीनंतर सुरू झाले, ते असे —

संथाळांची खेडी लहान लहान दहा-पाच घरांची असतात. एकादे खेडे मोठे असल्यास, त्याची वसती लहान टोळ्यांमधून वाटलेली असते. जेथे काम सुरू झाले तेथे सरासरी ५०–६० घरे येतील इतक्या खेड्यांचा एक गट करण्यात आला. त्या घरांमधील प्रत्येक शेतकऱ्याकडून त्याच्या पिकाच्या प्रमाणात भात गोळा करण्यात आले. भात त्याच्या गवतात लपेटून ठेवले असता, त्याला कीड किंवा उंदीर लागत नाही; म्हणून गोळा केलेले भात व्यवस्थित बांधण्यात आले. गटाला स्वतःचे कोठीघर नसल्याने, एकादे मोठेसे घर पाहून त्यातील एका खोलीत बांधलेल्या पेंढ्या साठवण्यात आल्या. हे भात यदाच्या पावसाळ्यात प्रथम बियाणे म्हणून व उरलेले पावसाळ्याच्या आरंभीच्या कठीण काळात पुढे अन्न म्हणून खर्च करण्यात आले.

यदा ह्याच गटामधून शेताची नांगरणी व डागडुजी सर्वांमिळून करण्यात आली. सकाळी डुगडुगी वाजू लागते व त्याबरोबर नांगर-बैल असणारे शेतकरी आपल्या नांगर-बैलांसह एकत्र होतात. ज्यांच्याकडे नांगर नसेल त्यांना साधारणतः कुदळीने शेत खोदून तयार करावे लागते. तीही मंडळी डुगडुगी वाजूं लागताच तेथे येतात त्यानंतर नांगरवाले ओळीने सर्व शेते नांगरू लागतात व बिनानांगरवाले शेतीची डागडुजी करू लागतात. अनेक ठिकाणी वरळ्या तुटलेल्या असतात, पावसाळ्यात पाऊस फार झाला तर बांध फोडून पाणी बाहेर काढलेले असते, खड्डे पडलेले असतात. ही सर्व कामे डागडुजीवाले करतात. ह्या पद्धतीने नांगरणी व डागडुजी दोन्ही कामे नेटकी व लौकर होतात. ‘ आमचा अनुभव असा आहे की ह्या पद्धतीने सारी शेते नीट नागरली जातात. गरीब शेतकऱ्याचे कुदळीने जमीन मोकळी करण्याचे श्रम वाचतात. डागडुजीचाही हाच अनुभव आहे. एका माणसाने एक बांध ठीक करण्यापेक्षा दहा माणसे, एकत्र खपतील तर काम नेटके व लौकर होते.

भात लावणीही अशीच सामुहिक रूपाने करण्यात येते. बियाणे मात्र प्रत्येक माणूस वेगळे लावतो. लावणी झाल्यावर सामुहिक कार्य अंगमेहनतीपुरते समाप्त होते. ह्या पद्धतीबद्दल खेड्यांत थोड्या बहुत कुरबुरी आहेत. सुखवस्तु शेतकऱ्यालाही ह्या पद्धतीत नांगर धरावा लागतो; त्यामुळे तो नाखुश होतो. गरीब शेतकऱ्याला वाटते ‘ चार दिवस कोठे मजुरीला गेलो असतो तर चार पैसे मिळाले असते ! ’ लोकांची समजूत घालून यंदा सर्व स्थिरस्थावर करण्यात आले आहे. ह्या पद्धतीने पीक जास्त चांगले येईल. व तसे झाल्यास कुरबूर कमी कमी होत जाईल हे उघड आहे.

संथाळामध्ये सामुहिक नागरणीची पद्धत पूर्वी असावी. कारण १८५५–५६ मध्ये, संथाळांच्या बंडाळीच्या इतिहासात वरील पद्धत इंग्रज अधिकाऱ्यांनी नमूद केली असून ह्या पद्धतीने खेड्याच्या सबंध शेतीची नांगरणी संपवायला फार उशीर होतो, असेही म्हटले आहे. पूर्वी प्रचारात असणाऱ्या ह्या पद्धतीचे पुनरुज्जीवन थोडे सोपे गेले असले, तर नवल नाही.

ही पद्धत धनबाद जिल्ह्यातील उत्तरेचे एक पोलीस ठाणे व त्याला लागूनच गिरिडीह जिल्ह्यातील एक पोलीस ठाणे ह्यांच्या अमलाखालील प्रदेशात सध्या सुरू केलेली आहे.

२. सामुहिक पशुपालन : ही योजना वरच्याच प्रदेशात, यदा सुरू करण्यात आली आहे. संथाळांना पशु प्रिय आहेत. त्यामुळे प्रत्येक घरात बकरी, डुक्कर, कोंबडी, वगैरे हटकून सापडतात. ‘ भोवताली जंगलात भरपूर चारा व पाणी आहे. ह्याचा फायदा घेऊन हा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे, ’ सामुहिक पशुपालनासाठी प्रथम ५०–६० फूट किंवा त्यापेक्षाही लांब व ८–१० फूट रुंदीचा गोठा तयार करण्यात आला. नंतर गटातील प्रत्येक घराकडून एक बकरी, एक डुक्कर व एक कोंबडी एक वर्षासाठी राखोलीला घेतली गेली. एक वर्ष पूर्ण झाल्यावर ही जनावरे मालकांना परत देण्यात येतील; पण त्यांची प्रजा आमच्याजवळ राहील. डुकरी वर्षात दोनदा विते व प्रत्येक वेळी १२–१४ पिले देते; बकरी दोनदा किंवा तीनदा व ती ४–६ पिले देते. कोंबडी वर्षाकाठी १००–१२५ अंडी देते. ह्या प्रत्येक गोठ्यावर तीन कामगार नेमलेले आहेत. त्यांचा खर्च गोठ्याच्या उत्पन्नातून निघेल.

‘ हे सामुहिक पशुपालन यशस्वी होईल व पुढील चार-दोन वर्षात विकासासाठी लागणारे भांडवल आमच्याजवळ तयार होईल. त्यासाठी इतराचे पाय धरण्याची गरज उरणार नाही. ’ असा प्रगाढ आत्मविश्वास श्री. सोरेन यांना आहे. सध्या असे कित्येक गोठे वरील प्रदेशात चालू आहेत. आकडा त्यांना सांगता आला नाही.

३. अकिल–आखाडा : अकिल म्हणजे अक्कल. आखाडा हे एकत्र जमण्याचे स्थान सर्व संथाळ खेड्यांमधून असते व त्याचा उपयोग उत्सवप्रिय संथाळ नृत्यासाठी करतात. अकिल-आखाडा हे नाव रात्री-पाठशाळांना दिलेले आहे. ह्या आखाड्यात मुलांनी रात्री

जेऊन जमावे–दिवसा ती कामावर जातात–खेड्याने त्यांना एक कंदील व परवडतील तशा पाट्या–पेन्सिली द्याव्यात. प्रौढही ह्या वर्गात येऊ शकतात. थोडे येतातही. प्रत्येक गावात आता दोन-तीन यत्ता शिकलेले पोर असतेच. जमणाऱ्याना साक्षर करण्याचे काम त्याच्यावर सोपवलेले असते. शाळेत अक्षर ओळख य अक शिकवले जातात. अशा शाळा जागोजाग चालू आहेत. त्याची सख्या शभरच्या आसपास असावी. साक्षरतेनतर मुलाना 'नित्याच्या उपयोगाचे ज्ञान देऊ. नोकरी पेशाची मुले तयार करायची नाहीत. प्रयोग नवीनच असल्याने तपशील अजून कोरा आहे.

### दारुबंदी

आपल्या कार्यक्रमाचा भाग म्हणून दारुबदीचा उल्लेख श्री.सोरेन ह्यांनी केला नाही. पण दारुबदीचा प्रचार चालू असून त्याला यशही आलेले आहे. गतवर्षी ६००–७०० सथाळ स्त्रियानी दारुविरुद्ध मोर्चा काढला होता. शाळाबद्दल बोलताना ओघाने दारूबद्दल ते बोलले. झनाकी ह्या गावाचे उदाहरण देऊन ते म्हणाले, 'दोन महिन्यांमागे एका सध्याकाळी पोचलो तो गावचा मुखिया अन त्याचे तीन–चार मित्र पिऊन धुमाकूळ करीत होते.' त्या लोकाची केलेली पाद्यपूजा श्री. सोरेननी अस्सल शब्दात सागितली. 'सकाळी त्याना रागावलो' नि शाळा चालवण्याबद्दल त्याना सागितले.

'चार दिवसाखाली पुन्हा एकदा गेलो होतो. एका ठिकाणी बत्ती होती नि गुंऽऽगुंऽऽचा आवाज काय आहे पाहायला गेलो तर पोर विविध सुरात का, खा, गा पाठ करीत होती. मास्तर एक अति म्हातारा पेन्शनर होता. रात्री डोळ्याने धड दिसत नाही. पाट्या सगळ्याच्या जवळ नव्हत्याच. काही मुलांनी जमिनीवरच अक्षरे गिरवली होती. खूप खुशी झाली. रात्रीचा चबेना म्हणून मुडी (चुरमुरे) बरोबर होती. ती काढली नि दिली मुलांना मुठ–मुठ वाटून. अन मग रात्री उपाशी झोपलो झालं.

माझे समाजकार्यामधील एक सहकारी श्री. आलमगीर खान ह्याची शेती आहे. पूर्वी काही दिवस रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षात असल्याने त्यांना थोडी राजकीय समज आहे. सध्या त्याच्या जमिनीबद्दल वाद उपस्थित केल्याने ते संथाळावर नाखूश आहेत. त्यांनी सामुहिक नांगरणी व डागडुजी यदा सथाळ खेड्यात झालेली पाहिल्याचे सागितले; ५–५० नागर एकत्र चालू लागले म्हणजे फार सुंदर दिसते. ते म्हणाले, 'बियाणे सामुहिक कोठारातून मिळून सावकाराची मनधरणी चुकली व लावणी वेळेवर झाली.' संथाळ खेड्यांमधून दारू अजिबात नाहीशी झाल्याचेही त्यानी सागितले. सामुहिक पशुपालन व अकिल आखाडा ह्याबद्दल त्याना माहिती नव्हती. कारण ऑगस्टपूर्वी ते संथाळ खेड्यामधून श्री. सोरेन ह्याना भेटण्यासाठी गेलेले होते.

श्री. सोरेन ह्याच्याशी बोलल्यानंतर त्यांचे कार्य डोळ्याखालून घालण्याची इच्छा स्वाभाविक आहे. पण जेथे हा कार्यक्रम सुरू आहे तो प्रदेश डोगराळ असून रस्ते व वाहने दोन्हीचा तेथे अभाव आहे. ह्या भागात १९६७ साली गाधी–शताब्दीच्या वेळी मी व माझी एक मैत्रीण आम्ही फिरलो होतो. वरील कार्यक्रम नीट पहावयाचा तर पाच-पंचवीस मैलाची पदयात्रा करावी लागेल व तीही शक्य तर श्री. सोरेन यांच्याबरोबर. सथाळांना 'दिकू'बद्दल अतिशय अविश्वास आहे. ते मोकळेपणी आपल्याशी बोलत नाहीत. तरीपण असा कार्यक्रम जमवून आणण्याची माझी धडपड आहे.

## ३

जयप्रकाशजी धनबादला १५ ऑक्टोबरला आले होते व त्याची जाहीर सभा गोल्फ ग्राऊडवर झाली त्याच्या चळवळीबद्दल श्री. सोरेन यांचे मत हेरावे म्हणून सूचक प्रश्न विचारला, 'काल जयप्रकाशजींच्या व्याख्यानाला होतात ना ?'

'होतो थोडा वेळ. मग निघून गेलो.'

'का बरं ?'

'सभेत एस. पी. सकट बरेच पोलीस होते. माझ्यावर अजून वॉरंट आहेच, तेव्हा म्हटल नको.' त्याच सदर्भात त्यांनी पुढे सांगितले की, उपायुक्त साहेबांशी धनबादला एकट्याने येऊन चर्चा करण्याचे त्यांनी टाळले. उलट पालत्याला हजारो लोकासमक्ष त्यांना पकडण्याची कोणाची टाप नव्हती. श्री. सोरेन ह्यांचे म्हणणे खरे होते. 'जेपी'बद्दल स्पष्ट उत्तरे देण्याचे त्यांनी टाळले.

त्याच्या सोळा मागण्याची यादी माझ्यासमोर आहे. त्या मागण्या जमीन, नोकऱ्या व मागास प्रदेशांत उपलब्ध नसणाऱ्या सोयी. उदा. सडका, दवाखाने, रेशनची दुकाने, रात्रीच्या शाळांना मदत, मुलांसाठी शाळा इत्यादिकांबद्दल आहेत. ह्या मागण्यांचा राजकारणाशी बादरायण सबध देखील नाही. आजची सथाळ चळवळच कुठल्याही राजकीय हेतूने प्रेरित नाही; ती आत्मोद्धाराची, एक मागास समाजाजाच्या विकासाच्या धडपडीतून जन्मलेली चळवळ आहे. संघटनेवाचून केवळ कार्यक्रमावर आधारलेली चळवळ, कार्यक्रमाच्या लक्ष्मणरेषेबाहेर जाऊही शकणार नाही.

वरील दोन चळवळी, अशा रीतीने सर्वतोपरी भिन्न असल्या तरी त्याच्यात कुठलाही दुवा नाही, हे मात्र खरे नाही. सथाळानी भारतीय स्वातत्र्याच्या लढ्यात केव्हाच भाग घेतलेला नाही, पण त्यांच्यावर होणाऱ्या जमीनदार–सावकारांच्या जुलमाला त्यानी, उठाव करून वारवार तोड दिले आहे. हे दोन्ही वर्ग मुख्यत्वे उच्च वर्णीय हिंदूचे होते. ब्रिटिश सरकारने त्याचे उठाव भरडून काढले. स्वतत्र भारतानेही आजवर त्यांची उपेक्षाच केली. आज मात्र जयप्रकाशजीच्या चळवळीने हादरलेले बिहार व दिल्ली शासन आणि त्याचे धोरण ठरवणारा कॉंग्रेस पक्ष, सथाळ नव्हे सर्वच आदिवासी जेपीपासून अलिप्त रहावे म्हणून, त्यांच्याशी गोड बोलत आहे. त्याच्या मागण्या पूर्ण करण्याची आश्वासने देत आहे. ही आश्वासने किती प्रमाणात पुरी केली जातील व त्याला किती अवधी लागेल, हे सथाळांच्या चळवळीइतकेच, किंबहुना त्याहूनही जास्त, जेपीची चळवळ किती जोर धरते व टिकवते ह्यावर अवलंबून आहे. जयप्रकाशना यश आले तर पुढच्या निवडणुकीत धनबादच्या ग्रामीण भागातून तरी सथाळ उभे रहातील–जिंकतील. पण त्यांची चळवळ दाबून धरण्यात कॉंग्रेसला यश आले तर सथाळाची चळवळही भरडून काढली जाईल.

सथाळाना हे अजून उमजत मात्र नाही. सरकारी धोरणात फरक झाला असे त्यांना वाटत नाही. सध्याचा जिल्हाधिकारी फार चागला आहे–ही वस्तुस्थिती आहे–त्यामुळे तो आपल्याला मदत द्यायला पुढे सरसावला आहे, असे मला ऐकायला आले. शासन–यत्र व माणूस ह्याच्या मर्यादा त्याना अजून समजलेल्या नाहीत. ☐

# जयप्रकाशांच्या चळवळीचा मानदंड

प्रभाकर पाध्ये

जयप्रकाश नारायणाच्या विहार–आंदोलनाचा मानदंड कोणता? ते आंदोलन यशस्वी झाले की विफल ठरले असे केव्हा समजायचे?

बिहारच्या विधानसभेचे विसर्जन हा तो मानदड मानायचा काय?

तसे असेल तर हे आंदोलन फसलेच आहे असे समजायला हरकत नाही.

इंदिरा–जयप्रकाश वाटाघाटी ज्या दिवशी मोडल्या, त्याच दिवशी इंदिराबाईंनी एका सभेत जाहीरपणे सागितले की, आपण राजिनामा देऊ, पण विहारच्या विधानसभेचे विसर्जन करणार नाही.

इदिरा गाधी मोडतील पण वाकणार नाहीत आणि वाकायची वेळ आली तर असा पवित्रा घेतील की जणू त्या ताठच उभ्या आहेत.

त्या कन्या नव्हत तर नात आहेत–म्हणजे जवाहरलाल नेहरूचे मार्दव त्यांच्यात नसून मोतीलालाचा बाणा आहे–आणि सत्तेची वारुणी या बाण्यात भिनल्यामुळे त्याचा आता ताठा झाला आहे.

तेव्हा आता बिहारच्या विधानसभेचे विसर्जन होत नाही.

इदिराजीची तयारी नसेल तर आपल्यालाही घाई नाही, आपण १९७६ च्या निवडणुकीपर्यंत आदोलन चालवू आणि कॉंग्रेसपक्षाचा धुव्वा उडवू असे जयप्रकाश यावर म्हणाले.

हा कच्च्या दिलाचा नेता नाही एवढे याने सिद्ध होते, पण आपली चालू चळवळ फसली याचा हा कबुलीजबाबच नव्हे काय?

जे सकाळच्या चहाची चव वाढविण्यासाठीच वर्तमानपत्रातील बातम्या वाचतात त्याची अशीच प्रतिक्रिया झाली असेल. आणि ज्यांच्या डोक्याला पारपरिक विचारांचेच वळण असते त्यांचीही वेगळी प्रतिक्रिया होण्याचे कारण नाही.

आणि जे इदिराबाईंचे चमचेच आहेत ते मनोमनी खुशीची बासुंदी ढवळीत बसले असतील!

## एकपक्षीय लोकशाहीची चाल

पण केवळ विधानसभेचे विसर्जन करण्यासाठी जयप्रकाश चळवळ करू शकत नाहीत. कारण त्याचे राजकारण हे निवडणुकीचे राजकारणच नाही. विधानसभेचे विसर्जन हे त्याच्या व्यापक आदोलनाचे केवळ एक साधन आहे. मुळात ही घोषणा त्यांची नाही. ती बिहारी विद्यार्थ्यांची घोषणा होती. आज या चळवळीचा तो एक फक्त नारा बनला आहे. या चळवळीची खरी दृष्टी निराळी आहे. जयप्रकाश तिला सपूर्ण क्राती म्हणतात.

पण या चळवळीला आणखीही एक परिमाण आहे

भारतात लोकशाही आली. पण ती पचविण्याइतकी ताकद भारतात नव्हती. प्रथम म्हणजे स्वराज्य. त्यात आपला वाटा किती? दुसऱ्या महायुद्धानतर जवळजवळ ते आपल्याला आंदण मिळाले. एका अर्थाने अकाली आलेले. स्वराज्य आले तेव्हा भारतीयामध्ये जरूर ती राजकीय जाणीव निर्माण झालेली नव्हती. आवश्यक तेवढे सार्वजनिक चारित्र्य आपल्या राष्ट्रात निर्माण झालेले नव्हते. भाषिक, जातीय आणि जातिक निष्ठानी आपले जीवन विकृतच बनवलेले होते.

नेहरू–पटेलसारखे अव्वल धारणेचे पुढारी होते, पण ते या समाजाला जखडलेले होते.

परिणामी आपल्या लोकशाहीचे रूपातर एकपक्षीय लोकशाहीत झाले.

एकपक्षीय लोकशाहीत राज्यकर्त्या पक्षाचा अध:पात होतो तसाच विरोधी पक्षाचाही होतो. सान्रा पक्षीय राजकारणाचा अध:पात होतो. राज्यकर्ते भ्रष्टाचाराने लडबडतात तसे सत्तावादी विरोधकही लडबडतात आणि लोक अगतिक बनतात.

अशा वेळी भ्रष्टाचारी राजकारणाला आव्हान देणारे आणि जनतेला पक्षातीत चेतना देणारे राजकारण व्हायला हवे.

पण हे करायचे कोणी? राज्यकर्ते करणार नाहीत आणि विरोधकही करणार नाहीत. दोघेही आजच्या भ्रष्ट राजकारणाचे मालगुजार! तांत्रिक लोकशाहीच्या पक्षीय पथकात सामील होऊन निवडणुकीचे नारे लावणे आणि सत्तास्थानातील जागाचे भ्रष्ट वाटप करणे हे त्याचे राजकारण बनलेले आहे.

गाधीच्या हिंदुस्थानात, गाधीवादाचा वारसा मिळालेल्या या देशात, सत्ताविन्मुख राजकारण करण्यास कोणी पुढे येत नव्हते.

अर्थात गांधीजीचे विधियुक्त वारस मौजूद होते. भूदानाच्या कल्पनेत आणि प्रक्रियेत प्रतिभेचा उत्स्फूर्त विलास दिसला होता.

पण पुढे या प्रतिभेला अहकार बाधला. गाधीची सत्याग्रहाची कल्पना अकरणात्मक (निगेटिव्ह) आहे असा तिला साक्षात्कार झाला. या सत्याग्रहाची विधायक परिशुद्धी व्हायला हवी असा तिला आंतरिक आदेश मिळाला. अन्यायाविरुद्ध सक्रिय सत्याग्रहात्मक लढा हा गाधीवादाचा आत्मा आहे; पण प्रथम मानव बदलणे, मानवाचे विधायक परिवर्तन करणे हा गाधीवादाचा आत्मा असल्याचा शोध तिला लागला.

आता मानवाच्या आत्म्याचा शोध म्हणजे सूक्ष्माचाच शोध, तेव्हा ही प्रतिभा सूक्ष्मात शिरली.

पण राजकारणाच्या स्थूल पातळीवर, जवाहरलाल आणि इंदिरा प्रियदर्शनी यांच्या अदर्शनीय राजकारणासमोर ही शरणागती होती.

मात्र गांधीवादी मंडळीत एक स्वतंत्र प्रज्ञेचा पुरुष होता. त्याची गांधीवादी अस्मिता जागृत होती. सत्याग्रही वीरवृत्ती अक्षत होती. पण का न कळे, काही तेजस्वी पत्रके काढणे आणि एखादे निषेधाचे वक्तव्य करणे यापलीकडे या प्रज्ञेचा आविष्कार होत नव्हता.

पण, १८ मार्च १९७४ रोजी बिहारात पाटणा मुक्कामी ही प्रज्ञा तेजाळली, आणि जनतेच्या जागृत प्रतिकाराचे राजकारण सुरू झाले.

एकपक्षीय लोकशाहीच्या वस्त्राला जनतेच्या जागृत प्रतिकाराचे अस्तर जोडण्याचे अति आवश्यक राजकारण सुरू झाले. भारतीय लोकशाहीच्या शुद्धिकरणाचा शुभारंभ झाला.

बिहारच्या विधानसभेचे विसर्जन ही या राजकारणाची घोषणा होती, पण भ्रष्ट राज्यकर्त्यांना चाप लावणे हे तिचे उद्दिष्ट होते.

आणि हा चाप लवकरच बसू लागला तो थेट आजच्या भ्रष्टाचारी भारतीय राजकारणाच्या गंगोत्रीला बसू लागला,

## सत्तावादी राजकारणाची स्पंदने

या गंगोत्रीबद्दल एक गोष्ट प्रथमच मान्य केली पाहिजे. तिची बुद्धी म्हणजे सत्तावादी राजकारणाचा 'रडार' आहे.

सत्तावादी राजकारणाची स्पंदने इंदिरा गांधींना जशी आणि जितकी भावतात तशी त्यांच्या कोणत्याही हस्तकाला भावत नाहीत. सत्तावादी राजकारणाची इलेक्ट्रॉनिक सुई हलल्याबरोबर आवश्यक ते बटन दाबण्याची चपळाई दुसऱ्या कोणापाशीच नाही.

इंदिरा गांधींच्या सज्ञाशक्तीला ही तल्लख क्षिलई कशी मिळाली हा एक आकर्षक संशोधनाचा विषय ठरेल. वडिलांचे तुरुंगवास, आईचे आजारपण, आजोबाचा मृत्यू, घरात राजकारणाची अखंड उलाढाल वगैरे गोष्टींमुळ त्यांचे कुटुंबजीवन विस्कळीत होऊन त्यांना दूर बोर्डिंगमध्ये वगैरे रहावे लागले आणि व्यक्तित्वाच्या प्राथमिक सुरक्षिततेसाठी स्वतःच्या हिकमती बुद्धीवर विसंबावे लागले. अगदी लहान वयातच स्वतःचे आंतरिक जीवन सर्वस्वी स्वतः बनविण्याची पाळी त्यांच्यावर ओढवली—यातून त्यांनी सत्तावादी राजकारणाची ही चलाख विद्या संपादन केली, अशी माझी समजूत आहे.

ते काहीही असो, जयप्रकाशांच्या नव्या प्रतिकारात्मक राजकारणाची विद्युल्लहर त्यांच्या पर्यंत तत्काळ पोचली. विरोधकांच्या प्रामाणिकपणाबद्दल आंतरिक आदर बाळगण्याची वृत्ती त्यांच्या अंतःकरणात वसत असली तर तिचे फारसे दर्शन अद्याप घडलेले नाही. राजकारण म्हणजे व्यक्तीचा वापर ही व्याख्या त्यांच्या रूपाने समूर्त झालेली आहे. भारताच्या राजकारणात व्यक्तीचा वापर सहज करता येतो आणि तिची गरज संपली म्हणजे तिला अलगद फेकून देता येते याचा अनेकवार अनुभव त्यांनी घेतलेला आहे. पण जयप्रकाश हे अशा वापराच्या पलीकडचे पुरुष, त्यामुळे पंचाईत झाली. त्यांनी भुवनेश्वरला जाऊन चक्क चारित्र्यहननाचे शस्त्र उपसले. जो गृहस्थ भ्रष्ट भांडवलवाल्याकडून पैसे घेऊन जगतो त्याने भ्रष्टाचाराच्या गोष्टी काय सांगाव्यात, असा सवाल त्यांनी केला.

पण जयप्रकाशांना 'वापरता' येत नाही त्याप्रमाणेच त्यांना नालस्तीचा चिखल चिकटत नाही हे त्यांना माहित नव्हते. तो धडा त्यांना मिळाला. त्यांच्या काँग्रेस पक्षातले त्यांचे आज्ञाधारक अनुयायीही गडबडले. ५१ काँग्रेसपक्षीय खासदारांनी एक पत्रक काढले. या पत्रकात प्रारंभी अर्थात इंदिरानिष्ठेची आरती होती, पण नंतर त्यांनी जयप्रकाशांच्या सत्वशील चारित्र्याची देशभक्तीची ग्वाही दिली. गृहमंत्री उमाशंकर दीक्षित यांना चक्क लोकसभेत, काँग्रेसपक्षाला जयप्रकाशाबद्दल आदर वाटतो असे उद्गार काढावे लागले. पण अनुयायांच्या आज्ञाधारक अनुतापाने भागण्यासारखे नव्हते. खुद्द इंदिराजींना भुवनेश्वरलाच जाऊन परिमार्जनपर असे काही बोलावे लागले.

या देशात सज्जनांच्या निंदेला काही मर्यादा असते. पण सत्तावादाची स्पंदने समजणाऱ्यांना नैतिकतेची स्पंदने समजतातच असे नाही.

शिवाय गांधीजींच्या या देशात गेली २५ वर्षे नैतिक बुद्धीचे अवमूल्यनच झालेले आहे. सार्वजनिक व्यवहारासाठी सुद्धा जीवनाला नैतिकतेची कडा असावी लागते याचे भान फारसे कोणाला उरलेच नाही. नेहरूपासून सारे विद्वान, आर्थिक क्षेत्रात संस्थात्मक बदल (institutional changes) केले (सहकारी सोसायट्या काढल्या, उद्योगधंद्यांचे राष्ट्रीकरण केले, वगैरे) की मानवाचे समग्र जीवन बदलते, संस्कृती बदलते, व्यक्तीचे अंतरंगच बदलते हा मार्क्सवादापासून घेतलेला भाबडा धडा गिरविण्यात गर्क झाले, आणि धूर्त पुढारी आणि लबाड व्यापारी, हा मार्क्सवाद पिळून आपला हिशेबी हौद जितका भरता येईल तितका भरू लागले. (काळाबाजार, परवाने-प्रकरणे, सहकारी सोसायट्यांचे भ्रष्टाचार! अशी अनेक उदाहरणे.) असे ढोबळ मार्क्सवादी आडाखे जीवनात उतरण्यासाठी आवश्यक असलेली एकसंधता मानवाच्या मेंदूत नाहीच हे आमच्या विद्यापीठीय विद्वानांच्या ध्यानात कधीं आलेच नाही. या गलत विचारसरणीचा प्रतिकार करणे हे विनोबाचे आणि विनोबावाद्यांचे कर्तव्य होते, पण एव्हापर्यंत गांधीवाद सूक्ष्मात गेला होता!

## जणू नियतीच

शाब्दिक चारित्र्यहनन म्हणजे संपूर्ण राजकारण नव्हे हे इंदिराबाईंच्या डोक्यातील सत्तावादी संज्ञाकेंद्रांना छान कळत होते. त्या जयप्रकाशांच्या राजकीय बंदोबस्ताला लागल्या. बिहारच्या चळवळीचे नेतृत्व जयप्रकाश घेणार अशी प्रतिक्षिप्त जाणीव झाल्याबरोबर बाई वर्ध्याला पोचल्या. विनोबांना बाईंबद्दल ममत्व होतेच. त्यांच्या सूक्ष्म बुद्धीला बाईंचे स्थूल राजकारण लगेच पटले असावे. पण इतर सर्व सेवासंघीयांची प्रज्ञा इतकी सूक्ष्म बनली नव्हती. गांधींचा 'निगेटिव्ह' सत्याग्रह त्यांना अद्याप स्फूर्ती देत होता. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी जाहीर सभेत सांगितल्याप्रमाणे (जयप्रकाशांच्या मागची सर्वोदयी शक्ती संपूर्ण छिनावून घेता आली नाही तर) सर्वसेवासंघात फूट पाडण्याचा बाईंचा इरादा होता. पण ही फूट ९५ विरुद्ध ५ टक्के इतकी माफक ठरली, आणि धर्मराजालाही 'नरो वा कुंजरोवा'ची बाधा होणाऱ्या परंपरेस जागून विनोबांनी जयप्रकाशांच्या चळवळीत भाग घेणाऱ्या आणि तिला विरोध करणाऱ्यांनाही आशीर्वाद दिला! बाईंची ही मोहिम फसली.

मग जयप्रकाशांच्या चळवळीकडून लोकांचे लक्ष उडावे म्हणून त्यांनी राजकारणी लोकांच्या ठेवणीतल्या क्लृप्त्या (गिमिक्स) लढविण्यास सुरवात केली. प्रथम भारतीयांच्या राष्ट्रीय अस्मितेस सुखद स्पर्श करणारा अणुस्फोट करविण्यात आला. (वस्तुतः या स्फोटाची तयारी १९७१ पासून होती, पण मुहूर्त आता साधला!) पण या स्फोटाविरुद्ध जगभर इतकी कडक प्रतिक्रिया झाली की कोणताही सुजाण मुत्सद्दी करणार नाही अशी गोष्ट बाईंना करावी लागली. आपण ही शक्ती युद्धासाठी कदापि वापरणार नाही असे निःसंदिग्ध आश्वासन त्यांनी दिले. कोणतेही धोरणी राष्ट्र आपले हात असे बांधून घेत नसते. (अणुगोल वापरण्याचे पहिले पाऊल आपण टाकणार नाही एवढेच चीनने जाहीर केले होते!) असे आश्वासन देणे बाईंच्या प्रकृतीत नाही. त्यांच्या चलाख राजकीय बुद्धीस वस्तुतः ते पटणारही नाही. पण भलत्याच बुद्धीने लढविलेल्या क्लृप्तीचा परिणाम भलताच झाला!

अणुस्फोटाविषयीच्या प्रतिक्रियेचा अदमास अगोदर बांधता तरी आला असता, पण बाईंच्या यापुढच्या क्लृप्त्यांना तर अकल्पिताचीच बाधा झाली. जणू नियतीनेच नाट मारला! ऐन सिक्किम-प्रकरणाच्या वेळीच पाँडिचेरीचे परवाना-प्रकरण उमटेल असे कोणाच्या ध्यानीमनी तरी असेल काय? सिक्किमशी असलेले भारताचे संबंध घट्ट केले आणि एक प्रकारे चीनला एक आव्हान दिले तर आपल्या स्तुतीची स्तोत्रे देशभर म्हटली जातील असे मांडे बाईंच्या मनी घोळत असतील, पण त्याच वेळी हे परवाना-प्रकरण संसदेत उतले आणि सरकारचा फजितवाडा लाल किल्ल्याशी स्पर्धा करू लागला!

त्यानंतर दिल्लीला तरुणांचा विराट मेळावा भरवून भारताचा तरुण आपल्याच पाठीशी आहे, जयप्रकाशांच्या पाठीशी नाही याचे कुतुबमिनारी प्रदर्शन करण्याचा घाट घालण्यात आला, पण त्याला नागपूर-मुंबईच्या—विशेषतः मुंबईच्या—प्रतिनिधींच्या पिसाट चाळ्याचा छेद मिळाला, आणि दिल्लीच्या मेळाव्याचे माळकरी म्हणजे व्हिस्कीच्या बाटल्या आणि 'निरोध' पिशव्या याची टांगलेली रांग असे सिद्ध झाले! प्रियरंजनदास मुन्शीचे स्वप्न हे बाईंचे दुःस्वप्न ठरले!

नंतर तस्करीविरुद्ध मोहीम उघडली. ही अर्थात् केवळ जयप्रकाशांच्या आंदोलनाला हुलकावणी नव्हती. बाईंच्या कारभारामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची जी चाळण झाली होती तिच्या एकदोन भोकात बोळे भरण्याची ही खटपट होती. पर तस्कराना पकडल्यामुळेच त्यांच्या मागे असलेल्या राजकारण्याना आणि मंत्र्याना बाईंचे सरकार हात लावू शकत नाही हे स्पष्ट झाले. त्यातच उच्च न्यायालयात पकडलेले तस्कर सुटू लागल्यामुळे या तस्करबंदोबस्ताची 'मस्करी' झाली. त्यावर आता वटहुकमाचा इलाज आला आहे. त्याची 'कुस्करी' न झाली म्हणजे मिळविली!

## छुपे रुस्तुम

या तस्करविरोधी मोहिमेमुळे लोकांचे जे राजकीय शिक्षण झाले तो तिचा खरा फायदा. महाराष्ट्र सरकारच्या पोलीस खात्यातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'दक्षता' मासिकाच्या नोव्हेंबर १९७४ च्या अंकात प्रसिद्ध झालेला हा तक्ता पहा:

| वर्ष | एकूण केसेस | अटक केलेल्यांची संख्या | जप्त केलेल्या मालाची रुपयात किंमत |
|---|---|---|---|
| १९६७ | ३१ | ११० | ३,८२,५७,७४८ |
| १९६८ | २९ | ८६ | ३,५७,६४,८०५ |
| १९६९ | ४४ | ७५ | ४,८२,६७,१५३ |
| १९७० | २६ | ९४ | १,८६,९१,९८३ |
| १९७१ | २४ | ४१ | १,०७,८५,२८६ |
| १९७२ | ४९ | ७५ | ०,९७,४७,७४४ |
| १९७३ | ८९ | ६० | १,६५,११,४११ |
| १९७४ (सप्टेंबर ३० अखेर) | ११५ | ५४ | २,३९,९३,११६ |

मुंबई पोलिसानी गेल्या ७ वर्षांत पकडलेल्या तस्करांचा आणि तस्करी मालाचा हा तक्ता आहे. त्याच्यावर नुसती स्थूल नजर टाकली तरी १९७०, १९७१, १९७२ साली खटले, पकडलेल्यांची संख्या आणि जप्त केलेल्या मालाची किंमत यात एकदम घट झालेली आढळेल. ही घट अतिशय बोलकी आहे. १९६९ साल बरेचसे उलटून गेले आणि इंदिरा गांधींचे 'एकतंत्री' राज्य सुरू झाले. १९७१ आणि १९७२ साली लोकसभेच्या आणि विधानसभांच्या निवडणुका झाल्या. म्हणजे इंदिराजींचे राज्य आणि त्यांचे निवडणूक—बनाव सुरू झाल्याबरोबर तस्करीवरची पोलिसांची पकड ढिली झाली. खटले, आरोपी, जप्त माल यांचे प्रमाण घटले. पण याच काळात तस्करीचे प्रमाण वाढल्याचा अनुभव मुंबईच्या रस्त्यारस्त्यावर आणि इतरत्र येत होता. म्हणजे तस्करी वाढली, पण पोलिसांचा बंदोबस्त ढिला! का? फार डोके चालविण्याचे कारण नाही. या तस्कराकडून इंदिराजींच्या पक्षीय राजकारणाला मुबलक मलिदा मिळाला. तस्कर हे इंदिरागांधींच्या राजकारणाचे 'छुपे रुस्तुम' बनले. म्हणूनच तस्कर पकडले तरी त्यांचा एकही राजकीय त्राता पकडला जात नाही. या पोलिसी मासिकात दिलेल्या तक्त्यातून हे सत्य सरळ उडी मारून बाहेर पडते.

अशा काही शंका लोकांच्या डोक्यात उद्भवल्या तरी एकंदरीने ही तस्कर-विरोधी मोहिम आपल्या सरकारची अब्रू उजळ करील; सरकार अगदीच काही लाजलज्जा कोळून प्यालेले नाही असे लोकांना वाटायला लागेल, आणि जयप्रकाशांविषयीची सहानुभूती ओसरू लागेल असे बाईंना वाटू लागले असेल, इतक्यात काय दुर्दैव! सुप्रीम कोर्टालाच अवदसा आठवली! एका निवडणूक-खटल्यात त्याने चक्क एका काँग्रेस खासदारालाच हवेत उडवला इतकेच नव्हे, तर निवडणूक-खर्चाच्या पक्षीय बेफाटपणावर टीका केली. आली पंचाईत! १८० निवडणूक-खटले न्यायालयाच्या पिंजऱ्यात आणि त्यात खुद्द एक बाईंचा! झाले. सरकारने वटहुकूम काढला, आणि निवडणुकीत उमेदवाराव्यतिरिक्त केवळ त्याच्या पक्षाने नव्हे तर त्याच्या मित्रानेही केलेली पैशाची उधळ वैध ठरविली! सरकारची अब्रू पुनः ठणकू लागली!

आता कम्युनिस्टांच्या साहाय्याने जयप्रकाशांच्या विरुद्ध निदर्शने

करण्याची नवी शक्कल इंदिराजींच्या पर्समधून बाहेर पडली आहे. पण जयप्रकाशांनी 'जनता चेकिंग'चा चाप लावल्यामुळे या निदर्शनातले 'लाल' पाटण्याला विनातिकिट आले होते, ललित नारायण मिश्राच्या आगगाड्यांनी त्यांची मोफत ने-आण केली होती ही गोष्ट जगजाहीर झाली. नंतर कॉंग्रेसच्या मिरवणुकीतल्या हत्ती-घोड्यांनी कॉंग्रेसचे जनताविरोधी ऐषआरामी स्वरूपही जाहीर झाले आणि (परत योगायोग!) त्याच वेळी संसदेत गफूरमियांच्या आणि इंदिरा गांधींच्या राखीव पोलिसांनी जयप्रकाशावर हाणलेली काठी गृहमंत्री रेड्डींच्या चेहऱ्यावर चांगलीच उमटली आणि माफी मागताना त्यांचे हिमटे तोंड चांगलेच वाकडे झाले!

एकंदरीत बाईंची एकेक युक्ती उताणी पडली! अगदी नियतीने सूड घ्यावा तशी! मी नियतीची साक्ष काढीत नाही. काढण्याचे कारण नाही. सत्तावादी चेष्टितांनी या सरकारचे वस्त्र इतके बरबटले आहे की ते कोणीकडूनही ओढले तरी घाणीचे डाग वर येतात!

## नैमित्तिक यज्ञ नव्हे

पण मी म्हटलेच आहे की सत्तावादी राजकारणाची स्पंदने इंदिराजींना झटकन जाणवतात. या अशा क्लृप्त्यांनी भागणार नाही हे त्यांनाच जाणवू लागलेले दिसत आहे. निवडणूक-कायद्यात दुरुस्ती करण्याची भाषा आता सुरू झाली आहे शिक्षण-पद्धतीत सुधारणा झाली पाहिजे असा साक्षात्कार होऊ लागला आहे. आम्हालाही भ्रष्टाचार नको आहे, असे आर्जवी उद्‌गार बाहेर पडू लागले आहेत. आणि जयप्रकाशाच्या चळवळीचे हेच मुख्य मुद्दे आहेत. विधानसभेचे विसर्जन हा नाही. विधानसभेचे विसर्जन म्हणजे काय? एक नुसता उपचार! एक विधी! जयप्रकाशाचा खरा रोख आजच्या निवडणूक कायद्याविरुद्ध आहे, आजच्या शिक्षणाविरुद्ध आहे, आणि आजच्या सरकारच्या तोंडातून फेसाप्रमाणे गळणाऱ्या भ्रष्टाचाराविरुद्ध आहे. आणि या बाबतीत बाईंचे आजवर घट्ट बसलेले तोंड आता उघडू लागले आहे. अर्थात याच्या मागे 'हृदय-पालट' वगैरे काही नाही. सत्तावादी राजकारणाला हृदय नसते. फक्त सत्ताशक्तीचे भाते असतात. तेच आता हालू लागले आहेत.

तेव्हा बिहारची विधानसभा रद्द होते की नाही ही मुळी जयप्रकाशाच्या यशापयशाची कसोटी नव्हेच. आता भ्रष्ट मंत्री आणि आमदार आपापल्या जागांना अद्याप चिकटून आहेत. पण त्यांची भ्रष्टाचार करण्याची ताकद पार गळून पडली आहे. त्यांची जनतेला तोंड दाखविण्याची हिंमत नाही. पोलिसांच्या पहाऱ्यात जगावे लागते त्यांना. घेतलेली लाच परत देण्याची पाळी त्यांच्या वर आली आहे. अंतःकरणात एक जबरदस्त धास्ती दाटली आहे.

आणि हीच खरी महत्त्वाची गोष्ट आहे. एकपक्षीय लोकशाहीत मंत्री, आमदार आणि अधिकारी माजतात. त्यांना आपली सत्ता जाईल अशी स्वप्ने सुद्धा पडत नाहीत. अशी विवंचना त्यांना लावण्याची ताकद विरोधी पक्षात असत नाही. लोकमत प्रभावी ठरण्याचा संभव उरत नाही. लोकमत ही लोकशाहीची आत्मशोधक (Self corrective) कळ असते. तीच गंजली होती. जयप्रकाशांनी ही कळ साफ करण्यास सुरवात केली आहे. भारताच्या एकपक्षीय लोकशाहीत विरोधी पक्ष हे कार्य करू शकतच नव्हते. सत्तातीत गांधीवाद्यांचे हे कर्तव्य होते. पण इतके दिवस गांधीवादाची शस्त्रे खादीच्या बासनात गुंडाळून पडली होती. आणि ती गंजत होती. जयप्रकाशांनी ती आता बाहेर काढली आहेत. जनताआंदोलनाच्या अग्नीत ती तावून निघत आहेत.

पण ही जबाबदारी नुसती जयप्रकाशांची नाही. नुसती बिहारची नाही. बिहारच्या विधानसभेचे काय होते ही गोष्ट आता गैरलागू ठरली आहे. जनताजागृती हे क्रांतिकारक तत्त्व जारी झाले आहे. ही जनताजागृतीची आणि जनता-प्रतिकाराची चळवळ आपल्या लोकशाहीची एक सततची गरज आहे या भूमिकेवरून ती देशात सर्वत्र पसरायला हवी. या चळवळीस वाहून घेणारे कार्यकर्ते पक्षातीत भूमिकेवरून सर्वत्र उभे राहायला हवेत. आता ही चळवळ नुसती भाववाढीच्या, ग्राहकसंघाच्या पातळीवर राहून चालणार नाही. राजकीय यंत्रणा, आर्थिक यंत्रणा, शैक्षणिक यंत्रणा-जीवनाच्या सर्व सार्वजनिक यंत्रणा-याच्या शुद्धीकरणाच्या आणि त्या सतत शुद्ध राखण्याच्या भूमिकेवरून ही चळवळ व्हायला हवी. सर्वत्र व्हायला हवी. निवडणूक-कायद्याच्या दुरुस्तीची फिकीर जयप्रकाश यांनी नेमलेल्या पालखीवाला कमिटीनेच करून उपयोगी नाही. शैक्षणिक सुधारणेची आंच फक्त छात्रसंघर्ष समितीला लागून भागणार नाही. जयप्रकाशांच्या चळवळीची व्यापक जाण सर्वत्र पसरायला हवी आणि कार्यान्वित व्हायला हवी. लोकशाहीच्या संरक्षणासाठीच त्याची गरज आहे. लोकशाहीच्या प्रसारासाठीच त्याची गरज आहे. इंदिरा गांधी आणि त्यांचे भाट 'लोकशाही वाचविण्या'ची भाषा बोलतात तेव्हा सध्याची एकपक्षीय लोकशाही आणि त्यातून मिळणारी सत्तेची हमी त्यांना अभिप्रेत असते. पण आजच्या भ्रष्ट-घाणिष्ट लोकशाहीचे शुद्ध लोकशाहीत कधी काळी रूपांतर व्हायचे असेल तर गांधीवादी सत्याग्रहाचे सत्र सतत चालू हवे. तो एक नैमित्तिक यज्ञ असून भागणार नाही. तो दररोजचा वैश्वदेव व्हायला हवा.

## गांधीवादाचा पुनर्जन्म

आहे या अवस्थेतही जयप्रकाशाच्या चळवळीने माझ्यासारख्यांना समाधान आहे. समाधान अशासाठी की—

—गांधीवाद पुन्हा प्रज्वलित झाला आहे. जेथे जेथे अन्याय दिसेल तेथे तेथे शांततामय प्रतिकार हे गांधीवादाचे मर्म आहे. गांधींच्या देशातच कोळपलेला गांधीवाद जयप्रकाशांनी जिवंत केला हे त्यांचे यश केवळ ऐतिहासिक म्हणावे लागेल.

—या आंदोलनामुळे जयप्रकाशाचे भारतीय इतिहासातले स्थान पक्के झाले आहे. मला नेहमी वाटायचे की, हा महान पुरुष केवळ प्रचलित राजकारणात नसल्यामुळे आमचे इतिहासकार त्यांना न्याय देणार नाहीत. इंदिरा-सरकारने तयार केलेल्या या 'कुपी-बंद' इतिहासात त्यांचा नामोल्लेखही नसेल. पण इतिहास कुपीबंद होत नसतो, तो कुपीबाहेर घडतो-हे इंदिरा गांधींना दाखवून देणाऱ्या या पुरुषाचे नाव आता कोणताही सरकारी इतिहासकार दडवू शकणार नाही.

—या आंदोलनामुळे इंदिरा गांधींच्या सत्तावादी राजकारणाचे सत्य दर्शन घडत आहे. बांगला-मुक्तीची झापड भल्याभल्यांच्या डोळ्यावर आली होती. एक कोटी निर्वासित आल्यावर कोणत्याही

# सूत्रकार

## गोपालन समिती आणि आदिवासी शेतकरी

[ माणूस ३ ऑगस्ट (७४) अंकात सूत्रकार (ता. तळासरी. जि. ठाणे) या गावी आदिवासींच्या जमिनीबाबत निर्माण झालेल्या वादातील गोपालन समितीची एक बाजू प्रसिद्ध झालेली आहे. ही बाजू चुकीची असल्याबद्दलचे लिखाण नंतर मुंबईच्या काही वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले. त्यामुळे वस्तुस्थिती काय आहे हे जाणून घेणे अवश्य ठरले. यासाठी सुप्रसिद्ध सर्वोदयी कार्यकर्ते व शहादा येथील आदिवासी चळवळीचे एक प्रमुख संघटक श्री. गोविंदराव शिंदे यांना सूत्रकार येथे जाऊन येण्याची विनंती माणूसने केली. त्याप्रमाणे शिंदे यांचा या भागात नुकताच दौरा झाला. दौऱ्यात झालेल्या भेटीगाठींचा व चर्चेचा हा निष्कर्ष ]

गेल्या ७ जुलैला ठाणे जिल्ह्यातील तलासरी तालुक्यात सूत्रकार या गावी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात रिशाशनवार हा कातकरी ठार झाला. भाग्या पाटकर हा जखमी झाला. त्याच्या हातातून गोळी गेली व तो कामाला निकामी झाला. महाराष्ट्र गोपालन समितीने या सूत्रकार गावात जमीन घेऊन शेतीविस्ताराचे काम सुरू केले. ती जमीन पूर्वापार आपण कसतो असे म्हणून आदिवासींनी आपली वहिवाट सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यातून संघर्ष झाला व गोळीबार झाला. मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी श्री. चंदु हलवाई यांनी सूत्रकार या गावचे एक जमीनदार श्री. लक्ष्मीशंकर जोशी याचेकडून जमीन सुमारे ४८० एकर खरेदी केली. व पुढे गोपालन समितीची स्थापन करून ती जमीन त्यांनी गोपालन समितीला दिली. तशी लक्ष्मीशंकर जोशी यांची जमीन या सूत्रकार गावामध्ये सुमारे ७०० एकर आहे. बऱ्याच जमिनीवर आपली वहिवाट आहे असे गावचे आदिवासी म्हणू लागले. म्हणून कागदोपत्री निर्वेध असलेली जमीन सुमारे ४८० एकर गोपालन समितीने खरेदी केली. ही बहुतेक सर्व जमीन गवती आहे. स्वत. जमीनदार अलीकडे फारशी शेती करीत नव्हते. गवताचा लाभ त्याना मिळे. ही जमीन खरेदी करण्याची परवानगी सरकारकडून मिळवायला पाहिजे होती. स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांना गोपालन समितीने समितीच्या कार्याची माहिती पटवून देऊन त्यांच्यामार्फत ही परवानगी मिळविण्यात आली. जमीन गोपालन समितीने खरेदी केली व कामाला सुरुवात केली. प्रथम त्यांच्या कार्याची पद्धत तेवढी चांगली नव्हती असे बोलले जाते. अनेक अयोग्य गोष्टी झाल्यामुळे त्यांची प्रतिक्रिया वाईट झाली. मोठे ध्येय असलेली गोपालन समिती कशी आहे हे लोकांच्या लक्षात आले. जमीन पदरात पडल्यावर ज्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी जमीन मिळविण्याचा प्रयत्न केला त्यांचीही पर्वा केली गेली नाही.

गोपालन समितीच्या प्रमुखांना व्यवस्था बदलावी लागली व गेल्या वर्षीपासून श्री. राम पाटणकर या शेतीतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तेथे काम सुरू आहे. श्री. पाटणकर यांनी धडाक्याने कामाला सुरुवात करून तेथील शेतीला रूप आणले शती, भाजीपाला होऊ लागला. सुमारे १०० एकर जमीन लागवडीखाली आली. गोशाळा वाढली. गेल्या पावसाळयात शेतीच्या हंगामात अधिक जमीन लागवडीला आणण्याचा प्रयत्न करीत असताना या विस्तारवादाचे आदिवासींना भय वाटले. व आपली या जमिनीत वहिवाट आहे हे सिद्ध करण्यासाठी आदिवासींनी जमीन नांगरायला सुरुवात केली. त्यातच ७ जुलैची गोळीबाराची घटना घडली.

जमीन गवती असल्यामुळे वरकस आहे. वरकस जमिनीत दरवर्षी शेती होतेच असे नाही. आदिवासी जमीन कशीत होते असे मान्य केले तरी गोपालन समितीने जी जमीन खरेदी केली. ती जमीन आदिवासी कसतात अशी कागदोपत्री नोंद नाही. डाव्या कम्युनिस्टाचे या भागात गेली कित्येक वर्षे काम आहे. सूत्रकार हे गावतर त्यांचा बालेकिल्ला आहे. इतके असताना आदिवासी कशीत असलेल्या जमिनीची नोंद कागदोपत्री का होऊ शकली नाही ते समजत नाही. आदिवासींना भेटल्यानतर आपण पिढयान पिढया ही जमीन कसतो असेच ते सांगतात तलासरीचे सार्वजनिक कार्यकर्ते, संबंधित लोक, गोपालन समितीत पूर्वी काम करीत असलेले लोक यांच्याशी बोलल्यानतर हे लक्षात येते, की आदिवासी ती जमीन कशीत

---

सरकारला काही परिणामकारक उपाययोजना करावीच लागली असती. इंदिरा गांधींनी केली म्हणून त्यांना धन्यवाद. पण इंदिरा गांधीपाशी सरदार पटेलांची धडाडी असली तरी त्यांचा शहाणपणा आणि चारित्र्य नाही, ही गोष्ट या आंदोलनाने चवाट्यावर मांडली आहे.

—या आंदोलनाने भारतीय कम्युनिस्टांचे सत्य स्वरूप पुन्हा एकवार उकिरड्यावर आले आहे. या कम्युनिस्टांच्या देशद्रोही अंतरंगाचे प्रथम दर्शन १९४२ साली घडले. त्या चळवळीत लाहोर मुक्कामी भूमिगत जयप्रकाशांना पकडून देण्याचे पुण्यकृत्य एका कम्युनिस्टानेच केले होते. आता १९७४ साली कम्युनिस्टाचे अंतरंग जयप्रकाशच उघडे करीत आहेत. आजच्या नव्या पिढीला कम्युनिस्टाचे (जुनेच) दर्शन स्वच्छ घडत आहे हे वाईट नाही.

—जयप्रकाशांच्या आंदोलनाने, विरोधी पक्षाचे शुद्धिकरण होण्याचा संभव निर्माण झाला आहे. हे विरोधी पक्ष नुसतेच भ्रष्ट बनले नाहीत. ते आपल्या कालबाह्य विचार-प्रणालीचेही बंदी झाले. या चळवळीत या विचारप्रणाल्यांच्या बेड्याही तुटल्या तर ती फारच चांगली गोष्ट होईल. मला तर वाटते की, या आंदोलनात खुद्द जयप्रकाशांची विचारसरणी घगघगून निघेल. तत्त्वज्ञाने (या लेखाप्रमाणे) खोलीत तयार होत नाहीत–ती जीवनाच्या मुशीत तयार होतात आणि जीवनाच्या आचेने शुद्ध होतात. प्रचलित राजकीय तत्त्वज्ञानांना एक जबरदस्त आच लावण्याचे कार्य जयप्रकाश करीत आहेत. □ □

होते. आता ती जमीन नेमकी कोणती आहे ? गोपालन समितीने ४८० एकर जमीन जी घेतली त्यापैकी ती आहे का, वगैरेचा विचार व्हायला पाहिजे. त्यासाठी गोपालन समितीने आपल्या जमिनीच्या हद्दी निश्चित करून घेतल्या पाहिजेत आणि त्या निश्चित करून घेतल्यानतर त्याच्या आत जर आदिवासीची वहिवाट पूर्वीपासून आहे हे लक्षात आले, कागदोपत्री त्याचा उल्लेख जरी नसला तरी सुद्धा गोपालन समितीने ती जमीन आदिवासीना सोडून दिली पाहिजे.

पण मुख्य प्रश्न गोपालन समितीपुढे आहे तो म्हणजे या तटधाच्या जमिनीचाच आहे असे नाही. गोपालन समितीला २९.२० एकर जमिनीची खरेदीची मूळ परवानगी मिळाली. नतर इतर जमीन खरेदीची परवानगी त्याना मिळाली. आता पुढची त्यांना मिळालेली परवानगी ही बेकायदेशीर आहे म्हणून रद्द झालेली आहे. आता गोपालन समितीच्या नावावर . कागदोपत्री फक्त २९.२० एकर जमीन आहे. आजच्या, कायद्याप्रमाणे बाकीची जमीन सिलिंगमध्ये येईल व नियमाप्रमाणे वाटावी लागेल. आणखी ५४ एकर जमीन गोपालन समितीला कायद्याप्रमाणे मिळू शकेल असे दिसते. ही सर्व जमीन खरेदीची परवानगी आपल्याला मिळावी, सिलिंगमध्ये ती येऊ नये अशी खटपट गोपालन समितीच्या वतीने होणे स्वाभाविक आहे, तशी ते खटपट करीत आहेत असेही कळले.

तलासरी तालुका हा महाराष्ट्रातील एक छोटा २७ गावांचा तालुका आहे. गुजरातच्या सरहद्दीला लागून असलेला हा तालुका. सर्व गावात वीज पोहोचलेली आहे. भूमिगत पाणी विपूल आहे. आठ दहा हातावर खोदले की पाणी लागते. आदिवासी बहुसंख्य असलेला हा तालुका. निसर्गाची अनुकूलता एवढी मोठी असतानाहा गेल्या २७ वर्षाच्या स्वराज्याच्या काळात तेथील आदिवासीचे रूप बदलू शकले नाही. श्रीमती गोदावरीबाई परुळेकर यांच्या नेतृत्त्वाखाली तेथे कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने गेली अनेक वर्षे काम चाललेले आहे. या कामामुळे तेथील गरीब आदिवासी जागृत झालेले आहेत. आपले हक्क आपल्याला मिळाले पाहिजेत. त्यासाठी आपण झगडले पाहिजे, संघटित झाले पाहिज इतकी त्यांची तयारी झाली आहे. परतु त्याचे शिक्षण, त्यांची शेती, शेतीला जोड उद्योग या दृष्टीने विशेष काही ह्या भागात होऊ शकले नाही. येथील पचायत समिती कम्युनिस्टांच्या ताब्यात आहे. विकास योजनेतील आदिवासी ब्लॉकच्या सवलती या तालुक्याला लागू आहेत तरी त्याचा प्रकाश कुठे दिसत नाही. मी गटविकास अधिकारी यांना भेटलो तेव्हा ते व त्यांचे सहकारी म्हणाले की, आदिवासी करता इतक्या सवलती असूनही आदिवासी त्याचा लाभ घेत नाहीत अशी येथील स्थिती आहे. कम्युनिस्टांचे कित्येक वर्षे काम असून, पचायत समिती त्यांच्या ताब्यात असून असे का होत आहे ते समजत नाही. या पार्श्वभूमीवर गोपालन समितीने तेथे कामाला सुरुवात केली. हा एक आशेचा किरण आहे. कोणताही राजकीय हेतू व आर्थिक स्वार्थ मनात न ठेवता आदिवासीच्या सर्वांगिण सामाजिक, आर्थिक विकासासाठी महाराष्ट्र गोपालन समितीची स्थापना झालेली आहे. या ध्येयाप्रमाणे गोपालन समितीने जर काम केले तर आज जी स्थिती तेथे निर्माण झाली आहे त्यातून बाहेर पडायचा मार्ग स्पष्ट दिसू शकेल. आज श्री. राम पाटणकर यांच्या नेतृत्त्वाखाली गोपालन समिती त्या दिशेने पावले टाकीत आहे. तेथील आदिवासीच्या स्थितीत बदल व्हायचा असेल तर त्यांची शेती समृद्ध झाली पाहिजे व शेतीला जोड धंदा गोपालनाचा मिळाला पाहिजे. योग्य मार्गदर्शन असेल तर शेती समृद्ध होईल अशी स्थिती आहे. गोपालनाच्या दृष्टीने हवामान वगैरे अनुकूल आहे. मुबई जवळ असल्यामुळे दुधाचा खपही चागला होऊ शकेल. दाबचरी येथे सरकारी गोपालनाचे मोठे काम चाललेले आहे. संशोधन चाललेले आहे याचा आदिवासीना फारसा काही उपयोग होत नाही. आज जे तेथे जे काम चाललेले आहे त्यामध्ये अवाढव्य पैसा खर्च होत आहे. व त्यामानाने त्यातून काही निष्पन्न होत नाही. गोपालन समितीला याचेही उत्तर द्यायचे आहे म्हणून अधिक जमिनीची हाव न ठेवता शेतकऱ्याची जमीन ही आपलीच जमीन असे समजून तेथे प्रयोग व मार्गदर्शन करीत रहाण्याचे काम गोपालन समितीने करायला हवे. हा जमिनीचा वादही सध्या जो सुरू झाला आहे तो लवकर मिटला पाहिजे. सरकारकडून तो वाद मिटेल किंवा राजकीय पक्षाचे नेते हा वाद लवकर सोडवतील अशी शक्यता दिसत नाही. हा वाद जेवढा वाढेल तेवढा आपला फायदा असेच त्यांचे मानस रहाणार हे लक्षात घेऊन सबधित मडळी व गोपालन समिती यांनी एकत्र बसून त्यातून मार्ग काढला पाहिजे. व हा जो मार्ग निघेल त्याला शासनाने समती दिली पाहिजे. म्हणून शासनाचे सबंधित अधिकारीही या बोलण्याच्या वेळी उपस्थित असले पाहिजेत. मुख्य प्रश्न आहे गोपालन समितीच्या कामाचा. गोपालन समितीचे जे ध्येय धोरण आहे त्या दृष्टीने काम पुढे जाण्याची अत्यत आवश्यकता आहे.

—गोविंद का. शिंदे

---

# साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर


वार्षिक : **छत्तीस रुपये**

सहामाही : **वीस रुपये**

परदेश : (जलमार्ग)

**पंचावन रुपये**

# ग्रंथालय आणि विद्यार्थीवाचक

माणूसचे एक लेखक वि. शं पारगावकर व फर्ग्युसनच्या 'बाई जेरबाई वाडिया' ग्रंथालयाचे ग्रंथपाल द. ब. माडीवाले यांची एक वेगळी मुलाखत

**तुम्ही या ग्रंथालयात केव्हा आलात ?**

—ह्या ग्रथालयात मी ऑगस्ट १९७२ मध्ये आलो—माडीवाले.

**पूर्वी कुठे होता ?**

—ह्याच्या पूर्वी दिल्लीच्या एका मुलीच्या प्रख्यात महाविद्यालयात ग्रथपाल म्हणून १३ वर्षे होतो. ह्याच महाविद्यालयाचे भूतपूर्व ग्रथपाल व माझे आदरणीय गुरुजी कै. श्री. पारखी याच्या प्रेरणेनेच १९५९ साली दिल्लीस जाण्याचे धाडस मी केल. त्यांच्याच प्रेरणेने सन १९६५ मध्ये 'द्विबिन्दु वर्गीकरणाचे' हे पुस्तक हिंदीत लिहून प्रसिद्ध केले. पुस्तकाच्या निमित्ताने व राजधानीत राहिल्यामुळे ह्या क्षेत्रातले बिविध अनुभव मला आले. विशेषत: महाविद्यायीन ग्रंथालयाबाबत. त्याचा फायदा मला इथे आल्यानतर खूप झाला..

**पूर्वीच्या आणि आताच्या ग्रंथालयातील कामात तुम्हाला काही फरक वाटला का ?**

पूर्वीही महाविद्यालयाच्या ग्रंथालयातच काम करीत असल्याने तसा फारसा फरक आढळला नाही. परतु या ग्रथालयातील ग्रथांची अतिव्याप्ती मात्र विशेष जाणवली.

: हे महाविद्यालयाचे ग्रथालय आहे; परतु मुळात ते सशोधन अथवा विद्यापीठाचे ग्रथालय वाटते सर्वच दृष्टीने तुम्हाला महाविद्यालयीन ग्रथालयाच्या सदर्भात ही अतिव्याप्त जमेची बाजू योग्य वाटते काय ?

—होय. ही अतिव्याप्त जमेची बाजू योग्य व स्वाभाविक आहे. आमच्या महाविद्यालयाच्या ग्रथालयातला एक इतिहास आहे. उज्ज्वल परपरा आहे. ह्या महाविद्यालयावर पूर्वीच्या विद्वान मडळीचे अनन्वित प्रेम व श्रद्धा होती. ह्या प्रेमामुळे किंवा श्रद्धेपोटीच त्यानी दिलेले अत्यंत दुर्मिळ ग्रथ किंवा अशा ग्रथांनी भरलेली ग्रथालयेच्या ग्रथालये आपल्याला देणगीदाखल लाभली. अशा प्रकारच्या ग्रथामुळे ह्या ग्रंथालयाला सशोधनाच्या साधन सामग्रीचे स्वरूप येणे स्वाभाविक आहे. खरे म्हणजे असे ग्रथ महाविद्यालयात आहेत हे आपले महान भाग्य आहे. ह्या ग्रथाचा सांभाळ करण आपल कर्तव्य आहे.

महाविद्यालयीन ग्रथालय उच्च शिक्षणासाठी असल्याने त्यातील ग्रथ अद्ययावत सखोल ज्ञान देणारे असेच हवेत. ज्ञानात रोज नवी भर पडत असल्याने अद्ययावत ग्रथांचा भरणाही महाविद्यालयीन ग्रथालयात होणे आवश्यक असते. ह्या दृष्टीने आमच्या ग्रथालयात असे ग्रंथही भरपूर आहेत व आमच्या प्राध्यापकाचा हे ज्ञानभाडार अद्ययावत ठेवण्याचा सतत प्रयत्न चालू असतो.

महाविद्यालयीन ग्रंथालय केवळ परीक्षार्थी राहून चालत नाही. फक्त उपयुक्त क्रमिक पुस्तकाची भरती करीत राहिल्याने महाविद्यालयीन ग्रंथालयाचा दर्जा हीन होत जाईल. क्रमिक पुस्तके म्हणजे ज्ञानसागराच्या किनाऱ्याजवळील उथळ पाणी. ह्याच्यातूनच विद्यार्थ्यांना अथांग ज्ञानसागरात घेऊन जायचे व त्यातील आनद लुटायला शिकवायचे असते.

: आपल्या जवळ असलेल्या साधन सामग्रीचा योग्य उपयोग होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने येथील सर्व ग्रथांचा योग्य उपयोग होतो काय ?

—आपले म्हणणे अगदी बरोबर आहे. प्रत्येक वाचकाला त्याचे पुस्तक व प्रत्येक पुस्तकाला त्याचा वाचक मिळावा हे तर ग्रथालयशास्त्राचे मुख्य तत्त्वच आहे. या दृष्टीने आमच्याच ग्रथालयाबद्दल बोलायचे झाल्यास ५०% ग्रथ नेहमीच वाचण्यासाठी वाचक नेत असतात. २५% ग्रंथ मधून मधून वाचण्यासाठी नेले जातात. १५% ग्रंथ अगदी क्वचित वापरले जातात. उरलेल्या १०% ग्रथापैकी ३% ग्रथ सदर्भग्रथ आहेत व २% वाचनसाहित्य अत्यत जीर्ण हाताळण्यास कठीण असे झाल्याने ते सोडल्यास ५% ग्रथ असे उरतात की जे कधीच वाचले जात नाहीत. एकदरीने पाहिल्यास ही स्थिती वाईट नाही. कारण ९३% ग्रथ वर्षातून कधी ना कधी तरी वाचले जातात किंवा सदर्भासाठी हाताळले जातात. मला वाटते अन्य महाविद्यालयातील ग्रथालयातही थोड्या फार फरकाने हेच प्रमाण पडेल.

: या ग्रथालयात एकूण दीड लाखाच्या वर ग्रंथ आणि संदर्भ साहित्य मिळून आहेत. या सर्वांचा ग्रंथालयशास्त्राच्या सूत्राप्रमाणे योग्य वेळी व योग्य उपयोग होतो असे मला वाटत नाही. हे खरे असेल तर त्याचा पुरेपूर उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने तुमच्या मनात काही योजना आहेत काय ?

आपण म्हणालात त्याप्रमाणे ह्या ग्रथालयाची ग्रथसख्या दीडलाखाच्यावर नसून १,४४००० इतकी आहे. आताच सागितल्याप्रमाणे बहुसख्य पुस्तके कोणी ना कोणी वाचायला घेतो किंवा तेथेच सदर्भ पहाण्यासाठी हाताळतो. अर्थात हे प्रमाण याहून बरेच अधिक असावयास हवे. पूर्वी ज्या महाविद्यालयात मी होतो तेथे एकदर विद्यार्थिनीच्या सख्येच्या ¾ विद्यार्थिनी रोज ग्रंथालयात येत असत व

त्याच प्रमाणात पुस्तकेही वाचण्यासाठी नेली जात.

ह्यासाठी विद्यार्थ्यांना मुक्त संचारास (Open Access) परवानगी देणे हा सगळ्यात प्रभावी मार्ग आहे. त्यायोगे वाचक स्वत: पुस्तकाच्या शेल्फजवळ जाऊन आपले पुस्तक तर शोधून घेऊ शकतोच पण शिवाय त्याला आपल्या पुस्तकाच्या सान्निध्यात असलेल्या अन्य पुस्तकाची देखील ओळख होते. व तो ती पुस्तकेही पुढे केव्हातरी वाचण्यासाठी नेतो.

मुक्तसचारास परवानगी दिल्याने काही वाचकांकडून ह्या सवलतीचा गैरफायदाही घेतला जातो व हीन मार्गांनी पुस्तके बाहेर नेली जातात. असे वाचक १ किंवा २ टक्के असले तरी त्यामुळे ग्रथालयाचे नुकसान झाल्याशिवाय रहात नाही. परंतु ह्या तोटा सहन करून विद्यार्थ्यांना तशी परवानगी द्यावी असे मत आता सर्व मान्य झाले आहे.

ह्याच्यामुळे आणखीही एका अडचणीला तोंड द्यावे लागते. विद्यार्थ्यांकडून पुस्तकांची माडणी सपूर्णपणे विस्कटविली जाते. ती नीट करण्यासाठी व पुस्तके पुन: क्रमवार लावण्यासाठी पुरेसा सेवकवर्ग ग्रथालयात नसेल तर मुक्तसंचारव्यवस्था कधीच यशस्वी होत नाही. त्यासाठी विद्यापीठ अनुदान मडळाने केलेल्या शिफारशीप्रमाणे स्टाफ नेमल्यास अडचण येणार नाही.

मुक्तसचार व्यवस्थेबरोबरच मार्गदर्शनासाठी ठिकठिकाणी बोर्डस् लावणे, पुस्तकांची शेल्फवर विषय क्रमवार बिनचूक मांडणी करणे, वेळोवेळी ती तपासून त्यात बिघाड झाला असल्यास ठीक करणे, वाचकाला पुस्तक मिळत नसल्यास ते शोधून देण्यासाठी मदत करणे, पुस्तक कुणी नेले असल्यास त्याची माहिती विनाविलब देणे, त्यासाठी नेलेल्या पुस्तकाचे रेकॉर्ड बिनचूक ठेवणे ह्याही गोष्टी व्हायला हव्यात तरच योग्य वेळी योग्य ते पुस्तक चटकन् मिळू शकेल.

: जागा हा आता एक मोठा प्रश्न तुमच्यापुढे उभा असेल. बाहेरून आलेले एक कपाट देखील आत ठेवण्यास आता जागा नाही असे मला वाटते. दरवर्षी होणारी ग्रथखरेदी, येणाऱ्या नियतकालिकांचे बांधलेले अक आणि देणगी म्हणून येणारे ग्रंथ यांची भर दर वर्षी पडत रहाणारच. जागेच्या संदर्भात तुम्ही हा प्रश्न कसा सोडवाल ?

—आमच्यापुढे जागेचा प्रश्न खरोखरच फार बिकट होऊन बसलाय. बरीच पुस्तके महाविद्यालयातील अन्य खोल्यामधून आम्हास ठेवावी लागत आहेत. नवीन भाग वाढवणेही सध्याच्या काळात अशक्य आहे. अशा वेळी ह्यावर उपाय म्हणून निरुपयोगी पुस्तकांची सख्या कमी करून जागा करण्याचे यदा आम्ही ठरवले आहे. अत्यंत जीर्ण न हाताळण्याजोगी पुस्तके, बरीच पाने फाडल्यामुळे निरुपयोगी झालेली पुस्तके, नवीन प्रत ग्रंथालयात आली असल्यास सदर्भ ग्रथाच्या जुन्या प्रती व काही इतर अनावश्यक पुस्तके अशी जवळजवळ २–२॥ हजार पुस्तके तरी काढून टाकण्यासारखी (Weeding out) आहेत. तरी सुद्धा तेवढ्यामे जागेचा प्रश्न सुटणार नाही. ग्रथालयाला त्यातले त्यात जवळ असलेला हॉल किंवा खोली ह्यासाठी उपयोगात आणल्याशिवाय गत्यतर उरणार नाही.

: ग्रथालयातील सेवकवर्ग (विशेषत. शैक्षणिक सस्थामधील) हा आजवर नेहमी टीकेचा विषय होत आलेला आहे. या मताशी तुम्ही सहमत असाल तर याची काही कारणे संभवतात का ? वास्तविक अत्यत जबाबदारीचे जोखमीचे (उदा. बँका, पोस्ट, रेल्वे, टेलिफोन, विमा इत्यादी) असे काम ग्रथालकात असते का ? जे असेल ते साधे ठराविक साच्याचे असे असते. मग हा नोकरवर्ग ते अगदी सहजतेने, हसतमुखाने का पार पाडू शकत नाही ?

—ह्याबाबत ग्रथालयातील सेवकवर्गाला दोष देणे योग्य होणार नाही. विद्यापीठ अनुदान मडळाची स्थापना होण्यापूर्वी (इ. स. १९५६ पूर्वी) महाविद्यालयीन ग्रंथालये ही फक्त प्राध्यापक व काही थोडे हुशार विद्यार्थी हेच वापरीत असत. अभ्यासिका (Study Room) (Reading Hall) सोडल्यास बाकी ग्रथालय 'प्राध्यापकांचे ग्रथालय' (Professor's Library) म्हणूनच समजले जाई. काही ठिकाणी तर विद्यार्थ्यांना ह्या ग्रथालयातून पुस्तक घ्यायचे झाल्यास प्राध्यापकांचे शिफारसपत्र आणावे लागे. अशावेळी ग्रंथपाल किंवा अन्य सेवकवर्ग अगदी कमी शिकलेला देखील चालत असे. ग्रथालयशास्त्राबद्दल एवढे महत्त्वही वाटत नसे. पुस्तकांची उलथापालथ होण्याचे कारणच नसे. प्राध्यापक देखील स्वत: कधीच पुस्तके काढीत नसत. नवीन आलेली पुस्तके एकदा लावली की पुन. त्यांच्या जागा बदलण्याचे कारण नसे. पुस्तके नेणाराची सख्याही अतिशय कमी असे. सबध दिवसात ३०–४० पुस्तके गेली तरी फार झाली.

परतु अनुदान मडळाची स्थापना झाल्यानतर विद्यापीठ–महाविद्यालये याचे स्वरूप बदलत गेले. मोठ्या प्रमाणात अनुदान मिळू लागल्याने त्याची स्थिती सुधारू लागली. अनुदानाबरोबरच मडळाने जी बधने घातली व ज्या शिफारशी केल्या त्या योगे महाविद्यालयाचे जुने स्वरूप बदलून गेले. नवे विचार-नव्या कल्पना प्रसृत होऊ लागल्या. उच्च शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होऊ लागला. ग्रथालयातही बदल झाला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सख्या वाढली. त्याबरोबरच ग्रथालयात येणाऱ्याची सख्याही वाढली. ग्रथसंख्याही भराभर वाढू लागली. मुक्त सचार पद्धती (Open Access) आली, त्यामुळे ग्रथालयातून व्यवस्था ठेवण्यासाठी ग्रथालयतत्राच्या जाणकारांची गरज भासू लागली.

त्याचबरोबर १९६२ सालचे चीनशी युद्ध, १९६५, १९७१ मध्ये झालेली भारत-पाकिस्तानची दोन युद्धे. आणि अन्य अनेक आन्तरराष्ट्रीय कारणामुळे किंवा देशातील अतर्गत अवर्षण, अतिवर्षण इ. मुळे आलेली अरिष्टे ह्या सर्वांचा परिणाम महागाई सतत वाढण्यात झाला. त्यामुळे दिवसेदिवस ग्रंथालयावर अवलबून रहाणाऱ्या विद्यार्थ्यांची सख्या दरवर्षी वाढत आहे.

अशा परिस्थितीत ज्या महाविद्यालयीन ग्रथालयात पूर्वीचा जुना सेवक वर्ग आहे. ज्याला ग्रंथालयशास्त्राचे तत्र अवगत नाही, ज्याच्या मनांत एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झालाय अशा सेवकवर्गाकडून आजच्या परिस्थितीत योग्य प्रकारची सेवा न मिळाल्यास त्या सेवकवर्गाला दोष देणे योग्य होणार नाही. आज हे सेवक काम करताना भाबावतात. थोडक्या वेळात कामे बिनचूक कशी करावीत हे त्याना सुचत नाही. त्यांच्याकडून तुम्ही म्हणता त्याप्रमाणे सहजतेने हसत मुखाने कामे होण्यासाठी त्यांना नवीन तत्राची माहिती द्यावयास हवी. नवीन बदलता दृष्टिकोन त्याना समजावून सागितला पाहिजे व ह्या नव्या जमान्यात आपण मागे पडलेलो नाहीत तर

उत्तम प्रकारे सेवा करू शकतो असा आत्मविश्वास त्यांच्या मानात निर्माण करायला हवा.

जी महाविद्यालये नवीन आहेत व जेथे नवीन शिक्षित सेवकवर्ग नेमला आहे अशा महाविद्यालयीन ग्रंथालयात मात्र तुम्ही म्हणता तशी सहजता आढळते.

: ग्रंथालयातील सेवकांना ग्रंथविषयक सामान्यज्ञान तरी अत्यंत चांगले असावे लागते. ग्रंथालयातील सेवकवर्ग आणि ग्रंथ विक्रेता यांच्या कामात तुम्ही फरक करताना ? मला वाटते पुण्यातील जी काही ग्रंथांची दुकाने आहेत, उदा. मॅनीज, पॉप्युलर, इम्पिरियल, इंटरनॅशनल वगैरे–त्यांचे व्यवस्थापकाजवळ ग्रंथविषयक जगाचे अतिशय उत्तम ज्ञान असते असा माझा अनुभव आहे. त्यापेक्षा कितीतरी अधिक ज्ञान ग्रंथालयातील सेवकाला असावे अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्रातील किती ग्रंथालये ही अपेक्षा पुरी करतात असे तुम्हाला वाटते ?

–आजचे महाविद्यालयीन ग्रंथालय हे एक Intellectual Workshop आहे. हे बौद्धिक कार्य चालवण्यासाठी तेथील सेवकवर्ग तितकाच सक्षम असावयास हवा. त्याचा शैक्षणिक दर्जा बराच वरचा पाहिजे. ग्रंथालयशास्त्रातील आधुनिक तंत्र त्याला चांगले अवगत हवे. बहुविध सामान्यज्ञान, अनेक प्रकारचे संदर्भ त्याने अभ्यासू वृत्तीने सतत गोळा करावयास हवेत. शिक्षकाप्रमाणेच ग्रंथालय सेवकानेदेखील विद्यार्थी म्हणून राहावयास हवे. आपण म्हणता त्याप्रमाणेच आज इतका सक्षम सेवकवर्ग महाविद्यालयातील ग्रंथालयातून दिसत नाही हे खरे.

: यात सुधारणा कशी होईल असे आपणास वाटते ?

–माझ्या मते हे कार्य दुहेरी आहे. प्रथम सध्या महाविद्यालयीन ग्रंथालयात काम करीत असलेल्या सेवकवर्गात नवचेतना निर्माण करून त्यांना आजच्या ग्रंथालयाकडून आवश्यक असलेल्या अपेक्षा स्पष्ट केल्या पाहिजेत व दुसरे म्हणजे नवीन सेवक नेमताना त्यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक पात्रतेबाबत निश्चित धोरण आखले पाहिजे.

विद्यापीठ अनुदान मंडळाने यादृष्टीने ज्या शिफारशी केल्या त्या फार चांगल्या आहेत. त्याप्रमाणे ग्रंथालयातील सेवकांची पात्रता निश्चि करून नेमणुका केल्यास महाविद्यालयीन ग्रंथालयांचा दर्जा निश्चित उंचावेल.

: महाविद्यालयातील विद्यार्थीवर्ग त्याच्या फावल्या तासात ग्रंथालयाकडे खेचला जावा असे तुम्हाला वाटते काय ? त्यासाठी कोणत्या गोष्टी कराव्या लागतील असे तुमचे मत आहे ?

–महाविद्यालयीन ग्रंथपाल व विभागप्रमुख ह्यांच्यामध्ये आपआपसातील साहचर्याने (Co-relation) ही गोष्ट साधली जाईल असे मला वाटते. निबंधस्पर्धा, चर्चा, वादविवाद विविध प्रकारचे प्रकल्प किंवा प्रदर्शन इ. साठी ग्रंथालयाचे सहकार्य घेतल्यास विद्यार्थी ग्रंथालयात येऊन त्याबाबतची कामे करतील. अशी कामे करताना त्यांना त्यात गोडीपण वाटेल. निबंधासाठी किंवा चर्चेसाठी लागणारी पुस्तके ग्रंथालय सेवक त्यांना काढून देतील. मासिकातून आलेल्या लेखांचे संदर्भ ते त्यांना दाखवतील. प्रकल्प किंवा प्रदर्शनासाठी आवश्यक असलेले साहित्य ते पुरवतील. जयंत्या, पुण्यतिथ्या किंवा अन्य प्रासंगिक उत्सव किंवा समारंभ साजरे करताना विद्यार्थ्यांना प्राध्यापकांनी ग्रंथालयाचे सहाय्य घ्यायला लावले पाहिजे. कोणते ग्रंथ किंवा लेख वाचावेत ह्याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना झाल्यास ते ग्रंथालयात येऊन ते मागितल्याशिवाय व पाहिल्याशिवाय रहाणार नाहीत.

ग्रंथपाल व विभागप्रमुख ह्यांच्यात साहचर्य साधण्यासाठी एकमेकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी व विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग करून घेता यावा यासाठी प्रत्येक महाविद्यात एक ग्रंथालय समिती असावी अशी शिफारस विद्यापीठ अनुदान मंडळाने केली आहे. प्रि. जे. डब्ल्यू. आयरन यांनी आपल्या College Administration या पुस्तिकेतही अशा प्रकारची समिती असावी म्हणून म्हटले आहे. ह्या समितीचे प्रिन्सिपल अध्यक्ष व ग्रंथपाल सचीव (Convener) असेल.

: विद्यार्थ्यांच्या मनात अभ्यासाची गोडी शिक्षकाने जशी निर्माण केली पाहिजे तशी वाचनाची गोडी ग्रंथालयाने निर्माण करावयास पाहिजे. विद्यार्थ्यांचे शिक्षण ४-६ वर्षांत संपते पण निर्माण केलेली वाचनाची गोडी त्याला आयुष्यभर पुरते व त्याचा विकास होण्यास ती उपयोगी पडते. ही गोडी कशी निर्माण करता येईल असे आपणास वाटते ?

—ह्या प्रश्नाचे उत्तर वरती आलेच आहे. मुख्य म्हणजे ग्रंथपाल हा शिक्षकी बाण्याचा हवा. त्याला शिकवण्याचा अनुभव असेल, विद्यार्थ्यांत तो वावरलेला असेल तर फारच चांगले. याशिवाय विविध सामान्य आवडीच्या (General Interest) विषयाची नवीन नवीन आलेल्या पुस्तकांची कव्हर्स बाहेर काचेच्या कपाटातून लावणे, बक्षिसे–कप–शील्ड मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे किंवा संघाचे अभिनंदन करणारा मजकूर फळ्यावर लिहिणे, नियमाबाहेर जाऊन खरी निकड असलेल्या विद्यार्थ्यांला अडचणीच्या वेळी मदत करणे, विद्यार्थ्यांत मिसळणे, त्यांना पुस्तकांबद्दल योग्य ते मार्गदर्शन करणे यासारख्या अनेक गोष्टींनी विद्यार्थ्यांच्या मनात ग्रंथालयाबद्दल प्रेम निर्माण करता येईल व त्यातूनच ग्रंथवाचनाची गोडी पण वाढेल.

काही वर्षांपूर्वीचा एक अनुभव सांगून मी हे निवेदन संपवतो.

शनिवारचा दिवस. सायंकाळी ग्रंथालय बंद करण्याची वेळ. एक विद्यार्थिनी पलीकडील कोपऱ्यात खाली मान घालून बसली होती. किती वेळ तशी बसली होती कुणास ठाऊक. सगळेजण समजत होते वार्षिक परीक्षेचा अभ्यास करते आहे. बंद करायची वेळ झाली म्हणून ग्रंथालयाचा अटेंडंट तिला 'बहनजी, टाइम हो गया' म्हणून सांगू लागला. तो त्याला ती रडत असलेली दिसली. त्याने ही गोष्ट मला येऊन सांगितली. मी तिच्याजवळ जाऊन खूप



विचारले; पण ती वर मानदेखील करीना. उलट अधिक जोराने हुदके देऊ लागली. टेबलावर अश्रु टपटप पडत होते. खूप समजावल्यावर शेवटी हळू तुटक स्वरात ती म्हणाली,

'सर, मेरा पर्स आज खो गया। उसमें १० रु. थे। Matriecs की किताब खरीदने के लिए लाए थे। परसों Exam. और मेरे पास किताब नहीं। यहाँ की किताब आप घर ले जाने नही देते। सर, अब मैं क्या करू?' तिला हुदके अनावर होत होते.

गेले ४।५ दिवस आई आजारी असल्याने अभ्यास होऊ शकला नाही. ऐन वेळी पुस्तक नाही. पैसे हरवले. बी. ए. चे शेवटचे वर्ष. अन् परीक्षा परवावर येऊन ठेपलेली. अशा वेळी ती घाबरून व गोंधळून जाईल तर नवल नाही.

थोडा वेळ मी विचार केला नि एकदम म्हणालो, 'देखिए, आप शांत हो जाइए। यहाँ की Reserved Copy आप Overnight ले जाइए। और आपका पर्स परसो हम ढूंढने का प्रयास करेंगे। मिल गया तो ठीक ही है। आज आप उसका विचार छोड दीजिये। और Exam. पर अपना सारा ध्यान जुटा लीजिये।' ती मुलगी थोडी शांत झाली.

'आप रहती कहाँ हैं?'

'पटेल नगर'–म्हणजे कॉलेजपासून १२ मैल दूर. बसलाही तिच्याजवळ पैसे नव्हते. एक रुपया देऊन पटेल नगरच्या पुढे शक्ती नगरला रहाणाऱ्या आमच्या एका असिस्टंटबरोबर तिला पाठवले.

त्या वर्षी ती मुलगी बी. ए. प्रथम वर्गात पास झाली. दिल्लीच्या एका कॉलेजात आज ती लेक्चरर् आहे.

नतर एकदा ती भेटली असता म्हणाली, 'सर, उस दिन आप किताब न देते तो पता नही मेरे तकदीर का क्या होता।'

म्हणूनच त्या दिवशी नियम मोडून पुस्तक दिल्याबद्दल मला खद होत नाही.

☐ ☐

---

## रशिया-चीन संबंध : पृष्ठ ७ वरून

पाठविलेल्या शुभेच्छा संदेशातून केलेली अनाक्रमण कराराची सूचना हा या धोरणाचा भाग असण्याची शक्यता आहे.

चीनला ज्या कारणांसाठी आज तडजोड हवी आहे त्याच कारणासाठी रशियाला आज ती नको आहे. रशियाला तडजोडीची घाई व निकड नाही. उलट माओ व चौ यांच्या मृत्यूनतर चीनच्या नव्या अननुभवी नेत्यांवर दडपण आणण्यास आणि चीनला आपल्या प्रभावाखाली आणण्यास अनुकूल संधी मिळेल. मग आजच तडजोडीने कशाला बांधून घ्यावयाचे असे रशियन नेत्यांना वाटते.

तेव्हा चीनने अनाक्रमण कराराची सूचना केली असली तरी त्यातून नजीकच्या काळात काही निष्पन्न होण्याची शक्यता दिसत नाही. दोन बडया कम्युनिस्ट राष्ट्रांच्या संघर्षातून कम्युनिस्ट चळवळीची मात्र हानी झालेली आहे. वैचारिक गोंधळ, फाटाफूट, एकमेकांबद्दल अविश्वास व त्यातून विरोधी कारवाया हे दृश्य अनेक देशातील कम्युनिस्ट चळवळीत आज दिसत आहे. रशिया व चीनच्या नेत्यानी मनात आणले तर त्याना आपला संघर्ष मिटविणे अशक्य आहे असे नाही. पण त्यासाठी आवश्यक असलेला व्यापक दृष्टिकोन आज या दोन्ही राष्ट्रांच्या नेत्यांजवळ नाही. व्यापक दृष्टिकोनाचा अभाव हे कम्युनिस्ट चळवळीचे फार जुने दुखणे आहे.

☐

---


# श्रीग्रामायन

मूल्य
पंधरा रुपये

लेखक
श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन
पुणे ३०


---

१ : धैर्यमेरू चिंतापुडी रामरेड्डी, २ : परमवीर हळंबरे नागण्णा, ३ : लिंगदल्ली विमोचक भाऊराव पाटील ४ : हुतात्मा पत्रकार शोईब उल्लाखाँ या हैदराबाद मुक्तिसंग्रामातील चार अज्ञात कथा यापूर्वी माणूस मधून प्रसिद्ध झाल्या. ही पाचवी कथा–

# रक्तरंजित भैरवुनिपल्ली

अशोक परळीकर, परभणी

श्राद्धाचे जेवण करून सात ब्राह्मण आपापसात यजमानाच्या औदार्याची आणि श्राद्धानिमित्त केलेल्या पक्वान्नाची प्रशसा करीत समाधानाने हसत बोलत आपल्या खेड्याकडे परतत होते. सध्याकाळचे ५॥–६ झाले असावेत. दिवेलागणीपूर्वी घरी पोचावे म्हणून ते झपझप चालत होते. बिचाऱ्यांना कल्पनाही नव्हती की आपण किती वेगाने मृत्यूकडे जातो आहोत. श्राद्धाचे जेवण भरपेट झाल्यावर यजमानाना पोटभर आशीर्वाद देणाऱ्या त्या ब्राह्मणाना ही कल्पनाही नव्हती की पुढे त्याचीही श्राद्धतिथी तीच रहाणार आहे–मृत्यू त्यासाठी दबा धरून वाटेत बसला आहे.

रस्त्यावरून जाणाऱ्या शांतीपथकाच्या (!) नजरेस घाईघाईने घराकडे परतणारी ही मडळी पडली. त्यांनी या ब्राह्मणाना हटकले. ब्राह्मणांशी त्यांची प्रश्नोत्तरे होताहेत तोच त्यतील दोन ब्राह्मण कसेबसे निसटले. बाकीच्या पाच जणांना त्यानी घेरले. आपण ब्राह्मण आहोत, श्राद्धकर्म पार पाडून आपण घराकडे परतत आहोत, असे त्यानी सागितले. त्यांनी ब्राह्मण आहोत हे सांगताच 'बम्मन ?' तो ये भारत सरकारके एजट जरूर है। मा-बाप सरकारके, शाहे उस्मानके ये दुश्मन है। इन्हे सजा मिलनीही चाहिये। असा सूर शांतीपथकाच्या रझाकारी सदस्यांनी काढला. ब्राह्मणांना ब्रह्मांड आठवले. शिक्षा होणार या कल्पनेनेच ते अर्धमेले झाले. काही रझाकारानी शिक्षेचे स्वरूप वेगळे आणि मजेदार असावे असे सुचविले. ५–६ जणांनी जेव्हा शिक्षेचे स्वरूप ठरवून नायकाला सांगितले तेव्हा त्याला अत्यानद झाला. ब्राह्मण बिचारे गयावया करीत होते. त्यांना सोडल्यास, परमेश्वर त्याचे भले करील असा आशीर्वाद देत होते, रडत होते आणि रडता रडता त्या राक्षसांना दया यावी म्हणून, परमेश्वराची करुणाही भाकीत होते.

शिक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची जुळवाजुळव करण्यात आली. जाड दोरखड आणण्यात आले. त्या पाच ब्राह्मणाना त्या दोरखंडाच्या सहाय्याने एका चिंचेच्या झाडाच्या जाडशा फादीला लटकावण्यात आले. असहाय्य ब्राह्मण रडत होते, ओरडत होते आणि त्याच्या रडण्या-ओरडण्याला ते शांतीदूत (!) हासत होते.

जमिनीवर काटक्या, लाकडे रचण्यात येऊन पेटविण्यात आली. लटकणाऱ्या ब्राह्मणांना आगीचे चटके बसू लागले. त्याच्या ओरडण्याच्या आवाजाने, आक्रोशाने भांबावलेला सूर्यदेव, ते भयंकर दृश्य पहाणे नको म्हणून, अदृश्य झाला. अंधाराचे साम्राज्य पसरले. रझाकार मडळी टाळ्या पिटीत, गात, पहात बसली. धोतरांनी पेट घेतला तेव्हा रझाकरांच्या आनदाला पारावार उरला नाही. बीभत्स बोलून ते करमणूक करून घेत होते. आणि ब्राह्मण ? त्यांच्या मन.स्थितीचे यथायोग्य वर्णन करण्यास माझे शब्द सामर्थ्य अपुरे आहे. त्या ब्राह्मणांना अशा रीतीने अत्यत निर्दयपणे, भाजून मारण्यात आले. दुसऱ्याना धाक बसावा म्हणून ती अर्धवट जळालेली नग्न प्रेते तशीच ठेवण्यात आली. अंगावरील धोतरे पूर्ण जळून गेल्यामुळे कनवटीला लावलेली चांदीची नाणी (दक्षिणा) खाली जमिनीवर पडलेली होती. त्या पांढऱ्या नाण्यांचा रगही काळवडला होता. जणू अमानुष प्रकार पाहून चेहरे काळे पडले होते. तेथील दृश्य अत्यत बीभत्स व अमानुष होते.

वरील जागा ' इसनूर '-पोलीस चौकीच्या हद्दीत, चौकीपासून केवळ चार कि. मी. अतरावर कोडकंडला आणि रगापूरजवळ आहे.

वरील अमानुष प्रकार म्हणजे इ. स. १८५७ मधील इग्रज अधिकारी नील द्वारा केल्या गेलेल्या अत्याचाराची पुनरावृत्तीच होती. खरे म्हणजे या राक्षसी रझाकारानी आपल्या अमानवी अत्याचारांनी, आपण नीलपेक्षा, राक्षसीवृत्तीत काकणभर सरस आहोत हेच दाखविले होते. ' नील 'ने हाती सापडतील त्या भारतीयाना रस्त्यालगतच्या झाडावर फाशी दिले होते किंवा तोफेच्या तोंडी दिले होते. परतु अशा रीतीने भाजून मारण्याची कल्पना केवळ रझाकारांच्या राक्षसी मस्तकातूनच निघू शकत होती. त्या दिवसात हैदराबाद राज्यात या राक्षसांचीच सत्ता होती. या राक्षसाच्या राक्षसी कारवाया पाहून प्रत्यक्ष राक्षसही लाजला असावा.

रझाकार आणि सरकारी कर्मचारी रात्रीच्या वेळी नजीकच्या खेड्यावर हल्ला करीत. हिंदू स्त्रियांवर अत्याचार, बलात्कार करून, त्याच्या नाकाकानातील अलकार नाककान कापून ओढून घेत. अनेकदा रात्रीच्या वेळी श्री. एम्. एन्. रेड्डी यांच्या टेबलावर रक्ताने लडबडलेले लहान-मोठे अलकार आणि अन्य लूट ते आणून टाकीत आणि सकाळी आपापसात ती लूट वाटून घेत. परतु हिंदु अधिकाऱ्यांची काय प्राज्ञा की याविरुद्ध ते बोलतील किंवा हाताखालील मुसलमान कर्मचाऱ्याची चौकशी करतील.

चौकशीला प्रारंभ करणे म्हणजे 'बागी' (बंडखोर) ठरणे आणि स्वत.हून अमानुष मृत्युला सामोरे जाणे हे त्यांना पुरेपूर ठाऊक होते. जे हिंदू या लुटारूना विरोध करीत त्यांना विद्रोही ठरवून दुसऱ्या दिवशी कठोर शिक्षा देण्यात येत असे. थोडक्यात हिंदूंचा प्रतिकार पूर्ण निष्ठुरतेने नष्ट करून मुसलमानाची राजवट शाती (!) स्थापन इच्छित होती.

भारत स्वतत्र होऊन जवळजवळ एक वर्ष होत आले होते. हैदराबादचा निझाम 'इडियन युनियन'मध्ये न रहाता स्वतत्र राहू इच्छित होता. राज्यातील बहुसख्य प्रजा हिंदू होती. हिंदूची इच्छा हैदराबादने भारतीय सघराज्यात विलीन व्हावे अशी होती. तेव्हा एकीकडे हिंदूंच्या या मागणीचा आवाज बद पाडणे आणि दुसरीकडे भारत सरकारशी प्रसगी युद्ध करणे अशा दुहेरी व्यवस्थेला निझाम लागला. सैन्य भरती चालू केली. विदेशातून शस्त्रास्त्राची मदत मिळविण्यात आली. राज्यातही शस्त्रांची निर्मिती सुरू करण्यात आली. या तयारी-शिवाय रझाकाराची एक स्वतत्र सेनाही सिद्ध केली गेली. या अत्याचारी रझाकारांचा राज्यात मुक्त सचार होता. त्यांच्या अमानुष अत्याचाराचा नगानाच राज्यभर चालू होता. त्यांच्या पाशवी अत्याचारापाठी निझामाची प्रेरणा आणि महत्त्वाकांक्षा डोळे झाकून उभी होती.

सांप्रदायिक सामजस्य प्रस्थापित करणे आणि गावात शाती, सौख्य नांदावे या उदात्त हेतूने (!) गावोगाव 'अमन कमिटी' (शांती सभा) स्थापण्यात आली. या कमिटीत हिंदूना प्रतिनिधित्त्व देण्यात आले–केवळ 'नाममात्र.' 'जनगाव'च्या शांती सभेच्या सदस्यात सर्वश्री एम. एन. रेड्डी (इडस्ट्रियल विभागाचे सुपरवायझर) होते. हिंदूना दहशत बसावी म्हणून जे सरकारी अभियान होई त्यात त्यानाही उपस्थित रहावे लागे. यांच्या साक्षीने खेडोपाडी सरकारी अत्याचाराचा धुडगूस चाले. हिंदूवर जे विविध अत्याचार होत ते उघडया डोळयांनी व मिटल्या ओठानी पहाणे त्याना क्रमप्राप्तच होते. बोलण्याची सोय नव्हती. श्री. शट् गोपालाचार्य याना हिंदूवर होणारे अत्याचार पहाणे अशक्य झाले. त्यानी एकदा शांतिसभेमध्ये हिंदूवर होणाऱ्या अन्यायाना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल त्याना कोणता पुरस्कार मिळाला? जनगाव–सिद्धीपेठ मार्गावर त्यांना नेण्यात आले आणि गोळी घालून त्याचा आवाज 'कायम बद' करण्यात आला. दुसरे सदस्य एम. एन. रेड्डी यांना हिंदूच्या बाजूने बोलल्यास काय घडू शकते याचे प्रात्यक्षिक पहावयास मिळाले. त्याना कडक शब्दात परिणामाची कल्पना देण्यात आली. धमकीच देण्यात आली म्हणा ना. तिरुपती येथे सरकारी अधिकाऱ्याना 'सिव्हिल डिफेन्स'च्या नावावर शस्त्रे चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात येई. प्रशिक्षणासाठी हिंदू–मुसलमान असा भेद केला जात नसे. उलट हिंदूना शासन करण्यासाठी जी मोहीम असे त्यात हिंदू प्रशिक्षणार्थींचा उपयोग ते पुरेपूर करीत. थोडक्यात काटयानेच काटा काढण्याचे तत्र ते अवलंबीत.

शांती स्थापन करण्यासाठी तत्कालीन शातिपूजक (!) किती प्रयत्नशील असत, याचे प्रारभी दिलेले उदाहरण अतिशय बोलके आहे. या नमुन्यावरून केवढे भयकर आणि उग्र रूप या अत्याचारानी धारण केले होते हे समजू शकेल.

आज वरगल जिल्ह्यात असलेले 'भैरवुनिपल्ली' गाव तेव्हा नळगोडा जिल्ह्यात होते. तसे म्हटल्यास वरंगल, नलगोडा, भेदक आणि करीमनगर या चारही जिल्ह्यांच्या सीमेवर हे गाव वसलेले आहे. हे गाव जनगाव–सिद्धीपेठ मार्गावर चीरियल आणि मुस्त्यालपासून १२–१४ कि. मी. अतरावर आहे. आजही या गावी जाण्यासाठी पक्का मार्ग नाही. भैरवुनिपल्लीच्या आसपासच्या खेडयातील परिस्थिती दिवसेंदिवस चिघळत होती. रझाकारांच्या अन्याय–अत्याचाराना उधाण आले होते. रझाकार 'मजाकार' बनले होते. लूटमार त्याचा धंदा बनला होता. गावोगाव जाऊन ते चदा (वर्गणी) वसूल करीत असत. वर्गणी कसली? नवा जिझिया करच म्हणा ना. त्याचे मागणे जे गाव पुरे करू शकत नसे ते गाव जाळून टाकण्यात येत असे. काही गावांनी इच्छेनुरूप धन देऊन 'सुटका' मिळविली होती. परतु भविष्यात त्याना त्रास होणार नाही याची खात्री कोण देणार? नवे रझाकार येत, नवी मागणी होई–पुरी झाल्यास ठीक. नाही तर–?

भैरवुनिपल्लीच्या पश्चिमेस लिंगापूर नामक एक गाव आहे. तेथे 'चदा' मिळाला नाही म्हणून रझाकारांनी दिवसाढवळया त्या गावाला आग लावून दिली. लिंगापूरला आग लावण्यात आली हे कळताच भैरवुनिपल्लीचे सर्वश्री इम्मडी राजरेड्डी, बगाल अनत रामरेड्डी आणि मुगटम् रामय्या कोळी आदी आठ–दहा हिंदू तरुण लिंगपूरकडे गेले. अनत रामरेड्डीचे नातेवाईक लिंगपूरला रहात असत. गावासमीप आल्यानतर त्यांना दिसले की रझाकार अजून गावातच आहेत. गावातील घरे धडाधड पेटत होती–पेटली होती. हे तरुण गावाबाहेर थाबले. इच्छा असून मदत करता येत नाही याचे त्या तरुणाना फार वाईट वाटले. भैरवुनिपल्लीहून निघताना त्यांनी धुलमिट्टा येथील दुब्बुल रामचद्र रेड्डीला, साथीदारांसह, मदतीसाठी निरोप दिला होता. थोडयाच वेळात धुलमिट्टाहून कुऱ्हाडी, लाठया घेतलेले ३०–४० लोक आले. इकडे चार गाडयातून लूट घालून 'शाहे उस्मान झिंदाबाद', 'आजाद हैदराबाद पाईंदाबाद' अशी गर्जना देत रझाकार गावाबाहेर आले. ते बाहेर आले आणि हे तरुण त्याच्यामागे लागले. लाठयाकुऱ्हाडीसह असलेल्या त्या लोकांना पाहून रझाकारांनी गोळीबार केला. परतु तरीही ते लोक समोर येतच आहेत एवढेच नव्हे तर ग्रामवासीय हळुहळू वेढा देत आहेत हे पाहून ते रझाकार गडबडले, भ्याले. पळावयास लागले. कित्येकाचे पायजामे ओले आणि पिवळे झाले. चारही गाडया परत मिळाल्या–सव्याज. पळणाऱ्या रझाकारांनी बदुका–जोरात पळता यावे म्हणून–फेकल्या होत्या त्या याना आयत्याच मिळाल्या.

या घटनेनतर 'मद्दूर'च्या मग्रूर रझाकारांनी ग्रामवासीयाकडे लुटीसह गाडयांची मागणी केली. भैरवुनिपल्लीकडून त्यांना 'हिंमत असेल तर लुटून न्या' असे कडक उत्तर मिळाले. रझाकारानी सबंधित पोलीस इन्स्पेक्टरकडे तक्रार नोदविली. त्याने इम्मडी राजरेड्डीला निरोप देऊन बोलाबून घेतले. रझाकारांनी इन्स्पेक्टरचे कानही फुकले होते की भैरवुनिपल्लीच्या लोकांनी किल्ल्याच्या

बुरुजावर शस्त्रास्त्र आणि दारुगोळा जमा करून ठेवलेला आहे. इतकेच नव्हे तर ते कम्युनिस्टानाही आश्रय देतात. राजरेड्डीने वस्तुस्थिती कथन केली. 'मी स्वतः येऊन तक्रारीबद्दल खात्री करून घेईन.' इन्स्पेक्टरने म्हटले. 'जरूर या परंतु येण्यापूर्वी कल्पना देऊन या. अन्यथा आपणावर रझाकार वा कम्युनिस्ट समजून हल्ला केला जाण्याची शक्यता आहे. तेव्हा—' राजरेड्डी पोलीस पाटील होता. त्यामुळे इन्स्पेक्टरचा त्याच्यावर विश्वास होता.

'लिंगापूर'च्या घटनेने इम्मड्डी राजरेड्डी आणि त्याच्या साथीदारांनी हे लक्षात घेतले की स्वरक्षणाबरोबर ग्रामरक्षणाची जबाबदारीही त्याचीच आहे. त्यांच्या गावाला बाराशे रुपये 'चंदा' (वर्गणी) मागण्यात आला. भैरवुनिपल्लीवाल्यांनी शेजारच्या आणि जवळपासच्या ग्रामस्थांशी चर्चा करून सर्वांच्या सुरक्षिततेची योजना आखली आणि या योजनेनुसार भैरवुनिपल्लीच्या किल्ल्याच्या बुरुजावर 'जागत्या' बसविण्यात आला. हा बुरुज बराच उंच आहे. आणि सुरक्षितही आहे. काही भरमार बंदूकधारी सदैव या बुरुजावर पहारा देत आणि एखाद्या संकटाची कल्पना आली की बुरुजावर ठेवलेला नगारा बडविण्यात येई. आणि मग ग्रामवासीय कामधंदा सोडून, नियोजित जागी टक्कर देण्यासाठी बसून रहात. रेवरती आणि वल्लमपटलाच्या रझाकाराच्या हालचालीची खडानखडा माहिती मिळण्याची व्यवस्था करण्यात आली. आसपासच्या खेड्यातील लोकाना सूचना देण्यात आली, की प्रतिदिवशी एका गावातील शंभर एक लोक लाठ्या कुऱ्हाडीसह का होईना, अन्य गावांना भेटी देतील आणि त्यांचे मनोबल कायम ठेवतील. दूरवर हेराचे जाळे पसरण्यात आले आणि रझाकारांचा हल्ला होण्यापूर्वी सूचना मिळण्याची व्यवस्था करण्यात आली. भैरवुनिपल्लीच्या बुरुजावर दारुगोळा सदैव सिद्ध होता. 'कुटीगल' गावीही अशाच प्रकारची योजना करण्यात आली. आसपासच्या आठ खेड्यात आपल्या सायकलवरून फिरून, मेष-मिथून भविष्य कथन करीत, विश्वनाथ भट वायरलेसचे काम करीत होता. म्हणूनच 'मद्दूर'च्या रझाकारांनी, शक्तीच्या बळावर गाड्या परत मिळणे अशक्य दिसले तेव्हा, इन्स्पेक्टरकडे तक्रार नोंदवली आणि गाड्या व शस्त्रे परत मिळवून देण्यास विनवले.

एके दिवशी भल्या पहाटे वार्ता आली की रेवरतीचे रझाकार पूर्ण तयारीनिशी भैरवुनिपल्ली लुटण्यासाठी बाहेर पडताहेत. रेवरती गाव जनगाव मार्गावर आहे, भैरवुनिपल्लीच्या हिंदू जनतेची 'खबर' घेण्याच्या ईच्छेने रेवरतीचे रझाकारदल मोठ्या हिंमतीने बाहेर पडले. त्यांच्याजवळ भरमार बंदुका होत्या. गावाच्या जवळ हे पथक येते न येते तोच नगाऱ्यावरून 'इशारा' देण्यात आला. सर्वांनी आपापली शस्त्रे उचलून नियोजित जागा घेतल्या. रझाकार मंडळी टप्प्यात आली तेव्हा त्यांच्यावर गोळ्यांचा अचूक मारा करण्यात आला. रझाकाराना पुढे सरकणे अशक्य झाले. एक-दोन रझाकार गोळ्याना बळी पडले. भैरवुनिपल्लीची खबर घेणे तर दूरच राहिले पण आपलीच 'कबर' बांधण्याची वेळ येते आहे हे पहाताच त्या भ्याड रझाकारांनी काढता पाय घेतला. पळणाऱ्या रझाकारांचा गावकऱ्यांनी पाठलाग केला. एकमेकावर गोळ्या झाडण्यात आल्या. एक गावकरी पडला. परंतु त्याच्या मारेकऱ्यावर, जखमी, दंडाळ किष्टय्या तुटून पडला आणि त्याने त्याची बंदूक हिसकावून घेतली. दंडाल किष्टय्याच्या हातात बंदूक येताच रझाकाराने धोरण बदलले आणि तो दयेची भीक मागू लागला. परंतु त्याला 'उडविण्यात' आले. बाकीचे रझाकार मरणाच्या भीतीने इतक्या जोरात धावत होते की पायजाम्याची अडचण होऊ नये म्हणून 'नाडा' सोडून ते पळत होते. बऱ्याच दूरपर्यंत रझाकारांना पिटाळून लावल्यानंतर गावकरी समाधानाने परतले.

पो. इ. कडे पुन्हा तक्रार केली गेली की कॉंग्रेसवाले बुरुजावर तयारीनिशी आहेत. आणि सरकार-विरोधी कारवाई करताहेत. पो. इ. ने स्वतः भैरवुनिपल्लीला, कल्पना देऊन, भेट दिली. बुरुजावर लढाईचे साहित्य त्याला दिसले, 'यह मामलां क्या है? यह सारी तयारी क्यो?' या प्रश्नांना 'आत्मरक्षा के लिये' असे राजरेड्डीने उत्तर दिले. 'तुम्हारी रक्षा हम कर देंगे! कम्युनिस्टोका बंदोबस्त हम कर देंगे! रेवरतीके रझाकारोसे तुम्हारी दोस्ती कर दूगा. ताकि उनसे कोई झगडा बाकी न रहे!' असे म्हणून त्या इन्स्पेक्टरने विधीवत पंचनामा केला आणि शस्त्रे जप्त केली. शिवाय राजरेड्डीला घेऊन तो रेवरतीला गेला आणि रझाकाराशी त्याची भेट करवून दिली. त्याने रझाकाराना, तोंडदेखले का होईना, पण खूप दाटले आणि सलोख्याने रहाण्याचा सल्ला दिला.

एके दिवशी हैदराबादचे प्रधानमंत्री लायकअली 'चिरियाल' गावी आले होते. भैरवुनिपल्ली आणि आसपासच्या खेड्यातील हजार-दीड हजार ग्रामवासी राजरेड्डीच्या नेतृत्वाखाली त्याला भेटले. त्याने रझाकारांशी मिळून मिसळून रहाण्याचा उपदेश केला आणि एक सिव्हील सेंटर स्थापन करण्याचे वचन दिले. सरकारला शांती स्थापनेत मदत करण्याचे गावकऱ्यांनी आश्वासन दिले खरे, परंतु त्याबरोबरच संरक्षण व्यवस्थेत त्यानी ढिलाई होऊ दिली नाही. शस्त्रांची जुळवाजुळव जमवाजमव करण्यात आली. एवढेच नव्हे तर वल्लमपटलाच्या रामचंद्रराव देशमुखाकडची 'जजाल' (छोटी तोफ) आणण्यात आली. सदैव चार-पाच मण बारुद (दारू) सिद्ध ठेवली. गोळे आणि छर्रे बनविण्यासाठी एक पाथरवट आणि एक सोनार यांची नेमणूक केली.

भैरवुनिपल्ली आणि आसपासच्या बेक्कल, धुलमिट्टा, तोरनाळ, जालपल्ली, कोंडापूर, कुटीगल, सोलीपूर आणि अकसापूरच्या जनतेने आत्मरक्षणासाठी जी व्यवस्था केली होती ती रझाकाराच्या डोळ्यात सलत होती. अर्थात् भैरवुनिपल्ली या साऱ्या व्यवस्थेचे केंद्र होते. म्हणून रझाकारांचे सर्वाधिक लक्ष याच गावावर होते. हिंदूचा स्वाभिमान त्याना खटकत होता. भोनगीरचे डेप्यूटी कलेक्टर एकबाल हाशिम यानाही ती डोकेदुखी होती. ग्रामवासियाच्या उद्दतेच्या वार्ता त्याच्या कानी रोज येत. एके दिवशी तो संतापून म्हणाला, 'भैरवुनिपल्ली के लोगोकी यह हिम्मत? शाहे उस्मान के खिलाफ वेह बगावत करना चाहते हैं? कैसा मजाक हो रहा है! हमे यह बगावत जडसे उखाडनी होगी! हमे बगावत का सिर कुचल देना होगा'

एके दिवशी एकबाल हाशिम शांती

प्रस्थापित करण्यासाठी (!) शस्त्रसज्ज 'शांतिसेने'सह निघाला. त्याच दिवशी सकाळी शांतिरक्षणाच्या नावावर ४० निरपराध लोकांना (हिंदूना) मारण्यात आले. मुहूर्ताला चाळीस जणांचा बळी देऊन १५० पोलीस व रझाकारासह एकबाल हाशिम भैरवुनिपल्लीला येऊन धडकला. बुरुजावरील नगाऱ्यावर टिपरी पडली. आणि एकबाल साहेबावर गोळ्यांचा पाऊस पडला. छोट्या तोफेने आक्रमकांना चक्रावून सोडले. सकाळच्या दहापासून सध्याकाळपर्यंत दोन्ही पक्षाकडून सतत गोळीबार चालू होता. डेप्युटी महाशय गावात प्रवेश करू शकले नाहीत. 'वड्याचे तेल वांग्यावर' या न्यायाने त्यांनी चार निरपराध आणि निशस्त्र लोकांचा बळी घेतला. अर्थात त्या मोबदल्यात १५ प्रेते गाड्यात घालून एकबालला परतावे लागले. आठ तासाच्या गोळीबाराने ईप्सित साध्य झाले नाही म्हणून एकबाल भयंकर संतापला. 'इन गद्दारोंको इस शरारत की जल्दही मजा चखवा दूंगा!' अशी प्रतिज्ञा करून डिवचलेला एकबाल पधरा प्रेतास आणि उरलेल्या बहाद्दरासह (!) परतला.

इकडे या लढ्याने भैरवुनिपल्लीच्या लोकाचा आत्मविश्वास वाढला. त्याच्यात विश्वास निर्माण झाला की आपण तगड्या आक्रमणालाही यशस्वी तोंड देऊ शकतो. आत्मविश्वासाचे रूपांतर फाजिल विश्वासात झाले. एकबाल हाशमला पराभूत व्हावे लागले याचे शल्य सर्व मुसलमान अधिकाऱ्यांनाही होते. त्यानी भैरवुनिपल्लीला कायम धडा शिकविण्याची तयारी चालविली. त्यांच्या तयारीच्या वार्ता भैरवुनिपल्लीला मिळाल्या. तसेच निरोपही. 'मुकाबला करणे कठीण आहे तेव्हा ग्रामवासियांनी गाव सोडून थोडे दिवस जगलाचा आश्रय घ्यावा.' असा हेरांनी दिलेला मित्रत्वाचा सल्ला धुडकावून लावण्यात आला. गावकऱ्यांनी आपल्या परीने लढण्याची तयारी ठेवली.

हैदराबाद-वरंगल मार्गावर जनगाव तालुक्याचे ठिकाण आहे. एकीकडे वस्तीपासून दूर असलेल्या एका छोट्या मैदानास आज सैनिक छावणीचे रूप प्राप्त झाले होते. निझामी सेनेचा एक मेजर, दोन कप्तान आपल्या सैनिकासह तेथे उतरले होते. दुसरीकडे सशस्त्र पोलीसाचे दल 'डेरा' घालून होते. वरंगल आणि नलगोंड्याचे डी. एस्. पी. आणि वरंगलचे डी. वाय. जी. स्वत: जातीने उपस्थित होते. रझाकारांचा ताफा आपल्या 'सालारा'सह सिद्ध होता. मेदक आणि वरंगल येथील सुभेदाराच्या (कमिश्नर्स) उपस्थितीचे गांभीर्य जाणवत होते. भोंगीरचे डेप्युटी कलेक्टर धावपळ करीत त्या सर्वांची चोख व्यवस्था ठेवीत होते. गेल्या वेळेला भैरवुनिपल्लीकडून जबरदस्त चपराक बसल्यापासून त्याची झोप उडाली होती. भैरवुनिपल्लीच्या नागरिकांना बडखोरीबद्दल तो मजा चाखवू इच्छित होता— आणि म्हणूनच त्याने इतक्या लोकांना आपापल्या शक्तीसह आमंत्रित केले होते.

जनगावच्या हिंदू प्रजेने बाहेरील व्यवस्था पाहिली. त्यांच्या मनात अनेक अशुभ विचार वळवळले. रझाकारांच्या भयानक अत्याचाराच्या नित्य नव्या कथा त्यांच्या कानावर येत. परमेश्वराची ते मनातल्या मनात, अत्यंत मनोभावे, प्रार्थना करीत होते. ते अस्वस्थ होते, चिंतीत होते. कोणत्या क्षणी कोणता प्रसंग उद्‌भवेल याची त्यांना कल्पना नव्हती. भयग्रस्त मनस्थितीत ते छावणीकडे डोळे लावून बसले होते.

दुपारच्या ४–४॥ च्या सुमारास छावणीत हालचाल सुरू झाली. ट्रक्समध्ये सामान भरण्यास प्रारंभ झाला. मोहिमेवर निघण्याची सिद्धता होती. सहस्ररश्मीने प्रकाशकिरण आवरते घेतले होते आणि अंधाराने आपले हातपाय पसरविण्यास सुरवात केली होती. आपापल्या सामानासह सैनिक, पोलीस आणि रझाकार ट्रक्समध्ये चढले. जीप गाड्यातून अधिकारी वर्ग बसला आणि पूर्ण काफिला जनगावाहून सिद्धपेठकडे जाणाऱ्या मार्गावरून निघाला. सोबत आर्टिलरी आणि सिव्हील अधिकारी होते. मिल्ट्री, पोलीस आणि रझाकार मिळून जवळ जवळ पाच-सहाशे सशस्त्र लोक होते. शिवाय शंभरएक सिव्हिल अधिकारी आणि कर्मचारीही या अभियानात सामील झाले होते. अर्थातच पूर्वकथित श्री. एम्. एन. रेड्डीही या काफिल्याबरोबर होतेच.

सध्याकाळ झाली. अस्ताचलाकडे कललेल्या सूर्याची सोनेरी किरणे भैरवुनिपल्लीवर हळुवार पडलेली होती. गावाभोवती असणारी वृक्षराजी आणि लसलशीत कणसांनी भरलेल्या हिरव्यागार शेताची शोभा त्यामुळे केवळ अवर्णनीय होती. गावातील किल्ल्याचा बुरुज आज अनेक दशके नव्हे शतके शत्रूशी झुंज देऊनही ताठ मानेने उभा होता. कित्येक वर्षांनतर आज पुन्हा एकदा ग्रामरक्षणासाठी तो सिद्ध होता. सुरक्षिततेसाठी ग्रामवासी त्या बुरुजावरून दूरवर नजर ठेवून होते. आणि अधून मधून गोळीबार करून लुटारू रझाकारांना पिटाळून लावीत होते. ग्रामवासी नेहमीप्रमाणे आपापल्या कामात दंग होते. पशुधन गावाकडे सुखेनैव परतत होते. सुस्तावलेले गुराखी म्हशीच्या पाठीवर बसून होते तर काहीजण चक्क म्हशीच्या पाठीवर झोपलेले होते. वस्तीजवळ आलेल्या गायी आपल्या वासराना भेटण्याच्या उत्सुकतेने आनंदाने हबरत होत्या. मस्तावलेले पाडे एक दुसऱ्याची खोडी काढून, शिंगांनी मारीत होते. विहिरीवर पाणवठ्याला आलेल्या ललना आपापसात थट्टामस्करी करीत होत्या तर काही प्रौढ स्त्रिया घरगुती गोष्टींची चर्चा करीत होत्या. जणू त्या सुखद सध्याकाळच्या पर्वणीचा आनद त्या लुटू पहात होत्या. परंतु अदृष्टांत काय आहे याची त्या कोणाकोणालाच कल्पना नव्हती.

भैरवुनिपल्लीतील जनतेत एकी होती. त्यांनी सरक्षणाची आणि प्रतिकाराची त्यांच्या दृष्टीने योजनाबद्ध आणि चोख व्यवस्था केली होती. त्यांच्या व्यवस्थेमुळेच रझाकाराना गावात प्रवेश मिळू शकला नव्हता. रझाकाराच्या तीन-चार प्रयत्नाना आपल्या पराक्रमाने त्यांनी निष्फळ करून टाकले होते. आसपासच्या खेड्यातून रोज नव्या बातम्या येत. आज नवा पेठ लुटले, उद्या नेलटोलाचा क्रम. कधी येसोतापूर जाळले तर कधी कोमल्ला बेचिराख केले. एकाद्या दिवशी चिंताकुट्यातील बलात्कार तर दुसऱ्याच दिवशी निलीगोंड्याच्या महिलांचे अलकारासाठी नाक, कान कापल्याच्या-वार्ता–प्रतिदिन अन्याय, अत्याचार, बलात्कार, लूटमार, कत्तल, जाळपोळीच्या राक्षसी खेळांच्या वार्ता भैरवुनिपल्लीला येत. आजपर्यंत भैरवुनिपल्ली अस्पर्श होते. स्थानीय लोकांचा एकोपा, त्याची प्रतिकारक्षमता आणि जागरुकता यामुळेच भैरवुनिपल्ली रझाकाराचे भक्ष्य होऊ शकले नव्हते.

आणि म्हणूनच भैरवुनिपल्लीचे हिंदू स्त्री-पुरुष नेहमीप्रमाणे आजही आपल्या गावाला सुरक्षित समजून निद्रासुख अनुभवित होते.

इकडे पूर्ण तयारीनिशी निघालेलेला तो काफिला मुस्त्यालमार्गे लक्ष्याकडे सरकत होता. त्यांना मुस्त्याल, मद्दूर, रेवरती आणि आणि वल्लपटला यामार्गे भैरवुनिपल्लीला जावयाचे होते. वल्लंपटला येथे तो 'जत्था' थांबला. भैरवुनिपल्लीला वेढण्याचा आदेश देण्यात आला. घातलेला वेढा आवळण्यास सेनेने हळूहळू प्रारंभ केला. सकाळचे ४-४॥ वाजले असावेत. गावातील एक व्यक्ती नित्यकर्मासाठी गावाबाहेर आली तसे तिला पकडण्यात आले. सशस्त्र सैनिकांना पाहून तो दचकला. त्याला गोळी घालून मुहूर्त करावा अशी टूम निघाली. परतु श्री. एम्. एन्. रेड्डीनी हस्तक्षेप करून, त्या ब्राह्मणास न मारण्यासंबंधी विनवले. त्यांची शका नाहीशी करण्यासाठी त्यांनी त्या व्यक्तीस मत्र म्हणण्यास सांगितले. त्यांनी एम्. एन्. रेड्डीशी त्या व्यक्तीचे तेलगूत झालेले भाषण ऐकले. त्यानी एम्. एन्. रेड्डीला गावकऱ्यासाठी एखादा सदेश सांगितला का म्हणून विचारले. 'धर्म करता कर्म उभे रहाते की काय' असे एम्. एन्. ला वाटले. त्यानी त्या व्यक्तीशी उर्दूतून सवाद केला. आणि 'ताबडतोब घरी जा, कोणाला काही सागू नकोस, नसता परिणाम वाईट होईल' असे धमकावले. त्याला सोडण्यात आले. सैनिकाना कल्पनाही नव्हती की सोडलेली व्यक्ती महत्त्वाची म्हणजे 'वायरलेस' विश्वनाथभट जोशी होती म्हणून. दुसरीकडे उत्थगल व्यकट नरसप्पा सैनिकाच्या हाती सापडला होता. हा बलदंड शरिराचा उचापुरा तरुण होता. झाडाच्या आड उभ्या दोन सैनिकानी याला खुणावले. हा जवळ जाताच याला त्यांनी पकडले. सैनिक दोन– सशस्त्र आणि हा एकटा निशस्त्र. याने त्या दोन्ही सैनिकाना इतक्या जोरात झटकले की दोघेही आडवे तिडवे एकमेकावर पडले. गावकऱ्यांना साद घालीत, नागमोडी वळणे घेत हा गावाकडे धावला. बुरुजावरील नगारा बडविण्यात आला. घरोघर आक्रमणाची बातमी पोचविण्यात आली. बुरुजावरची तोफ गरजली. प्रत्युत्तरात मिल्ट्रीने गोळीबार सुरू केला. निझामी सेनेने गावावर १२–१३ बाँबगोळे टाकले. त्यांचा प्रलयंकारी आवाज दूरवरच्या खेड्यात ऐकू गेला. गावात अनेक ठिकाणी आग लागली, कित्येक घरे कोसळली. आता चांगलेच फटफटले होते. शत्रू सख्येने किती आहेत हे पाहण्यासाठी मुगटम रामय्या कोळी आणि भूमय्या वजारा बुरुजाच्या कठड्याचा आश्रय सोडून उभे राहिले तो शत्रूने फेकलेला बॉम्ब त्यांच्या जवळच पडला आणि ते ठार झाले. शेजारीच ठेवलेल्या दारूने पेट घतला आणि प्रचंड स्फोट होऊन, बुरुजाच्या मुख्य प्रतिकाराचा भाग कोसळला. मोठी चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली. आपण कसे कोंडले गेलो याची गावकऱ्यांना कल्पना आली. झालेला हल्ला लुटारू रझाकाराचा नव्हता. तो होता निझामी सैनिकाचा योजनाबद्ध हल्ला. ग्रामवासीयाच्या सर्व लक्षात आले. सैनिकानी गावास आता पुरते वेढलेले होते. एका गावकऱ्याने पुढे होऊन बुरुजावर पाढरे निशाण लावले. पांढरे निशाण त्यांच्या शरणागतीचे प्रतिक होते. तरीही सैनिकांनी ५–६ बॉम्ब गावातर फेकलेच. गावातून गोळीबार बद पडलाच होता. सैनिक गावात घुसले. प्राण वाचविण्यासाठी इकडे तिकडे पळणाऱ्या लोकाना गोळ्या घालण्यात आल्या. एका गल्लीच्या तोंडाशी सैनिकाशी सामना देण्यासाठी ८–१० तरुण गोळीबार करीत उभे होते. त्यांच्यावर हातबॉम्ब फेकण्यात आले. विश्वनाथभट जोशी व त्याच्या साथीदारास वीरगती प्राप्त झाली. सुरवातीच्या गोळीबारात एक नवप्रसुताही बळी पडली. तिचा मुलगा मात्र वाचला. त्या अबोध बालकाला उचलून पळणाऱ्या धनगरास गोळी घालण्यात आली. नतर गावकऱ्यांनी प्रेते एकत्र केली तेव्हा रक्ताने डबडबलेला, परतु जीवत बालक त्यांना सापडला. गावकऱ्यांचा प्रतिकार कधीचाच सपला होता.

आता घराघरात घुसून तपासास प्रारंभ झाला. तगडा तरुण दिसला की त्याला बांधून बाहेर आणण्यात यई. जवळ जवळ ९२ व्यक्तीना गावाबाहेर तीन रागेत उभे करण्यात आले. बळी देण्यासाठी आणलेले पशुच जणू. त्यात २–४ म्हातारेही होते. इकडे रझाकार आणि पोलिसांना 'छू:' करण्यात आले. सारे गाव लुटण्यात आले. बलात्कार करण्यात आले. गवत, कडब्यांच्या गंजीना आगी लावण्यात आल्या. अधिकाऱ्यांना विजयोन्माद चढलेला होता. निझामी राजवटीविरुद्धचे बंड त्यानी चिरडून टाकले होते. आता अन्य उपस्थित सिव्हिल अधिकाऱ्यांसमोर अत्याचाराचे दुसरे पर्व सुरू झाले. धर्मांध, अत्याचारी गुंड आणि या सिव्हिल अधिकाऱ्यात काहीही फरक नव्हता.

अधिकाऱ्यानी, एकवार, पकडून आणलेल्या, 'शिकारी'वर नजर टाकली. त्यांच्यात चर्चा सुरू झाली की एका रागेत यांना उभे करून थ्री नॉट थ्रीची गोळी चालविली तर किती जणांच्या शरिरातून ती पार जाईल? कोणी 'चार' म्हणाला, तर कोणी 'सहा'. एकाने म्हटले, प्रयोगच करून पाहू ना. ताबडतोब प्रयोग करण्याचे निश्चित झाले. सर्वप्रथम सेना अधिकाऱ्याने एक गोळी चालविली. चार व्यक्तीचा बळी घेऊन, गोळीने दिशा बदलली. आता पोलीस अधिकारी पुढे आला. फलस्वरूप तिघे धरणीवर कोसळले. यानंतर सिव्हिल अधिकाऱ्याचा क्रम होता. बांधलेल्या लोकांची रांग नीट करण्यात आली. थ्री नॉट थ्री हातात धरणारे महाशय होते एकबाल हाशिम. यांच्या गोळीने आठ-दहा जणांना 'मुक्ती' दिली. उरलेल्या लोकांना स्टेनगनने 'उडविण्यात' आले. या नरसहारात सिंहाचा वाटा होता नलगोंड्याचे कलेक्टर आणि रझाकारांचे सालारे आझम कासिम रझ चे खास मित्र 'मौज्जन हुसेन' यांचा.

महारवाड्यातून लोकाना बोलावण्यात आले. त्यांच्याकरवी ती प्रेते एका कोरड्या विहिरीत फकण्यात आली. आणि साधारणत: अकरा वाजता ही पिशाच्चे कुटीगलला परतली. तेथे त्यांनी २५ जणाना गोळ्या घातल्या. गावचा पटवारी नरसिंहरावही मारण्यात आला. त्या सर्वांचा अपराध कोणता? स्वसरक्षणाची फळी त्यानीही उभारली होती. त्या दिवशी जवळ जवळ १५०–१६० व्यक्तींची निर्घृण हत्या करण्यात आली. पृथ्वी थरारली, क्षणभर सूर्यनारायण काळवडला. वारा स्थिरावला. परंतु आकाशात मात्र 'अल्ला हो अकबर' 'शाहे उस्मान जिंदाबाद' 'आजाद हैदराबाद पाईंदाबाद'चा विजयनाद घुमत होता.

☐ ☐

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ३०-११-७४ ते ७-१२-७४

### इंदिरा गांधींना बिहारची मानसिक व्यथा

बिहारमध्ये कॉंग्रेस पक्षाने प्रति आंदोलन उभारले असले तरी त्यात यश मुळीच येणार नाही. इतकेच काय पतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या मनाला अधिकाधिक सतावणारा हर्षल आता आपल्या कारवाया वेगाने व उग्रतेने सुरू करणार असून इंदिराजींना हा प्रश्न सतावल्याखेरीज राहाणार नाही असेच वाटते. गफूरला बदलणे किंवा विधानसभा बरखास्त करणे यापैकी कोणत्यातरी निर्णयाप्रत त्यांना यावेच लागेल. त्याचप्रमाणे मंत्रीमंडळात अजून काही खातेबदल वा मंत्र्यांना बाहेर काढणे अशा प्रकारचा विचारही त्यांच्या मनात डोकावू लागेल. महाराष्ट्रातील नेतृत्वात गुप्त स्पर्धा सुरू होईल. बॅ. अंतुले याच्या नावाला राजधानीत (दिल्लीत) महत्त्व प्राप्त होईल.

### मेष : नोकरीत अनुकूलता

काही चांगले घडवायचे असेल तर अनुकूल काळाची वाट पहावी लागते या आठवड्यात तुम्हाला असा अनुकूल काळ येत आहे. त्याचा फायदा घ्या. तुम्ही एखादा स्वतंत्र उद्योग सुरू करण्याचे ठरवीत आहात तो या आठवड्यात करा. पैशाची सोय होईल. पत्नीच्या बाजूने मिळकतीची मागणी करायची असेल तर तीही याच आठवड्यात करा. नवीन वाहन खरेदीचा विचार थोडा पुढे ढकलणे आवश्यक आहे. नोकरीत विशेष काही घडणार नाही. बदलाचा विचार सध्या तरी मनात आणू नये. विरोधकाबद्दलदेखील वाईट हेतू मनात बाळगू नका. कारण विरोधक तुमच्याशी सहकार्य करण्याची शक्यता आहे. लोकांच्या देण्यातून सध्या तरी तुमची मुक्तता होण्याची शक्यता नसली तरी आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. तरुणांना प्रेमाचा सुखद स्पर्श होईल व महिलांना लॉटरीच्या मार्गाने धनलाभ होईल. नोकरीत देखील वरची जागा मिळेल.

### वृषभ : अनुकूल बदल

तुम्ही आंदोलीत मनस्थितीतून आता दूर व्हायला हरकत नाही. कारण साडेसातीचा शेवटचा पर्वकाल सुरू झाला असून अनेक प्रकारच्या त्रासातून तुमची आता मुक्तता होऊ लागेल. राजकारणात दडपणाखाली तुम्ही काही केले असले तरी त्याची झळ तुम्हाला आता पोचू शकणार नाही याबद्दल निश्चित असावे. उलट नोकरी असो वा व्यवसाय असो तुमच्या जीवनात उत्साहाचे नवे वारे वाहू लागणार आहेत. नोकरीत तुमची बदली होणार आहे व तुम्हाला मिळणारे वरिष्ठ तुमच्या गुणांचे, श्रमाचे चीज करणारे असतील. सर्व प्रकारच्या अडचणींवर मात करून तुमच्या आशा आकांक्षा पुऱ्या होण्याचा काळ फार दिवसानंतर येत आहे. तुम्ही रेस खेळत नसाल कदाचित पण यावेळी रेस व लॉटरीत भाग घ्यायला हरकत नाही. तरुणतरुणींनी सौंदर्य प्रसाधनांचा व्यापार, कपड्याचा व्यापार अवश्य करावा. गायक गायिकांना मोठ्या यशाचा काळ आहे. महिलांनी संसारात मिळते जुळते घ्यावे. मुलाचे त्यांना सुख मिळेल.

### मिथुन : प्रगतीकडे झेप

तुमच्या मार्गातील काटे आणि नरोटे आता पार नाहीसे होत आहेत व त्याचा प्रत्यय याच आठवड्यात येऊ लागेल. अनेक दिवसांच्या मनात जपून ठेवलेल्या, हृदयाच्या गाभाऱ्यात पूजलेल्या अत्युच्च महत्त्वाकांक्षा यावेळी सफल होणार आहेत. धाडसी योजना आखताना आता माघार घेण्याचे मुळीच कारण नाही. आळस, निराशा, गोंधळ तुमच्या जीवनातून हद्दपार होणार असून तुमच्या कर्तृत्वाला नव्या वाटा उपलब्ध होऊ लागतील. नोकरीत तुम्हाला जे काही मागावयाचे असेल ते याचवेळी मागा. वरिष्ठांच्या मनात तुमच्याबद्दल आपुलकी निर्माण झाली असल्याचा प्रत्यय येईल विद्यार्थी व तरुणतरुणींना अर्थप्राप्तीचा उत्तमपैकी योग आहे. महिलांनी कुढत न बसता नोकरी व्यवसायात लक्ष घालावे, त्याचे व्यक्तिमत्त्व उचावेल.

### कर्क : राजकीय मान

तुमचा पिंड तसा राजकारणी नाही. पण तरीदेखील तुमचा राजकारणाबरोबरचा संबंध सुटत नाही. अनिच्छेने का होईना तुमचा राजकारणात पायरव होतोच. या आठवड्यात तुम्हाला अकल्पितपणे असा राजकीय सन्मानाचा योग आल्यास आश्चर्य वाटू नये. रवी व मंगळ हे ग्रह तुम्हाला इतके छान आहेत की ते तुमचे स्थित्यंतर घडवून आणल्याखेरीज राहाणार नाहीत. कोणतीही निवडणूक असू द्या तुमचा खर्च भरमसाठ होईल पण यश पदरात पडेल. तुम्ही आमदार, खासदार असलात तर एखाद्या महत्त्वाच्या पदाची तुमच्या गळ्यात माळ पडणार आहे. शनी खर्चाचे नवे नवे उपक्रम तुमच्यापुढे उभे करील. त्याला तोंड देताना अगदी नाकी नऊ येतील. चालू नोकरीत वरिष्ठांकडून बोलून घ्यावे लागले तरी वाईट वाटून घेऊ नका. बेकार तरुण तरुणींना तात्पुरती नोकरी मिळेल. महिलांनी शेजाऱ्याच्या भांडणात भाग घेऊ नये. नोकरीत वरिष्ठांच्या कलाने घ्यावे.

### सिंह : रहाण्याची जागा मिळेल

सिंह राशीची तुम्ही माणसे तशी खंबीर व निग्रही असता. कोणत्याही आघाताने 'उन्मळण्या'इतकी तुम्ही लेचीपेची माणसे नाहीत. सुखस्थानात वसून काही उग्र ग्रह तुमची कसोटी पहाणार आहेत. तुमच्या मनात शांती आणि स्थैर्य ढवळून निघते की काय अशी परिस्थिती काही वेळा हे ग्रह निर्माण करणार आहेत. पण परमेश्वरावर अढळ श्रद्धा व खंबीर कार्यक्षमता याच्या जोरावर तुम्ही निभावून जाणार आहात. सध्या रहात असलेल्या जागेसंबंधी काही तरी तंटा उद्भवेल. पण निकाल तुमच्यासारखाच लागेल. ज्यांची आर्थिक परिस्थिती बंगल्यात रहाण्याइतकी चांगली असेल त्यांना बंगला मिळणार आहे. आठवड्याच्या उत्तरार्धात नोकरीत काही अनुकूल घटना घडणार आहेत. बढती-प्रमोशनचा योग आहे. विधान व वाणिज्य पदवीधरांना चांगली संधी मिळेल. कोणताही स्वतंत्र उद्योग सध्या सुरू करू नये. व्यापारात मंदीची चाहूल लागणार आहे. विद्यार्थी व अविवाहित तरुणांनी स्वतःचे चारित्र्य शुद्ध राखावे. महिलाच्या महत्त्वाकांक्षेला अनुकूल क्षेत्र लाभेल. पैसा मिळेल.

**कन्या : नोकरीत चीज**

नोकरी हाच तुमचा 'धंदा.' तुम्हाला स्वतंत्र असा कोणताच व्यवसाय जमत नाही. पण नोकरीच्या दृष्टीने मात्र हा आठवडा तुम्हाला बराच अनुकूल जाणार आहे. एकादी नवी जबाबदारी तुमच्यावर सोपवून तुमच्या कामाचे चीज वरिष्ठांकडून किंवा मालकांकडून होईल. आर्थिक परिस्थिती गेले काही दिवस घसरगुंडीला लागली आहे ती इतक्या‌- लवकर सुधारण्याची शक्यता नसली तरी दुय्यम व्यवसाय मात्र पुन्हा कार्यान्वित होऊ लागेल. आजार, उदासपणा भीती पार नाहीशी होईल. उत्साहाचे वारे मनात वाहू लागेल. नोकरीत तूर्त बदल नको. सार्वजनिक कार्यात मोठे यश लाभेल. मानाचा, सन्मानाचा योग येणार आहे. विद्यार्थी व तरुणतरुणींना त्यांच्या मनाजोगे क्षेत्र लाभणार आहे. महिलांना अर्थप्राप्ती चागली होईल. नोकरीत प्रमोशन मिळेल.

**तूळ : कलहावर मात**

हर्शल–गुरूचा त्रिकोण असेपर्यंत तुम्हाला कधीही माघार घ्यावी लागणार नाही. मात्र त्याने कुटुबात अकस्मात निर्माण केलेला कलह तडजोडीने व सामोपचाराने मिटेल. दुभगणारे कौटुंबिक सबंध पुन्हा साधले जातील हेच या आठवड्याचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल. सत्तेवर असलेल्या राजकारणी लोकांची मध्यतरी झालेली उपेक्षा आता दूर होऊन त्याचे झाकाळलेले भवितव्य उजळून निघेल. एकादे महत्त्वाचे पद त्यांच्या गळ्यात पडणार आहे. नोकरीत बढती–प्रमोशनचा योग आहे. पण त्याचबरोबर बदलीचा योग सभवतो. बेकाराचा वनवास काही प्रमाणात कमी होईल. आर्थिक परिस्थिती सुधारायला सध्या तरी सधी नाही. पण गरज भागेल. तरुण व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कार्य जरासे थडावेल. महिलाच्या बाततीत अविवाहिताना लग्नयोग आहे.

**वृश्चिक : व्यक्तिमत्त्वाला आकर्षकता**

मगळाचे काहीसे दाहक व तेजस्वी व्यक्तिमत्त्व तुमच्या वाट्याला येते. याच आठवड्यात त्याचा परिणामकारक प्रत्यय येणार आहे. जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात तुम्हाला भरपूर फायदा होणार आहे. नोकरीत जे वरिष्ठ तुमच्याशी बोलायलादेखील तयार नव्हते ते आता लाडीगोडीत येणार आहेत. पदवीधर बेकाराचा आजवर यशस्वी होत नसलेला इंटरव्ह्यू यावेळी यशस्वी होईल. इंजिनियर, वकील, शेती पदवीधर यांना अनुकूल दिवस आहेत. अपयश, वणवण आता सारे सपून उदयाचा काल सुरू होणार आहे. प्लॅस्टिक्सचा तुमचा व्यापार अगर कारखाना असेल तर त्याला चागली मागणी येणार आहे. शेअरमध्ये नफा मिळवता येईल. नवीन कोणताही व्यवसाय यावेळी सुरू करायला हरकत नाही. यश मिळेल. एकदरीत हा आठवडा अनुकूल आहे. तरुणतरुणी व विद्यार्थी याची एकादी सहल होईल. महिलांनी नोकरीत सावधगिरीने वागावे.

**धनू : अतोनात खर्च**

तुमच्या बाबतीत आता ग्रहांचे तंत्र बदलू लागले आहे. याची काळजीपूर्वक दखल घेणे आवश्यक आहे. वृश्चिक राशीत बसून राहू आता आपले विघातक कार्य करणार आहे. रवि-मंगळासारखे सामर्थ्यवान ग्रह या राहूला सहकार्य देण्यासाठी वेगाने पुढे सरकत आहेत. यावेळी आपल्या अवती-भोवती काय चालले आहे यावर लक्ष ठेवून रहाणे आवश्यक आहे. विरोधक व गुप्त शत्रू उठाव करण्याची याचवेळी शक्यता आहे. तुमच्या हातून कोठे चुका होतात व त्याचा पराचा कावळा करायला सधी मिळते याकडे विरोधक खास दृष्टी ठेवणार आहेत. पैशाच्या व्यवहारात दक्ष राहून अतोनात खर्चाला आळा घाला. तब्येतीची देखील काळजी घ्या. तरुण-तरुणी व विद्यार्थी यानी स्मरण शक्तीवर विसबून राहू नये. महिलांनी सशयाला जागा करून देऊ नये.

**मकर : पैशाची अभिवृद्धी**

तुमचा ध्येयवाद व जिद्द या दोन गुणांवर कुणीही स्पर्धक मात करू शकत नाही. कोणत्याही सकटावर जिद्दीच्या जोरावर मात करण्याचे तुमचे कौशल्य निर्विवाद आहे. यामुळे चालू आठवड्यात तुम्ही विरोधक व हितचिंतक यांच्या चर्चेचा विषय होणार आहात. प्रामुख्याने हा आठवडा तुमच्या आर्थिक क्षेत्रात-पैशाच्या बचतीत मोठी भर पडणार आहे. तुम्ही लॉटरी–रेस या अकल्पित धनलाभाबद्दल प्रयत्नशील राहिल्यास तुमचा फायदाच होईल. नोकरीत तुमच्या पगारवाढीच्या कामाबद्दल वरिष्ठ बराच रस घेणार आहेत. तुमची शिफारस होईल. व्यावसायिक क्षेत्रातील पेचप्रसग हळुहळू सुटू लागणार असून नव्या योजनाना मूर्त स्वरूप देण्यासाठी आवश्यक ते आर्थिक सहकार्य मिळू शकेल. व्यापारी क्षेत्रातील तुमच्या अनेक महत्त्वाकाक्षा साकार होऊ लागतील. विवाहाचा प्रश्न मात्र तूर्त स्थगित ठेवावा लागेल. तरुण-तरुणींनी व विद्यार्थी वर्गाने भावनेला आवर घालावा. महिलानी कौशल्याने स्वतःची कामे करून घ्यावी.

**कुंभ : नोकरीत प्रमोशन**

हर्शल-गुरुचा असामान्य असा त्रिकोण योग सध्या तुमच्या जीवनात अनुकूल असे क्रातिकारक बदल घडवीत आहे. खरे म्हणजे तुम्ही कुरकूर करावी असे काहीही नाही. नोकरी, व्यवसाय, पैसा इत्यादी सर्वच बाबतीत कुभ राशीची माणसे आघाडीवर आहेत. कुभ राशीच्या राजकारणी व्यक्ती सध्या तरी गाजवीत आहेत व गाजत आहेत. यावेळी असाच एखादा प्रसग तुमच्या जीवनात घडण्याचा सभव आहे. तुम्ही सत्तारूढ पक्षात असलात तर तुमचे उखळ पांढरे होईल हे नक्की समजा. राजदूत, मत्री अशासारखे काही तरी तुमच्या पदरात पडणार आहे. नोकरीत आश्चर्यकारक असा बढतीचा योग तुम्हाला येणार आहे. विद्यार्थी परीक्षेत यश मिळवतील. व्यापारी लोकांना परदेशी वारीचा योग. महिलाना कलागुण दाखविण्याची संधी लाभेल.

**मीन : व्यवसायात प्रगती**

तुम्ही कोडीत सापडला आहात याची मला कल्पना आहे. पण वाईटात देखील कधी कधी चागले घडते. तसेच यावेळी तुमच्या बाबतीत घडणार आहे. एका बाजूला गुरु. व दुसऱ्या बाजूला रवि-मगळ तुम्हाला कैचीत पकडण्याचा प्रयत्न करीत आहेत. यावेळी जपायला हवे ते प्रामुख्याने तब्येतीला. एखादा फार दिवसाचा आजार पुन्हा उचल खाईल असे तुमच्या मनाला वाटू लागेल. मात्र नोकरीच्या दृष्टीने काही विशेष घडले नाही तरी माघार किंवा अप्रगती असे मुळीच काही घडणार नाही. व्यापार एजन्सीचा धदा, औषधी उत्पादन, शेती-भाजीपाला उत्पादन यात चांगली प्रगती होईल. विद्यार्थी व तरुणतरुणी यांनी स्पर्धा परीक्षेत भाग घ्यावा. महिलानी नोकरीत कामाकडे दुर्लक्ष करू नये. □

# ग्राउंड-फ्लो

## एक शून्य राजा !

मुकुंद मणूरकर

'क्रिकेट हा खेळांचा राजा आहे,' हे सिद्ध करा असं जर आपल्या क्रिकेट बोर्डाच्या पदाधिकाऱ्यांना सांगितलं तर ते दोन्ही तगड्या वर करून शीर्षासन करतील. पण 'क्रिकेट हा राजांचा खेळ आहे' हे दाखवून द्यायला मात्र हे एका पायावर तयार !

ती पहा, किती लोकांनी गर्दी केलीय ती. अरे हो, ही...अशी घाई काय करताय. अजून पडदा तर उघडू दे. आणि एकेकाने यायचं हं, नो, नो, मि. रुंगठा, तुम्ही नंतर. लेट कमर फर्स्ट, मिस्टर दत्ता रे ! या !

'तर मंडळी हे श्री. दत्ता रे. आपल्या क्रिकेट संघाच्या निवडसमितीचे माजी सभासद व अध्यक्ष. यांना थोडासा रक्तदाबाचा विकार आहे. तेव्हा टाळीची वाक्य त्यांनी म्हटलो तरी टाळ्या वाजवू नका.

'बसा ना, रे साहेब. ब्लडप्रेशर काय म्हणतय ? नॉर्मलवर आहे ना आता ?'

'नको, नको, प्लीज, नको ती आठवण. शहारे येतात अजून आठवल की. माझ्या या रक्तदाबाचा परिणाम इतका दूरगामी होतो हे माहीत असतं तर मी निवडसमितीच्या सदस्यत्वाचा राजीनामाच की हो दिला असता. मी खरोखर कर्मदरिद्री. माझ्यामुळेच भारतीय क्रिकेटच नुकसान झालं. राजे पतौडीचा अस्त माझ्यामुळेच झाला. राऽऽजे क्षमा करा लेकराला.'

च्यायला, भलतंच लावून घेतलेलं दिसतंय यांनी मनाला. आता तुम्हाला म्हणा सर्व माहिती आहेच. एकाहत्तर साली जेव्हा वेस्ट इंडीजच्या दौऱ्यासाठी भारतीय संघाचा कर्णधार निवडण्यासाठी मुंबईत बैठक झाली तेव्हा नेमका या दत्ता रेंचा रक्तदाबाचा विकार बळकावला. त्यामुळे ते बैठकीला उपस्थित राहू शकले नाहीत. म्हणजे बैठकीला फक्त चारच सभासद हजर. दोघांची मते वाडेकरला तर दोघांची मते पतौडीला. शेवटी विजयराव मर्चंट यांनी 'कास्टींग व्होट' वाडेकरला टाकलं व वाडेकर कर्णधार झाला. दत्ता रे जर त्यावेळी उपस्थित असते तर पतौडीला तीन मते पडली असती व भारतीय क्रिकेटचं नुकसान...सॉरी, भारतीय क्रिकेटचा लौकिक कितीतरी वाढला असता–

'बरं, आता तरी झाला ना पतौडी परत कप्टन. मग एवढं कशाला वाईट वाटून घेता ?'

'नाही हो, गेली तीन वर्षे माझ्या जिवाला नुसता घोर लागून राहिला होता. परत महाराज स्थानापन्न कधी होताहेत याचीच चातकासारखी वाट पहात होतो. अखेर परवा राजांच घोड गंगेत न्हाल !'

'ते जाऊ द्या. एक सांगा. खरोखरच क्रिकेट हा राजांचा खेळ आहे का हो ?'

'हे काय विचारणं झालं. आता तुम्हीच सांगा. हे जर राजे महाराजे नसते तर आज क्रिकेट दिसल असतं का गल्लीबोळात. या लोकांनी क्रिकेट रुजवलं, फुलवल, जोपासल. मग कृतज्ञता म्हणून दिलं त्यांच्यापैकी एकाला कर्णधारपद तर बिघडलं कुठ ? आधी आता राजेमहाराजांपैकी कुणी हा खेळ खेळतच नाही मुळी.'

'पण काय हो, पतौडी इंग्लडमध्ये शिकत असताना त्याला कडे बोलावल कुणी ?'

'बोलावतंय कोण ? चांगल्या कार्याकडे चांगली माणस आपणहून येतात. टेड डेक्स्टरचा इंग्लिश संघ आला होता ना भारतात त्यावेळी तीन कसोटी सामन्यानंतर हैदराबादला अध्यक्षीय संघाचा पाहुण्याबरोबर सामना होता. तेव्हा पतौडीला अध्यक्षीय संघाचा कर्णधार नेमलं गोऱ्या रंगाच्या, ताबूस गालाच्या, मध्यम उंचीच्या, सडसडीत बांध्याच्या अशा देखण्या, बेडर पतौडीने जेव्हा रुबाबदार पाऊलफेक करीत भारतीय क्रिकेटमध्ये प्रवेश केला तेव्हाच ठरले की कर्णधाराची जागा पतौडीमुळेच शोभून दिसणार. मग चौथ्या व पाचव्या कसोटी सामन्यात त्याची निवड झाली ती साधा खेळाडू म्हणून. आणि अहो आश्चर्यम्–भारताने ते दोन्ही सामने जिंकले की हो ! तर असा हा पायगुणाचा पतौडी !'

वा, वा, ! खरच पायगुणाचा हो. आणि म्हणूनच वेस्ट इंडीजच्या दौऱ्यावर उम्रीगर, बोर्डे, नाडकर्णी वगैरे अपशकुनी मंडळींना बाजूस सारून पतौडीची उपकर्णधार म्हणून नेमणूक झाली. आणि दुसऱ्या कसोटीत चार्ली ग्रिफीथने कॉन्ट्रॅक्टरचे टाळके शेकल्यानंतर राजे पतौडी भारताचे कर्णधार झाले ते परवापरवापर्यंत–म्हणजे दत्ता रेंचं ब्लडप्रेशर हाय होईपर्यंत टिकून होते ..

'पण का हो रे साहेब, मी म्हणतो, त्यावेळी दैवयोगाने झाला असेल वाडकर कर्णधार. पण नंतर इंग्लंडच्या दौऱ्याच्या वेळी तुम्ही त्याची का नाही केलीत उचलबांगडी ?'

'लोकांनी उलटं टांगून जोड्यानी सडकलं असतं ना आम्हाला...'

'या ! या ! मंडळी आता एन्ट्री केलेले हे श्री. गुलाम अहमद बरं का ! थोर खेळाडू, भारताचे माजी कर्णधार. निवडसमितीचे सभासद. ऑस्ट्रेलिया-न्यूझिलंडच्या दौऱ्यावर भारतीय संघाचे व्यवस्थापक या नात्याने भारतीय क्रिकेटच्या सर्वांगाला मालीश केलय् यांनी !'

'काहो मि. गुलामसाहेब, घरगुती आणि व्यावसायिक अडचणीमुळे आपण परदेश दौऱ्यावर जाऊ शकत नाही असं बोर्डाला कळवायला तुम्हीच पतौडीला सांगितलं होतं म्हणे ?'

'कोण म्हणतो ? आता या गोष्टी ज्याच्या त्याला का कळत नाहीत ? त्याला गुरगावला एक पोल्ट्रीफार्म टाकायचा होता, झालच तर इलेक्शनला उभ रहायच होत, झालच तर शर्मिलाकडे बारीक लक्ष द्याव लागत होतं'

'आता या अडचणी संपल्या म्हणायच्या.'

'संपणारच. अहो अडचणीच त्या. आल्या तशा गेल्या.'

–तर मंडळी, पतौडीच्या अडचणीचे निवारण झाले. श्रीराम जयराम जय जय राम ! चला हार आणा. आणि बुक्का लावून घ्या प्रत्येकाने आपल्या कपाळावर. सुटला बिचारा... म्हणजे अडचणीतून ! त्याने पोल्ट्री टाकली की नाही हे माहीत नाही. पण टाकली असल्यास त्यात एक-दोन कोंबड्या सोन्याची अंडी देणाऱ्या निपजल्या असणार. इंदिराजींनी त्याला राज्यसभेवर घ्यायच आश्वासन दिलय. म्हणून इलेक्शन टळले. शिवाय शर्मिलावहिनी आता पतौडीशी व्यवस्थित आणि इतरांशी वहिनीप्रमाणेच वागतात. त्यामुळे बारीक लक्ष द्यायची गरज नाही !

'एक प्रश्न गुलाम अहमदसाहेब, पतौडीची संघात शुअर सीट आहे का हो ? नाही म्हणजे परवा वेस्टइंडीजविरुद्ध साऊथझोनकडून खेळताना त्यानी शून्य व पाच धावा केल्या होत्या म्हणून विचारतोय,... काय हो रे साहेब, काय शोधताय ? गोळी वाटतं, माइंड यूअर ब्लडप्रेशर हां !'

'छे, छे, गोळी बिळी काय नाय. एक कात्रण शोधतोय. हं, सापडलं तुमच्याकडच्या

लेखकाचंच आहे. आपले शिरीष कणेकर हो. त्यांनी लिहिलेलं वाचून दाखवितो,...हं तर कणेकर म्हणतात–संघात येण्याइतकी पतौडीची फलंदाजी आहे की नाही हे कसोटीतच ठरणार. रणजी-दुलीप स्पर्धेत त्याने भोपळा फोडला नाही तरी हरकत नाही. पतौडीच्या दर्जाच्या खेळाडूची कसोटी 'टेस्ट'मध्येच बघायची... कारण पतौडीत कमालीच्या गट्स आहेत... तेव्हा त्याचा कस प्रत्यक्ष ल तीतच लागणार, रंगीत तालमीत नव्हे ! ... मिळालं का तुमच्या प्रश्नाचं उत्तर ?'

'थँक्स् ! बाकी कणेकरांना पतौडीबद्दल बराच म्हणजे फारच आदर वाटतो नाही ?'

'केवळ पतौडीबद्दलच नाही. सलीम दुराणीही त्यांना आवडतो. झालंच तर तलत मेहमूदही !'

'खरं ! ग्रेट मंडळी आहेत ही सर्व. तुफान गट्स, पुरुषोत्तम !'

'च्यायला, पुरुषोत्तम म्हटल्याबरोबर पुरुषोत्तमदास रुंगठा हजर ना. यांच्याशी बोलायचं म्हणजे–

'यावे, यावे पुरुषोत्तम शेठ !'

मंडळी हे आपले पुरुषोत्तमदास रुंगठा, आपल्या क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष. लोकसभा-राज्यसभेत सध्या तुफान गाजतायत. सरदारजी प्रकरण चांगलंच भोवणार आहे यांना !

'रुंगठासाहेब, बेदीप्रकरणाची माहिती सांगा ना लोकांना.'

'कसलं बेदीप्रकरण न् काय. साली आमची फुकटची दांडी गुल झाली. त्याचं काय झालं. आपल्या संघाच्या पराभवाची चौकशी मुंबईला चालू होती. बेदीला बोलावूनही तो साक्षीला आला नव्हता. त्या दिवशी आम्ही संध्याकाळी एका हॉटेलमध्ये गेलो होतो. तर तिथं बेदी एका पोरीबरोबर बसलेला. मी विचारलं. काय आज साक्षीला समितीपुढे आला नाही. तर तो म्हटला कसली साक्ष त् कसली समिती ? म्हटलं छान, आत ही चप्पल घ्या अन् हाणा आमच्या टाळक्यात. तर बेटचाने खरंच चप्पल काढून माझ्या टाळक्यात हाणली. आणि इतकंच करून थांबला नाही तर धक्के मारून मला बाहेर काढलं. आता अशी अपमानास्पद वागणूक दिली म्हणून मी निवडसमितीला कळवलं की बेदीचा विचार करू नका. आणि आमचा कोळसा. झाला पार ! अह। तो बेदी नव्हताच कोणतरी एक सरदारजी होता. मला वाटलं तो बेदीच आहे. साली या सरदारजींची डोकी आणि चेहरे सारखेच. तुम्हाला तरी ओळखू येईल का सरदारजी सरदारजी मधला किंवा चिन्या चिन्यामधला फरक ? आईशप्पत सांगतो मी प्रत्येक सरदारजीला बेदीच समजतो !'

'बरं आता या प्रकरणाचं काय ?'

'आता पडदा टाकला.'

'म्हणजे काय ?'

'पडदा, प-ड-दा.'

–मानलं सालं आपण रुंगठासाहेबांना. सर्वजण यांचं अगदी मनापासून ऐकतात. आता ते नुसतं म्हटले प-ड-दा. तर स्टेजवर पडदा पडायचं काही कारण होतं का ?

जाऊ द्या झालं. नाही तरी आता कॉमेंट्रीची वेळ झालीच आहे. पुढल्या नाटकासाठी सेट्स उभारले पाहिजेत. नाटकाचं नाव आहे 'संगीत वस्त्रहरण-मेड बाय इंडिया' किंवा 'गोची-मेड बाय वेस्ट इंडीज्.' प्रसंगानुरूप यापैकी एक नाटक सादर केले जाईल.

तेव्हा ओ. के. ! □□




# सरकारी, तसेंच ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या साधन सामग्रीची प्राप्ती

सरकारी, त्याचप्रमाणे, ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाच्या साधनसामुग्रीची प्राप्ती करून घेण्यासंबंधी विचार करण्यासंबंधी विचार करण्यासाठी ऐतिहासिक दस्तऐवज खरेदी समितीची ( हिस्टॉरिकल डॉक्युमेंट्स पर्चेस कमिटी ) बैठक डिसेंबर १९७४ च्या चौथ्या आठवडयांत भरण्याचा संभव आहे. तीत खालील प्रकारच्या सरकारी आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या साधनसामुग्रीच्या प्राप्तीसंबंधी चर्चा होईल.

१. ऐतिहासिक दस्ताऐवज

२. सरकारी दस्ताऐवजातील हस्तलिखिते

३. देशाच्या इतिहासात ज्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली असेल अशा महत्त्वाच्या व्यक्ती, वरिष्ठ सरकारी अधिकारी, साहित्यिक, शास्त्रज्ञ इत्यादींची खासगी कागदपत्रे.

(नाणी, फिल्म्स, छायाचित्रें, कोरीव लेणी, शस्त्रें, मातीच्या भांड्याचे तुकडे, मणी, इत्यादीचा प्राप्त करण्याच्या (खरेदीच्या) दृष्टीने विचार केला जाणार नाही.)

उपरिनिर्दिष्ट साधन सामग्री गटातील सामग्रीची, विक्री करण्याची ज्या कोणा व्यक्तीची तयारी असेल त्यांनी कृपया २० डिसेंबर १९७४ पर्यंत खालील पत्त्यावर आपल्या जवळील अशा सामुग्रीची, वस्तुवार सविस्तर यादी पाठवावी.

सेक्रेटरी, हिस्टॉरिकल डॉक्युमेंट्स पर्चेस कमिटी, नॅशनल अर्काइव्ज्स् ऑफ इंडिया, जनपथ, न्यू दिल्ली ११०००१.

**विक्रीसाठी म्हणून ज्या वस्तू देऊं केल्या असतील, त्या, तशी सूचना दिली जाईपर्यंत पाठवूं नयेत.**

DAVP 74/328

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. स. **श्री. ग. माजगावकर**